### प्रकरण-4

# अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांचा भाषिक अभ्यास

## 4.1 प्रास्ताविक

पहिल्या प्रकरणांमधून कादंबरी संदर्भातील सैद्धांतिक भूमिकेचा व ग्रामीण कादंबरीच्या एकूण स्वरूपाचा आढावा घेतल्यानंतर दुसऱ्या प्रकरणातून साहित्याच्या कालिक अभ्यासाच्या आवश्यकतेचा ऊहापोह केला आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांतून घडणाऱ्या जीवनदर्शनाचा समग्र आढावा तिसऱ्या प्रकरणातून घेतला आहे. या प्रकरणात आपणाला कादंबरीची प्रत्यक्ष अभिव्यक्ती ज्या भाषेच्या माध्यमातून होते त्या भाषिक विशेषांचा अभ्यास करायचा आहे. कादंबरीतील आशयाचे अंग महत्त्वाचे असते तसेच अभिव्यक्ती देखील तेवढीच महत्त्वाची असते. आपणाला आशयापर्यंत घेऊन जाण्याचे काम अभिव्यक्ती करते हे विसरून चालणार नाही. जेव्हा आपण यशस्वी साहित्यकृतींचा विचार करतो तेव्हा त्यात आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंचाही उत्तम समन्वय साधलेला असतो असे दिसून येते. कोणत्याही साहित्यकृतीचा विचार करीत असताना आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही अंगांनी करणे आवश्यक असते. या संदर्भात डॉ. गोविंद काजरेकर यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, “जीवनदर्शन घडविणे हा कथात्म साहित्याचा मूळ उद्देश असतो. असे असले, तरी कथात्म साहित्यात केवळ जीवनदर्शन महत्त्वाचे मानून समीक्षा केल्यास ती एकांगी होऊ शकते. हे जीवनदर्शन ज्या भाषेच्या आधारे आकाराला आलेले असते त्या भाषेचा विचारही तितकाच महत्त्वाचा अहतो.” [1] नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीचा आढावा घेत असताना, कालानुरूप ग्रामीण कादंबरीत झालेल्या बदलांचा आपण विचार करीत आहोत. 1960 नंतरच्या काळात कादंबरीच्या अभिव्यक्तीत अनेक महत्त्वाचे बदल झाल्याचे दिसतात. या काळात अभिव्यक्तीचा विचार केवळ ‘सौंदर्यात्मक निर्मिती’ या पातळीवर न होता आशयाचे अभिन्न अंग म्हणून कादंबरीची निर्मिती झाल्याचे दिसते. म्हणजे, आशयाची आणि अभिव्यक्तीची एकरूपता साठोत्तरी साहित्यात आपणाला अधिकाधिक दिसून येते. साठोत्तरी काळात झालेला महत्त्वाचा बदल म्हणजे निवेदनाऐवजी प्रत्यक्ष पात्रांच्या कृती-उक्तीतून आशयाचा आविष्कार अधिक नेमकेपणांने होऊ लागला. निवेदन आणि आविष्कार यामधील फरक स्पष्ट करताना आनंद यादवांनी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे आहे ते म्हणतात, "आविष्काराची प्रकृती तप्त आणि लिप्त वाटते, तर निवेदनाची प्रकृती थंड आणि अलिप्त वाटते. 'आविष्कार' रसरसलेला गतिमान वाटतो, तर 'निवेदन' संथ गतीने सरपटत पुढे चालले आहे, असे वाटते. निवेदनाची भाषा निरंगी असते; आविष्काराची भाषा व्यक्तिमत्त्वाने रंगलेली वाटते.

त्यामुळे निवेदनाच्या भाषेचे अस्तित्व विशेष जाणवत नाही; पण आविष्काराच्या भाषेचे अस्तित्व अनुभवाइतकेच विशेष स्वरूपात जाणवत असते.[2] साहित्याच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना साहित्यात निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य ही चार महत्त्वाची अंगे असतात. या चार अंगांच्या आधारे लेखक मनातील आशयाला अभिव्यक्त करीत असतो किंवा आशयाची मांडणी करीत असतो. या संदर्भात डॉ. गोविंद काजरेकर यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणतात, "वर्णन हे पात्रांशी, परिसराशी वा अवकाशाशी संबंधीत असते. निवेदन व संवाद यातून काळाचा बोध होतो, तसेच घटना-प्रसंगांचे स्वरूप व पात्रांचे स्वभावधर्म संवादातून कळतात. भाष्य हे चिंतनाशी, विचारविश्वाशी संबंधीत असते. अवकाशात विविध स्थळे, प्रदेश यांचा समावेश असतो. विशिष्ट स्थळे, प्रदेश निवडण्यामागे लेखकाचा दृष्टिकोन असतो. पात्रांच्या कृतीतून घडणाऱ्या घटनांचे निवेदन केले जाते. पात्रे परस्परात संवाद साधतात व कृती करतात तेव्हा त्यांचे कथन केले जाते. कथन हे लेखकाने केलेले अप्रत्यक्ष व संवादाच्या माध्यमातून झालेले ते प्रत्यक्ष असते. अशाप्रकारे कथात्म साहित्यात पात्रे त्यांच्या कृती, उक्ती, घटना-प्रसंग यांना असलेला काळाचा संदर्भ यांतून रचना झालेली असते."[3] या संदर्भात प्रसिद्ध समीक्षक रा. भा. पाटणकर यांनी व्यक्त केलेले मत देखील विचारात घेतले पाहिजे. ते म्हणतात, "कलाकृतीतला आशय खरा वा सच्चा आहे असे वाचकाला पटले पाहिजे म्हणून लेखक विशिष्ट निवेदनपद्धतीचा अवलंब करतो. सामान्यपणे कादंबरीकाराचा दृष्टिकोन सर्वसाक्षी निर्मात्याचा असतो. पात्रे व घटना त्यांनेच निर्माण केलेल्या असल्यामुळे त्याला त्यांच्याविषयी सर्वकाही माहीत असते. प्रत्यक्ष आयुष्यात कोणत्याही गोष्टीचा आपल्याला जो परिचय होतो तो तसा सर्वसाक्षी दृष्टिकोणातून होत नाही. आपल्या दृष्टीला मर्यादा असतात. गोष्टींचे स्वरूप आल्याला हळूहळू समजते आणि पुष्कळदा ते पूर्णपणे समजतही नाही. अपुऱ्या जाणिवेत जी खोली व जो सच्चेपणा असतो तो सर्वसाक्षी दृष्टिकोणातून मिळालेल्या वस्तुस्थितीच्या जाणिवेत पुष्कळदा नसतो म्हणून काही वेळा कादंबरीकार मर्यादित दृष्टिकोणातून निवेदन करतो. काही कादंबऱ्या विशिष्ट पात्रांच्या दृष्टिकोणातून लिहिलेल्या असतात; काही कादंबऱ्यात पत्रे, रोजनिशी, संवाद यांचा भरपूर उपयोग केलेला असतो. कादंबरीतील आशयाच्या सच्चेपणाबद्दल वाचकांची खातरी पटविण्याचे हे सर्व मार्ग आहेत." [4] रा. भा. पाटणकर यांच्या या विवेचनांतून आपणाला कादंबरीच्या निर्मितीत अभिव्यक्तीचे आसलेले महत्त्व सहज लक्षात येते. अभिव्यक्तीचा विचार निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य या चार अंगानी केला जातो. ही चार अंगे लक्षात घेऊन अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा अभिव्यक्तीच्या संदर्भात आपणाला अभ्यास करायचा आहे.

## 4.2 निवेदन आणि निवेदनाचे प्रकार

निवेदन ही कादंबरीच्या भाषिक अभ्यासातील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कोणत्याही कादंबरीतील प्रवाहीपणा टिकून रहातो, कादंबरी पुढे जाते ती त्यातील निवेदनामुळे. निवेदनातून कथानकाला गती देणे, पात्ररेखाटन करणे, परस्परांतील संघर्ष व्यक्त करणे, जीवनदृष्टीचे प्रकटन करणे असे विविध हेतू साध्य केले जातात. हे सर्व साध्य करण्यासाठी विविध निवेदन अथवा कथन पद्धती वापरल्या जातात. आत्मनिवेदनपर किंवा प्रथमपुरूषी निवेदन पद्धती, साक्षीभूत त्रयस्थाची किंवा तृतीयपुरूषी निवेदन पद्धती, पत्ररूप निवेदन पद्धती, रोजनिशी स्वरूपाची निवेदन पद्धती अशा अनेक निवेदन पद्धती कादंबरी लेखनाच्या कथनासाठी वापरल्या जातात. या सर्वच प्रकारांची काही सामर्थ्ये व काही मर्यादा आहेत. प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीत. लेखक कादंबरीतील एका वा अनेक पात्रांशी स्वतःची एकरूपता कल्पून लेखन करतो म्हणजे कादंबरीतील एखाद्या पात्राच्या मुखातूनच लेखक बोलत असतो. पात्राच्या अंतरंगात प्रवेश करून मनोविश्लेषण करण्याच्या दृष्टीने लेखकाला ही पद्धती सोईची जाते. विविक्षित पण मर्यादित दृष्टिकोन, सहजप्राप्त होणारा एकसूत्रीपणा व मनोविश्लेषणाची सोय असे अनेक फायदे या पद्धतीत आहेत. मूळ लेखकाचे अस्तित्व झाकून सत्याचा आभास निर्माण करणे त्यामुळे शक्य होते. या पद्धतीच्या काही मर्यादाही आहेत. या पद्धतीत लेखकाची भूमिका कादंबरीतील एका पात्राची होत असल्यामुळे कित्येक प्रश्नांवर सर्वबाजूनी चर्चा होण्यापेक्षा विशिष्ट दृष्टिकोनातून एकांगी चर्चा होण्याचा संभव असतो. दुसरा दोष म्हणजे कादंबरीतील जे पात्र निवेदन करीत असते त्याच्याबद्दल इतरांना काय वाटते हे सांगता येत नाही. काहीवेळा लेखक कादंबरीतील एकाच पात्राशी तादात्म्य पावण्याऐवजी क्रमाक्रमाने सर्वच पात्रांशी आपले तादात्म्य साधतो हा आत्मनिवेदनपर कादंबऱ्यांचा दुसरा प्रकार आहे. यात पहिल्या प्रकारापेक्षा लेखकाला थोडे अधिक स्वातंत्र्य मिळते पण लेखनाचा प्रवाह खंडित होण्याची शक्यता असते.

पत्रात्मक कादंबऱ्यांत लेखक निरनिराळ्या पात्रांच्या माध्यमातून पत्रे लिहीत असल्याने एकाच प्रश्नाचा विविधांगाने विचार शक्य होतो. पण यातील मर्यादा म्हणजे प्रत्येक पात्राला एकमेकांपासून दूर ठेवावे लागते त्यामुळे कादंबरीत संभाषण व संवाद यांचा अभाव आढळतो व कादंबरीतील जीवंतपणा लुप्त होतो. या प्रकारच्या कादंबरी लेखनाचा आणखी एक प्रकार म्हणजे रोजनिशी स्वरूपाचे लेखन. यात कोणत्याही एका किंवा अनेक पात्रांशी एकरूपता साधता येते पण अशा कादंबऱ्यात सर्व घटकांचा परिपोष योग्यरीतीने न झाल्याने या कादंबऱ्या तेवढ्या परिणामकारक ठरत नाहीत.

तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीत लेखकाचा प्रत्यक्ष कादंबरीतील कथानकाशी कोणताही संदर्भ नसतो तो त्रयस्थाप्रमाणे त्याकडे पहात असतो व कथानक सांगत असतो. कादंबरीतील कोणत्याही एकाच पात्राशी त्याचे तादात्म्य नसल्यामुळे लेखनात एकांगीपणा येत नाही व लेखनाच्या सर्व अंगांचा परिपोष साधणे लेखकाला साध्य होते. फक्त मनोविश्लेषण तेवढे परिणामकारक ठरत नाही पण या पद्धतीत अनेक फायदे असल्याने अनेक लेखक हिच पद्धती स्वीकारताना दिसतात. आजकाल निवेदनाच्या संदर्भात आणखी ही अनेक प्रयोग केले जातात. आज एकाच कादंबरीत तृतीयपुरूषी व प्रथमपुरूषी अशा दोन्ही निवेदन पद्धतीचा वापर केला गेल्याचे दिसते. एकाच कादंबरीत या दोन प्रकारांसोबतच पत्रात्मक व रोजनिशी अशा निवेदन फद्धतीचा देखील वापर केला जातो. या सर्व पद्धतीचा एकत्रित विचार करून वैहायस व दृष्यात्मक निवेदन पद्धती देखील मानल्या जातात.

वैहायस पद्धतीत लेखकाची भूमिका मार्गदर्शकाची वा वाटाड्याची असते, तो आपण निर्माण केलेल्या कादंबरीच्या कल्पनात्मक सृष्टीत आपणाला घेऊन जातो व तेथेही वाटाड्याचे काम करतो. हे करताना स्वतः त्या कथानकापासून अलिप्त रहाण्याचा प्रयत्न करतो. ही निवेदनात्मक पद्धती असते. प्रारंभिच्या अनेक कादंबऱ्यांतून बहुदा हिच पद्धती वापरली जात असे ती तृतीयपुरूषी असेल किंवा प्रथमपुरूषी परंतु त्यात फक्त निवेदनाच्या माध्यमातून कथानक पुढे जात असे त्यामुळे अशा कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी निवेदकच असायचा. आधुनिक काळात अनेक लेखक दृश्यात्मक पद्धतीचा वापर आपल्या लेखनांत करताना दिसतात. दृश्यात्मक पद्धतीमध्ये कथानक निवेदकाच्या माध्यमातून पुढे जाण्यापेक्षा पात्रेच कथानक पुढे घेऊन जाताना दिसतात. लेखक स्वतः शक्यतो अदृश्य असतो व तो वाचकासोबत आपणही घडणारी कादंबरी पहात असतो. या पद्धतीत लेखक कादंबरीतील पात्रांचा आपणाला परिचय देतो, विविध दृश्यांची योजना करतो पण स्वतः कोणतीच माहिती पुरवीत नाही. स्वतःची मते बनविण्यास वाचक मोकळे असतात. वैहायस पद्धतीत कादंबरीतील कथानक निवेदनाच्या रूपाने पुढे जाते. दृश्यात्मक पद्धतीत कथानकाच्या प्रगतीचे विविध टप्पे दृश्यरूपाने दाखवले जातात यात अगदीच निवेदन नसते असे नव्हे पण ते अत्यंत मर्यादीत असते. या दोन्ही पद्धती तृतीयपुरूषी व आत्मनिवेदनपर दोन्ही प्रकारच्या कादंबरीत दिसून येतात. हे सर्व जाणून घेतल्यानंतर अभ्यासासाठी निवडलेल्या ज्या कादंबऱ्या आहेत त्यांचे स्वरूप आपणाला जाणून घ्यायचे आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता, ‘बारोमास’ व ‘चाळेगत’ या दोन कादंबऱ्यांमध्ये निवेदनाच्यासंदर्भात काही प्रयोग केले गेल्याचे दिसतात. मुख्यतः ‘चाळेगत’ मध्ये बरेच प्रयोग करण्यात आले आहेत. ‘चाळेगत’ मध्ये निवेदनाची प्रचंड गुंतागुंत आहे. त्यात तृतीयपुरूषी निवेदक आहे जो सुरूवातीला

आपणाला लेखकाची गोष्ट सांगण्यास सुरूवात करतो. निवेदक; कवी होता आणि आता लेखक होतोय, अशा लेखकाची गोष्ट सांगताना दिसतो. एक दोन परिच्छेद झाल्यावर कवी मी आणि कवीचा झालेला लेखकही मीच अशी सुरूवात करीत लेखकच आपल्याशी संवाद साधताना दिसतो. म्हणजे कादंबरी प्रथमपुरूषी निवेदन करू लागते. पुन्हा काही परिच्छेद झाल्यावर खिडकी उघडली तर समोर लेखक असे म्हणत पुन्हा निवेदक येताना दिसतो. कधी लेखक आपले स्वप्न सांगताना ‘magical realism’ चा ही वापर करताना दिसतो. ज्याचा वापर साधारणतः मराठी कादंबरी लेखनात झाल्याचे दिसत नाही. दशावतारी नाटकातील; आपल्या नाटकातील भूमिकेतून वास्तव जगात व वास्तव जगातून पुन्हा आपल्या भूमिकेत अशी लवचीक सांधेजोड करणारे संकासुराचे पात्र पाहिल्यानंतर कादंबरीच्या जगातून वास्तव जगात व वास्तव जगातून पुन्हा कादंबरीत जाता येईल असा लवचीक बंध आपण स्वीकारला पाहिजे असे लेखकाला वाटते, जेणेकरून कादंबरीतील कल्पित जग आणि प्रत्यक्षातील वास्तव जग याची सांधेजोड करता येईल. लेखक यासंदर्भातील विवेचन करताना म्हणतो, “कादंबरीची काही सूत्रं माझ्या डोक्यात आहेत. विस्कळीत स्वरूपात. गेली काही वर्षे मी ती डोक्यात घोळवतोय. अधूनमधून लिहिण्याचा प्रयत्नसुद्धा करतोय. उलटसुलट पद्धतीनं वेगवेगळ्या प्रकारे सुरुवात करतोय. प्रत्येक वेळी मला सतत जाणवतंय, आपण काहीतरी गोष्ट रचू पाहतोय. वास्तवाच आधार घेत कादंबरीसाठी आवश्यक अशी आकृती आपण घडवू पाहतोय. त्यासाठ निर्माण केलेली काल्पनिक पात्रं आणि त्यांची गोष्ट घटना-प्रसंगांतून, निवेदकाच्य भाष्यातून किंवा तटस्थ निवेदनातून उलगडत जाणारी. पण नेमकं हेच तर सगळे मला विसंगत वाटतेय! मला ज्या काही माझ्या आकलनानुसार उलगडणाऱ्या थोड्याफार गोष्टी सांगायच्यात, त्यासाठी हा प्रचलित कहाणीवाला फॉम अपुरा वाटतोय. त्याच्या मर्यादा जाणवतायत. किंवा माझीच मर्यादा असेल ती! मला त्य पद्धतीनं हवं तसे व्यक्त होता येत नसेल. काहीही असो, मला जे सांगायचंय ते असं सांगितलेलं मला नकोच आहे. नक्की काय सांगायचंय ते मला पक्कं माहीत आहे. पण त्याची अशी पारंपरिक धाटणीची गोष्ट मला मुळीच करून टाकता येणार नाहीये. म्हणून कदाचित संकासुराची लवचीक अभिव्यक्ती मला जवळची वाटली असावी. आपल्याकडल्या सगळया मांडण्याही अशाच तर आहेत ना, स्वत: च्या दैनंदिन जगण्यासकट सगळ्या दुनियेला सामावून घेत पुढे जाणाऱ्या! अर्थात हेही खरं, की त्यांत थेटपणं सांगितलेली नसली तरीदेखील गोष्ट असते. नि गोष्टीबाहेरचं बाकीचं सगळेही. भूगोल इतिहास, राजकारण, समाजकारण, नैतिकता, उपदेश, संस्कृती गाणी…… असं सगळच मला ते जास्त महत्त्वाचे वाटते” [5] लेखक कादंबरी का लिहितोय आणि त्याला कादंबरीच्या आविष्काराच्या अंगाने प्रयोग का करायचे आहेत, याचे स्पष्टीकारणच या ठिकाणी होते.

कादंबरीतील जग पूर्ण वास्तव नाही ते कल्पित आहे परंतु त्याच बरोबर ते वास्तवाला समांतर देखील आहे. या दोन्ही जगाचे दर्शन लेखकाला एकाच कादंबरीत एकाच पातळीवरून घडवायचे आहे म्हणून तो एका निवेदकाची देखील निर्मिती करताना दिसतो. लेखकाला आपलं स्वतःच जगणं, लेखक या पात्राचं जगणं आणि लेखकांने निर्माण केलेल्या पात्रांचं जगणं हे सगळे दाखवायचं आहे. हे सर्व तटस्थपणे दाखविण्यासाठी लेखक तृतीयपुरूषी निवेदक घेतोय. आर्थात निवेदक म्हणजे आपलाच आतला आवाज असेही लेखक म्हणतो (पृ. 43) परंतु तो त्याचाच आवाज असेल तर तो तटस्थपणे निवेदन कसे करील? हा देखील प्रश्न आहे. कादंबरीत अनेककडे निवेदक व लेखक यांचा संवाद आहे तसा लेखक ‘येरू’ असे म्हणत असलेल्या आपल्या अंतरात्म्याशी देखील संवाद करताना दिसतो. एकूणच निवेदनाच्या संदर्भात आजपर्यंत झाले नव्हते असे वेगळे प्रयोग लेखकांने या कादंबरीत केले आहेत. अर्थात हे सर्व प्रयोग वाचकाला कादंबरीच्या आशयाच्या अधिक निकट घेऊन जातात का? हा देखील प्रश्न आहे. भाषिक प्रयोग आशयनिष्ठ असतील तरच त्यांना प्रयोग म्हणून अर्थ असतो, या संदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात यांनी नोंदविलेला अभिप्राय महत्त्वाचा आहे ते म्हणतात, “संपूर्ण कादंबरीभर हा संकासूर लेखकाच्या मनात वस्ती करून आहे. वास्तव काय आहे, वास्तवातले काय घ्यायचे, कोठून घ्यायचे, त्यावर काय संस्कार करायचे या गोष्टीविषयीचे निर्णय यामुळेच ‘चाळेगत’मध्ये प्रवेश करतात. या संकासुरी पवित्र्यामुळेच लेखक कादंबरीत पात्र म्हणून वस्ती करायला येतो. यामुळेच तो घटनाक्रमाकडे वेगवेगळ्या पातळ्यांवर जात वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यांमधून पाहू शकतो. पात्रांकडे वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून ती घडवली जात असताना पाहणेही यामुळेच शक्य होते. आपलीच निर्मिती आपल्या तळहातावर घेऊन पाहणेही यातून साधते. यामुळेच कादंबरीतील घटनाक्रमाच्या पातळीवरील एकरेषीयता सर्जनशील रीतीने उद्ध्वस्त केली जाणे शक्य होते आणि वास्तवाची अस्ताव्यस्तता व जटिलता कादंबरी आपल्यात मुरवून घेऊ शकते. निर्मितीची ही प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची करणारे आणखी एक पात्र ‘चाळेगत’मध्ये आले आहे. हा लेखकाने निर्माण केलेला निवेदक आहे. कादंबरीची संहिता यामुळे द्विखंडित होते. तिच्यातील काही भाग लेखकाचा आहे, तर काही भाग निवेदकाचा आहे. त्यांची एकमेकांशी होणारी चर्चाही अनेक ठिकाणी येते आणि तंत्रदृष्ट्या सर्वकाही पाहणारा, ऐकणारा कथाबाह्य निवेदक कादंबरीत प्रवेश करतो व संहितेच्या निर्मितीचा तिसरा भागीदार निर्माण होतो. सर्कशीतल्यासारखी किंवा संकासुरासारखी ही सर्व कसरत ‘चाळेगत’च्या पानापानात केवळ रचनाकौशल्याची चूष म्हणून आली आहे, असे म्हणता येणार नाही. तिचा संबंध जगण्याच्या, वास्तवाच्या स्वरूपाशी आहे. ते

सतत बदलते, आकलनाच्या कक्षेत येणे नाकारणारे, निश्चित उत्तरांना बगल देणारे आहे. अशा वास्तवाला सामोरे जाण्यासाठी तेवढाच लवचीक आकृतिबंध शोधण्याचा हा प्रयत्न वाखाणण्याजोगा आहे.

या प्रयत्नात काही त्रुटी आहेत, असे दाखवता येईल. उदाहरणार्थ, संकासुराचे प्रारूप आणि वास्तवाच्या पातळीवर येऊन त्यांने लोकांशी साधलेला संवाद यांमध्ये स्वच्छ विभाजनरेषा अधिक प्रभावी रीतीने दाखवता आली असती. संकासुराचे दशावताराच्या खेळातील वर्तन काढता येते. म्हणून तर तो लवचीक ठरतो. कादंबरीमध्ये वास्तव आणि कल्पित यांच्यामधील विभाजनरेषा कधीही सुस्पष्ट होत नाही. कादंबरीबाहेरचा लेखक हा कादंबरीतील एक पात्रही आहे. कादंबरीच्या कल्पित जगात तो वावरतो आहे. या लेखकाला कादंबरीवाला वस्तुनिष्ठा ठळकपणे पाप्त करून देण्यात कादंबरी अपुरी पडते. संकासुराचे प्रारूप लेखकाने अधिक कसोशीने वापरले असते तर तिला खातरीने अधिकीची परिमाणे प्राप्त झाली असती. ती मग कोकणापुरती मर्यादितही राहिली नसती. संकासुराच्या प्रारूपाविषयीचे कादंबरीमध्ये केलेले विवेचन वर उद्धृत केले आहे. त्यांतील सर्व शक्यतांचा उपयोग ‘चाळेगत’ने करून घेतला आहे, असे म्हणता येणार नाही. लेखक आणि निवेदक यांच्यातील संबंधांचे आणखी काही पदर जर कादंबरी दाखवू शकली असती तर तिच्या संरचनेत महत्त्वाचे बदल झाले असते. लेखक आणि निवेदक यांच्यामध्ये म्हणावे असे कोणतेही भेद कादंबरीत स्पष्टपणे उभे राहत नाहीत. लेखकही बोलतो आहे आणि निवेदकही बोलतो आहे. दोघांच्या भूमिकेत आणि मूल्यव्यवस्थेतही कोणताही भेद नाही. आपल्या जवळच्या मित्राला मदत करावी तसा निवेदक लेखकाला मदत करतो आहे. त्याच्याकडे फक्त रंगवून सांगण्याचे काम सोपवलेले आहे. लेखकाचा लेखनिक असावा असा तो बोरू घेऊन कुरूकुरू लिहायला तयार आहे. वस्तुतः लेखक आणि निवेदक यांच्यातील संबंध अत्यंत गुंतागुंतीचे असतात. दोघांच्या अस्तित्वाच्या सत्ताशास्त्रीय पातळ्या वेगवेगळ्या असतात. कादंबरीच्या संहितेच्या प्रत्येक शब्दाची जबाबदारी निवेदकाची असते. तेथे लेखक प्रवेशच करू शकत नाही. कादंबरीच्या कल्पित जगात निवेदकाचं वास्तव्य असते. कादंबरीच्या कल्पित जगाशी, त्यातील मूल्यव्यवस्थेशी निवेदक आतून जोडलेला असतो. हे जग त्याच्या सत्तेमधून आकाराला येत असते. निवेदकाची मूल्यव्यवस्था लेखकापेक्षा भिन्न असू शकते. तो अविश्वासार्ह असू शकतो. लेखक कादंबरीच्या व कादंबरीने निर्माण केलेल्या जगाच्या बाहेर राहत असतो आणि स्वत: मूक राहून बाहेरून सूत्रे हलवीत असतो. कादंबरीत लेखकाला प्रवेश करायचा झाला तर तो त्याचे पात्रात रूपांतर झाले तरच शक्य होते. लेखकाचे असे पात्रात रूपांतर ‘चाळेगत’ने अर्थातच केले आहे. तथापि, हे घडते तेव्हा त्याची लेखकपणाची सत्ता नाहीशी झालेली असते. ती त्यांने अगोदरच निवेदकाला बहाल

केलेली असते. अशा वेळी लेखक आणि निवेदक यांच्यामध्ये पराकोटीचे खटके उडण्याची शक्यता असते. मूल्यांसंबंधीचा संघर्षही त्यातून निर्माण होऊ शकतो. 'मला हे अभिप्रेत नव्हते, हे तू का सांगतो आहेस?' या प्रकारचे प्रश्नही लेखक निवेदकाला विचारू शकतो. 'हा माझा प्रांत आहे, त्यात काय घडवायचे, काय दडवायचे, काय सांगायचे याची जबाबदारी माझी आहे, तुझा त्यातील हस्तक्षेप मुळीच मान्य केला जाणार नाही' अशी निर्वाणीची भूमिकाही निवेदक घेऊ शकतो. लेखक आणि निवेदक यांच्यातील अंतरायाला 'चाळेगत'ने स्पर्श केलेला नाही. तथापि, 'चाळेगत'ने जे केले आहे ते कमी महत्त्वाचे नाही. वास्तवाने समोर उभे केलेले प्रश्न रूपबंधाच्या पातळीवर झेलण्याचा तिचा प्रयत्न मूल्ययुक्त आहे, हे नि: संशयपणे मान्य करावे लागते. स्वातंत्र्य, समता, बंधुता, विवेक या मूल्यांच्या बाजूने ती उभी राहिली आहे." [6] या प्रयोगशीलतेचे एकूण स्वरूप लक्षात यावे म्हणून डॉ. थोरातांचे मत विस्तृतपणे उद्धृत केले आहे. त्यांनी निवेदनातील ज्या तृटी दाखविल्या आहेत त्या निश्चितच लक्षात घेण्यासारख्या आहेत. त्याचप्रमाणे, निवेदक आणि लेखक यांच्या संदर्भात त्यांनी केलेली चर्चा तेवढीच अर्थपूर्ण आहे. 'चाळेगत' कादंबरीचा विचार करीत असताना या सर्व निवेदनातील प्रयोगशीलतेमुळे लेखक काय करण्यास यशस्वी झाला, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केल्यास, कोणतेच एक कथानक न सांगता; वास्तवाचे अनेक तुकडे संज्ञा प्रवाही पद्धतीने एकमेकांशी जोडणे या कादंबरीत शक्य झाले आहे व त्यामुळे या कादंबरीचा पट विस्तृत झाला आहे. कोकणच्या अवकाशात हे सर्व घडत असले तरी हा अवकाश किती विस्तृत आहे हे दाखविणे यामुळे शक्य झाले आहे. एकच कथानक निवडल्यास हे शक्य झाले नसते. अनेक वेळा निवेदक बाह्य वास्तवातील घटीतांचे काही तुकडे निवडून किंवा त्यांची काही एक सांगड घालून आपले आकलन व्यक्त करताना दिसतो. तर लेखकाच्या माध्यमातून लेखकाची मनोभूमिका व्यक्त होते. त्याचे वैयक्तिक जीवन व लेखकाची नैतिक भूमिका देखील कादंबरीतून व्यक्त होते. खरेतर अनेक वेळा इतर पात्रमुखी निवेदन देखील आले आहे. त्यामुळे फक्त द्विखंडात्मकच नव्हे हे निवेदन त्यापेक्षा ही अधिक पातळ्यांवर कादंबरीत आले आहे. रोजनिशीचा वापर देखील निवेदनात करण्यात आला आहे. एवढे करूनही बाह्य जगात होत असलेले बदल घातक असले तरी त्याला अमूक एक घटना, व्यक्ती, व्यवस्था जबादार आहेत हे सांगण्याचे टाळत, बदलाचा पट समोर मांडत, अर्थनिर्णयन करण्याचे काम लेखकाने वाचकांवरच सोपविले आहे. अर्थात, निवेदनातील एवढ्या गुंतागुंतीमुळे सामान्य वाचक अशा कादंबरी वाचनापासून दुरावतो हे देखील खरे आहे.

'बारोमास' कादंबरीतून देखील काहीकडे महानुभाव शैलीचा वापर लेखकाने निवेदनासाठी केला आहे जो महत्त्वाचा आहे. तसेच तृतीयपुरूषी निवेदन या कादंबरीत असले तर काहीकडे प्रथमपुरूषी निवेदनही आले आहे.

परंतु 'चाळेगत'शी तुलना करता हे प्रयोग साधे सरळ असल्याने वाचनियता खंडीत न होता ते अधिक प्रवाही होताना दिसते. त्यामुळेच, या कादंबरीला लोकप्रियता ही अधिक लाभली आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या बाकी कादंबऱ्यांचा विचार करता बहुतेक कादंबऱ्यांतून तृतीयपुरूषी निवेदन आले असून 'गावठाण' सारख्या एखाद्या कादंबरीत प्रथमपुरूषी निवेदन आले आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' सारख्या कादंबरीत अगदी हरिभाऊ आपट्यांची निवेदन शैली दिसून येते. निवेदक अनेक घटना प्रसंगावर आपली मते नोंदवतांना दिसतो. त्यामुळे या कादंबरीला पाल्हाळिकता आली आहे. या पुढील भागात निवेदनाचे जे विविध प्रकार आहेत त्याच्या अनुषंगाने अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे.

### 4.2.1 पारंपरिक कथन/ निवेदन

निवेदनाची पारंपरिक शैली म्हणजे साधारणतः सर्व लेखक वापरतात अशी निवेदनाची शैली. सरळ रेषेत कथानक सांगत जाणे यावर ही शैली भर देते. जेव्हा अनेक तपशिलातून घटनाप्रसंगांचे निवेदन केले जाते, घटनांचा कालक्रम पाळला जातो तेव्हा तिला पारंपरिक निवेदनशैली असे म्हणतात. तृतीयपुरूषी निवेदन बऱ्याचदा या शैलीत असते. व्यक्तिवर्णन, अवकाशवर्णनामध्येही या शैलीचा वापर करता येतो. खालील अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधील काही उदाहरणांवरून या शैलीचे स्वरूप लक्षात येईल.

''झाडाच्या सावलीत बापूराम कलंडला होता. एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर होताना नकळत त्याचा डोळा लागला. बाजूचा ओढा कोरडा ठणठणीत आळसावल्या माणसासारखा निपचित पडून होता. उन्हाळा वाढत चालल्यानं अंगाची लाही लाही होत होती. बाजूला पाल्यानं बांधलेल्या झोपडीत पोरांचा दंगा वाढतचं चालला होता. पण बापूरामला त्याची फिकीर नव्हती. हे रोजचं रहाटगाडगं होतं. पाठीवर विंचवाचं बिऱ्हाड घेऊन दिवाळीपासून आपल्या बैलगाडीसह बापूराम कारखान्याच्या आवारात तळ ठोकून होता. आणखी चार दिवसाचे कामं होतं. बायकापोरांना गावाकडची ओढ लागली होती. उन्हा तान्हातून फिरून पोरं अगदी काळवंडून गेली होती.[7] या पारंपरिक निवेदनशैलीतून घटना प्रसंगाची मांडणी एका सरळ रेषेत लेखक करताना दिसतो. कादंबरीतील अवकाशाची कल्पना या निवेदनातून येते त्याचप्रमाणे काळाचे भानही व्यक्त होते. पात्रांची भावावस्था टिपण्याचा प्रयत्न देखील या निवेदनातून होताना दिसतो. पुढे दिलेले दुसरे उदाहरण देखील या निवेदन पद्धतीच्या संदर्भात पाहण्यासारखे आहे.,

''सुगीला नुकतीच सुरुवात झाली होती. पार्वती, यशवंता, थोरली उषा, मधली आशा, धाकटी नकोशी सुद्धा शाळू पाडण्याच्या घालमेलीत. बेडग्याने हाताला फोड आले होते सर्वांच्या. खुंटी ठोकून वगळाला म्हस, पिप्रणीला

शेळी आणि बोकाड घाणेरीच्या झुडपात बांधले होते. झेंडू फुटल्यासारखे ऊन. घामाच्या धारेत पार्वतीचं कुंकू ओघळलं. कपाळावरच्या कुंकवाचा भाग तसाच ठेवून पदराने तिने चेहऱ्यावरचा घाम पुसला. कवळाभर बाटूक घेऊन ती गुरांना घालायला निघाली. [8] पारंपरिक शैलीतील हे निवेदन असले तरी बारीकसारीक तपशील देऊन आपल्या आजूबाजूचा परिसर जिवंत करण्याची या निवेदनातील ताकद पाहण्यासारखी आहे. त्यामुळे ही निवेदन पद्धती पारंपरिक असली तरी प्रभावी आहे व नव्वदोत्तर ग्रामीण मराठी लेखकांनी त्याचा योग्यरित्या वापर करून घेतला आहे हे देखील लक्षात येते. या निवेदनातील छोटी-छोटी वाक्ये आपणाला एका वेगळ्या भाषाशैलीचा देखील परिचय देतात.

"आग्नेयकडून उतरलेली नदी तळेपट गावचे दोन भाग करुन देवळाच्या मागच्या घळीकडून एक झोकदार वळण घेऊन वाहते. वळणावर बऱ्यापैकी कोंड तयार झाली आहे. उन्हाळ्यात नदी सुकत असली तरी या कोंडीत मात्र पाणी कायम साठलेले असायचे. त्याचा उपयोग गुरांना आणि कपडे धुवायला होई. नदी वाहती असेपर्यंत गावातील काही लोक आंघोळीसाठी यायचे ती काजऱ्याची कोंड म्हणून प्रसिध्द होती.[9] आवश्यक ते तपशील देण्यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते. अत्यंत साध्या सरळ निवेदनातून लेखक आपणाला कादंबरीतील स्थळाची माहिती देतो, त्याच बरोबर आवश्यक ते तपशील देखील पुरवतो. एकूणच नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी लेखकांनी आपल्या निर्मितीसाठी या पद्धतीचा अगदी योग्यप्रकारे वापर करून घेतल्याचे दिसते.

### 4.2.2 दृश्यात्मक निवेदन

घटना प्रसंगांचे निवेदनातून आलेले वर्णन जेव्हा चित्रमय स्वरूपात आपल्या समोर उभे राहते तेव्हा त्याला चित्रमय शैलीतील निवेदन किंवा दृश्यात्मक निवेदन असे म्हटले जाते. चित्रपटात्मक दृश्यमालिकेसारखे हे निवेदन असते वर्णनातून एखादे दृश्य अगदी नेमकेपणांने उभे करणे किंवा एका दृश्यानंतर दुसरे दृश्य रेखाटून वाचकाला जीवंतपणाचा अनुभव देणारे असे जे निवेदन असते त्याला दृश्यात्मक निवेदन म्हणता येते. वास्तवाचे अनेक संदर्भ दृश्यात्मक निवेदनाच्या आधारे व्यक्त करता येतात. अशी दृष्यात्मकता निवेदनाला परिणामकारक बनवते आणि निवेदनात गतिमानता ही आणते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील काही उदाहरणे निवडून याचे अधिक स्पष्टीकारण केले आहे.

"आता अंधार गडद झाला. तिघे बोळाच्या उजेडपट्ट्यात होते. तरी बाजूच्या मोकळ्या जागेत अंधाराचं थारोळं साचलेलं. तिथलं चिचेच झाड झिपऱ्या पसरून बसलेल्या कैदासिनीसारखं भेसूर दिसतेलं. पलीकडच्या गल्लीतल्या विजेच्या खांबावरचा प्रकाश झाडाच्या शेंड्यावर चुना मारल्यागत पसरला होता. त्या प्रकाशात

झाडाचे शेंडे कैदासिनीच्या पिकलेल्या हाट झिंज्यासारखे हलत होते. [10] चित्रमय शैलीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून 'साखरफेरा' कादंबरीतील हे निवेदन पहाता येण्यासारखे आहे. अंधार आणि प्रकाश या दोन्ही प्रतिमांचा ज्या नजाकतीने लेखकांने वापर करून घेतला आहे त्यामधून यातील दृश्यात्मकता अधिक तीव्रतेने व्यक्त झाली आहे. त्याच प्रकारे झांडांच्या शेंड्यांना कैदाशिणीच्या झिंझ्यांची उपमा देऊन तो रात्रीचा काळ अधिक कडद व काहिसा भयप्रद करण्याचे काम देखील या निवेदनांने चांगल्याप्रकारे साधले आहे. 'कापूसकाळ' कादंबरीतील पुढील उदाहरण देखील दृश्यात्मक निवेदन शैलीचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येते.

"अंधाराच्या पंखाखाली पाखरांच्या पिलागत भोत विसावलेले होते. थोडी-बहुत माणसांची हालचालच काय ती दिसत होती. अगदी वावरात डुलणाऱ्या कपाशीच्या बोंडासारख्याच आभाळात चांदण्या चकाकत होत्या. अंधारी रात आणि चांदण्याची चमचम यामुळं लवकरच बरीच रात झाल्यासारखं वाटत होतं. खरेदी केंद्राला सगळ्या बाजूनी तारीचे आणि पत्र्याचे कुंपण होते. त्या पल्याड शेडमधी हमाली करणाऱ्या कुटुंबाच्या चुली पेटल्या होत्या. पोत्याच्या तळटाचे वारधाक बांधून त्यांनी निवारा केलेला होता. घामेजल्यामुळे त्या माणसांचे अवतार अगदीच बघण्यालायक झालेले. करपलेले, रापलेले लोक आत होते आणि बाहेर उन्हानं आणि शेता-मातीत होरपळलेले लोक होते. जगू गेटासमोरून हे सगळेच पाहत होता. रानात असताना पहाटीला लगडलेला कापूस कसा फुलावाणी, नक्षत्रावाणी दिसत होता. मनाला भुरळ घालीत व्हता. पैशाचं स्वप्न दाखवत होता. दुःख हलकं करीत व्हता. त्योच कापूस आता इथं कसा निपचित पडला होता. जणू धाराशायी झाला होता. काळोखात बुडाला होता. कापसाचे सारे भोत अंधारात काळेशार दिसत होते. नाही म्हणायला त्याच्यावर बाजूला बसलेले एखादे-दुसरे माणूस त्याच्या अंगातल्या कपड्यांमुळे पांढुरके दिसत होते.[11] जे जगूच्या दृष्टीला दिसत आहे ते तसेच दृश्यात्मक पद्धतीने लेखक या निवेदनातून मांडताना दिसतो. म्हणजे जगू नव्हे तर वाचक स्वतःच हे पहात आहे असा भास त्याला झाल्याशिवाय राहत नाही. एका नंतर दुसरे दृश्य, अशी जी गुंफण या निवेदनांतून आली आहे ती देखील लक्षणीय आहे. हे निवेदन दृश्यात्मक आहे त्याच बरोबर काव्यात्म देखील आहे. ही काव्यात्मकता या निवेदनाला भाषिक दृष्ट्या अधिक सौंदर्यपूर्ण बनविते.

" दिवस परतायला लागला. गावची गुरं परतायला लागली. चारी बाजूने धूळ उडाली. नदीच्या पाण्याला तोंड लावून, मागचे खुरं फरकावीत गावात शिरू लागली. गुरांच्या पाठोपाठ बैलांच्या मानेवरचं दिवसभराचं अवघडलेलं जू खाली उतरू लागलं. एकानी दुकानी बैल घराकडे येऊ लागले. गावच्या सगळ्या रस्त्यानं येणारी गुरच झाली. त्यांच्या पायानं रस्त्यावर सोडलेल्या सांडपाण्याचा चिखल पुन्हा एकदा तुडवला. पायाला लागून

गावभर झाला. शांत झालेला गाव कलकल करू लागला. झापड पडत चालली. बैलांसमोर कडब्याच्या पेंडीच्या गाठी सुटल्या. त्याबरोबर बैलांच्या शेपटी हलायला लागल्या. बाकी गुरांसमोर आदल्या दिवशीचे उरलेले बैलांसमोरचे बुरखुंड पडले. आशाळभूतपणे ते बैलांकडे पाहत बुरखुंड चघळू लागले. गडीमाणसं भाकरी खायला मोकळे झाले. आता एकदा गिळलं की लगेच धरणीला अंग पडणार. जेवणवेळ टळेपर्यंत सगळे गाव सामसूम होणार." [12] भारत काळे यांनी 'ऐसे कुणबी भूपाळ' मधून गुरे गावात पुन्हा येणाच्या वेळचे गावातील चित्रण, अगदी नेमकेपणाने आपल्या नजरेसमोर अगदी दृश्य होऊन उभे राहील अशा प्रकरे या निवेदनातून रेखाटले आहे. गुरे गावाकडे येण्याच्या एकाच घटनेतील त्यांनी टिपलेली दृश्यात्मकता चकित करणारी आहे लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा प्रत्यय देखील यामधून येतो. या सर्व विवेचनातून  दृश्यात्मक निवेदनामुळे कादंबरीची वाचनियता वाढण्यास खूप मदत होते असे म्हणता येते.

### 4.2.3 वक्तृत्वपूर्ण निवेदन

चळवळीत वावरणारे कार्यकर्ते, प्राध्यापक, राजकीय नेते अशा व्यक्तींच्या व्यक्तिदर्शन करण्यासाठी या निवेदन पद्धतीचा आधार अनेकदा लेखक घेताना दिसतात. या निवेदनातून त्या पात्राची जीवनदृष्टी, त्याचा समाजकडे पाहण्याचा दृष्टिकोन, ज्या चळवळीशी किंवा आंदोलनाशी ती व्यक्ती जोडलेली असते त्याचे भान अशा निवेदनातून व्यक्त होत असते

"आम्ही विनंती करायला आलेलो नाही. धर्मरक्षी म्हणाले, 'आम्ही हक्क मागाय आलोय. आम्हाला हा देश जर सुखाने जगू देणार नसेल तर आम्ही या देशात कुणाला सुखाने जगू देणार नाही. आज एवढी ताकद आमच्यात आहे. आम्ही आज फक्त रस्त्यावर आलो आहोत; उद्या आम्हाला न्याय मिळाला नाही तर हा देश पेटवून काढू...' सत्यपाल धर्मरक्षीचा आवाज टीपेला पोहचला आणि नेहमीसारखा तो फाटला.[13] साध्या साध्या गोष्टींवरून देश पेटवण्याच्या गोष्टी करणाऱ्या धर्मरक्षीचा उतावळेपणा या निवेदनातून दिसून येतो. त्याच प्रमाणे त्याच्या बोलण्यातील बाष्कळपणा देखील दिसून येतो. आवाज टिपेला पोहचला आणि फुटला हे सांगताना त्याचे वर्तन ज्या सूक्ष्मतेने लेखकाने सूचीत केले आहे ते देखील लक्षात घेण्यासारखे आहे. 'बारोमास' कादंबरीतील खालील निवेदन संवादात्मक स्वरूपाचे असले तरी ते आजच्या कृषी व्यवस्थे संदर्भात काही एक निश्चित विधान करणारे आहे. तेजराव खपकेचा कृषी व्यवस्थेकडे आणि आजच्या शेतकऱ्यांच्या जगण्याकडे पाहण्याचा एक निश्चित दृष्टिकोन त्यातून व्यक्त होताना दिसतो.

"पाप-पुण्याचं काय खरं असते तात्या?'

तूच सांग. शेतकऱ्यांच्या पोराले जवानी येती का? तुले जवानी आली का?'

'म्हणजे?'

'म्हन्जे आसं की शेतकऱ्यांच्या पोराचं डायरेक प्रमोशन व्हते. बालपणातून म्हातारपणात. कावून की कुणबिक हाती आली की त्याच्यामागं चिंताच एवढ्या लागतात की त्यो जवानीत म्हतारा होऊन जाते. रोजचा दिवस चिंतेचा. आज काय त पाऊस पडल का? उद्या काय त बियाची सोय लागंल का? किराणा, कपडे, लगन-कार्य, मरणं-धरणं... अन् सम्दं दुखणं थांबते कुठी? पैशाजवळ... शेतकऱ्याजवळ पैसाच येत नाई. म्हणूनच म्हन्तो आता शेतीचं अर्थशास्त्र लय इतळलं. अन् फाटल्यावर शिवता येते. इतळल्यावर कुठी शिवता येते?'[14.] वरील तेजराव खपके याच्या संवादाच्या माध्यमातून हे वक्तृत्वपूर्ण निवेदन साकार झाले आहे. तेजराव खपकेचे चळवळे व्यक्तिमत्त्व त्यातून दिसतेच त्याच बरोबर शेती बद्दलचा अभ्यास आणि तळमळ देखील दिसते. परिस्थिती त्याला असलेली जाण किती प्रगल्भ आहे हे देखील दिसून येते.

**4.2.4 काव्यात्म निवेदन**

निवेदनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी अनेकवेळा काव्यमय निवेदनाचा वापर केला जातो. वास्तववादी लेखनात कलात्मकता येण्यासाठी म्हणून देखील काव्यात्म निवेदनाचा आधार अनेकदा घेतला जातो. खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील अशी अलंकारिक काव्यात्मकता अनेकदा पहायला मिळते. खांडेकरांच्या कादंबरीतील सुभाषित वजा वाक्ये याच काव्यात्म शैलीत अंतर्भाव होणारी आहेत. अर्थात यातून अनेकदा कृत्रिमता येण्याची खूण मोठी शक्यता असते जे आपणाला खांडेकरांच्या कादंबरीतील झालेले दिसते. निवेदनात सौंदर्यनिर्मिती करण्यासाठी, वाचकांना खिळवून ठेवण्यासाठी, काव्यमय निवेदनाचा वापर अगोदर होत असे. एकार्थी, हे रंजनप्रधानतेचेच लक्षण ठरते. वास्तववादी कादंबरीत अकारण आलेली अलंकारिता निवेदनात कृत्रिमता निर्माण करू शकते मात्र अशी रंजनप्रधानता टाळूनही पात्रांची मानसिकता, हतबलता, परात्मता व्यक्त करण्यासाठी काव्यमय निवेदनतंत्राचा वापर करता येणे शक्य असते.  अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता काही कादंबऱ्यांमधून असे काव्यात्म निवेदन आल्याचे दिसून येते. उदा, “आता ओढ्यात सांडलेल्या उन्हावर एक लवथवती ऊनऊन शांतता हेलावू लागली” [15] ‘साखरफेरा’ मधील अगदी छोट्याश्या वाक्यातून आलेले हे निवेदन काव्यात्म निवेदनाचा नमुना म्हणून पहाता येते.

“घुसलं पाह्यजे यार, एकदाचं, कुठून तरी जराशी तरी फट शोधून. रीघ करून.

कादंबरी लिवायचं ह्ये म्हणूनच इत्कं इज्झी प्रक्रण नाह्ये, येरूभौ!

खुळखुळा होऊन जावा आपला, असं काय असतं ते? काय असतं ते, आतबाहेर शोधूनही सापडू नये असं? आणि तरीही बिलगतात जी दिवसा-रात्री-जागेपणी-भानावर वा स्वप्नांत उदासीन अस्वस्थतेची बिलोरी फुलपाखरं आतून बाहेरून, त्यांचं काय करावं रे?"[16] या निवेदनाचा शेवट काव्यात्म पद्धतीचा आहे हे लक्षात येते. आपण एखादी कविताच वाचत आहोत असा भास होतो.

".... प्रश्न ... प्रश्न ... प्रश्न ... प्रश्न ...

प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न प्रश्न

…………………………………........?

….?.....?......?.......??????

प्रश्न... प्रश्न... प्रश्न... प्रश्न... प्रश्न... प्रश्न... प्रश्न... प्रश्न उत्तरं नसलेल्या प्रश्नांच्या मनाला डंख मारणाऱ्या इंगळ्या.

मस्तकात भिनत जाणारं असमाधानाचं, बेचैनीचं, उदासीनतेचं विष.

आणि सर्वांगाला वेढून राह्यलेली अस्वस्थता

आणि फस्ट्रेशन आणि अगतिकता

आणि चरफडाट

आणि नुस्ता नुस्ताच वांझोटा संताप

झेंटसुद्धा वाकडं नाय करू शकत आपण या मुर्दाड व्यवस्थेचं तिच्याऽ मायलाऽऽ" [17] या वरील निवेदनांत काव्यात्मकता आहेच किंबहुना आपण एखादी कविताच वाचत असल्याचा भास हे निवेदन वाचताना होतो. या निवेदनातील वैशिष्ट्य म्हणजे यात काव्यात्मकता आहेच पण यातील चिन्हात्मकता ही तेवढीच महत्त्वाची आहे. आणि चिन्हात्मकतेमधून देखील काव्यात्मकता आकराला येते ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

'बारोमास' मधून येणारे काव्यात्म निवेदन मनाचा ठाव घेणारे आहे.

राखेतून नवं काय घडवता येते?

राख म्हणजे शेवटचं टोक.

राख म्हणजे अंतिम सत्य.

आणि आपण म्हणजे राख. मग कशासाठी भय... चिता... मनस्ताप?

'जातून मंग त्याच्याकडी?' [18] काव्यात्म निवेदनाच्या माध्यमातून एकनाथने मांडलेली आपल्याच जीवनाची व्यथा या काव्यात्म शैलीमुळे वाचकाला चटका लावून जाते.

### 4.2.5 संवादयुक्त निवेदन

निवेदनातून विविध हेतू साध्य केले जातात जसे की, कथानकाला गती देणे, पात्ररेखाटन करणे, परस्परांतील संघर्ष व्यक्त करणे, जीवनदृष्टीचे प्रकटन करणे इ. जेव्हा संवादयुक्त निवेदनाच्या आधारे वरील हेतू साध्य केले जातात तेव्हा त्यास संवादयुक्त निवेदन असे म्हणतात. कथात्म साहित्याच्या कथन, वर्णन, भाष्य अशा रचनेच्या अंगाप्रमाणे संवादात्मकता हे देखील निवेदनाचेच एक अंग असते. संपूर्ण संवादमयता हे नाट्यभाषेचे स्वरूप असते. कादंबरीचे निवेदन संज्ञाप्रवाही असते तेव्हाही संवादांचा वापर केला जातो. पण हे संवाद एकतर्फी, आत्मसंवाद असतात. स्वतःच स्वतःशी केलेला तो दीर्घ संवाद असतो. निवेदनरूप कादंबरीत संपूर्ण संवादमयता आणता येत नाही. वास्तववादी कादंबरीत संवादांचा वापर घटना-प्रसंगांचे कथन करणे, व्यक्तिविशेष वर्णन करणे, व्यक्तीचे विचार, मानसिकता व्यक्त करणे, स्वभावदर्शन घडविणे अशा अनेक गोष्टी साध्य करता येतात. केवळ सरधोपट पद्धतीने केलेले निवेदन प्रभावी होतेच असे नाही. संवादातून निवेदनात नाट्यमयताही आणता येते. त्यामुळे संवादमयी निवेदनाचा वापर लेखक अनेकदा करताना दिसतात. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून देखील संवादयुक्त निवेदनाचा वापर करण्यात आला आहे.

“ते काय करतील? आल्लाची गाय. बिचारे सगळ्यांना भिऊन भिऊन वागतात. म्या मोप घट् केलंय. मजा छळ त्येंला तरी कसा बगवंल? पण त्येंची जीभच उचलना. तुला सांगते माय, लग्नाला सहा महिने झाले. एक दिवस सासूरांडनं अन् जावनं सुखाची भाकर खाऊ देली नाही बग. रोज पुकाचा पाऊस पडल्यावानी किरकिर किरकिर लावलीच. [19] या संवादयुक्त निवेदनांतून ‘जिनगानी’ या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र गीता हिने आपल्या नवऱ्याचे नेमके चित्र यातून रेखाटले आहे. यात असलेली उपरोधाची छटा देखील पाहण्यासारखी आहे. ‘तणकट’ कादंबरीतील पुढील दोन संवाद देखील या संदर्भात पहाण्यासारखे आहेत.

“कसलं काम? काय न्हाई कळलं?' शेडबाळ्यानं वेड पांघरलं. 'कळंल. लवकर कळंल. डोस्कीची केसं काढाय सुरू केली की सगळे कळंल. मीबी ह्याच गावात रहाणार हाय. बघूयाच ऊन दमतंय काय रेडा दमतोय.' आक्काबा कधी नव्हे ते बाळासाहेब शेडबाळ्यावर तरपासला. [20] या संवादातून जो निवेदनात्मक परिणाम साधायचा तो नेमकेपणांने साधला आहे. त्याचप्रमाणे यासाठी म्हणींचा केलेला वापर देखील त्यातील ग्रामीण छटा व्यक्त करण्यास सहाय्यभूत ठरला आहे.

“समोर फक्त अंधारच अंधार. तळ्यातल्या पाण्यावर किरमिजी झालेला अंधार. झाडातून उभा पाझरणारा अंधार, दगडांच्या गर्दीत लदबदलेला अंधार. आकाशात फक्त अंधारच अंधार. गडद काळा. फक्त त्याच्यावर निळसर

छटा. मध्येच कुठंतरी लुकलुक करणारी एखादी अस्पष्ट चादणी, पण तीही अंधाराच्या विळख्यात निस्तेज बनल्यासारखी."[21] कबीरच्या मनातील भावना या स्व-संवादात्मक निवेदनातून जीवंत होऊन आपल्यासमोर येतात. त्याची मनस्थिती आणि आपला गाव बिघडतोय याबद्दलची त्याच्या मनाची तडफड यातून व्यक्त होते. आत्मसंवादान्मक निवेदनांतून कादंबरीतील पात्रे आणि लेखक यांच्यामध्ये भावनिक नाळ जोडण्याचे काम चांगल्या प्रकारे साधले जाते. या गोष्टीचा प्रत्यय वरील संवादातून देखील दिसतो. संवादयुक्त निवेदन पद्धतीचा विचार करीत असताना 'चाळेगत' मधील पुढील संवाद देखील पहाण्यासारखा आहे.

"रघू तांडेलासारख्याच आमकाय् काय तरी करूचां लागतलासां वाटतां.! नायतंर माकां एम्. ऐ. बी.एड. होवनय् रापणच ओढूक जावक् व्हयां. आंगठोभाद्दर आजो, चौथी पास बापूस आणि डबलटिबल ग्रॅज्युएट आम्ही .... सगळे समाजवादी साथी समान! कोण ल्हान नाय, कोण थोर नाय. कोण उच्च नाय कोण नीच नाय, एका दिलान सगळे साथी रापण ओढतऽत आपले! गुरजींचा तरी काय, ह्याच स्वप्न होतां ना?[22]

या संवादातून मनाची व्यथा व्यक्त झाली आहे. त्याच बरोबर एकूण व्यवस्थेबद्दलचा आणि समाजवादी तत्त्वज्ञानाबद्दलचा उपहास देखील व्यक्त होताना दिसतो.

"आपलं बोचकं कुणीतरी नेईल म्हणून जागं राहा लागते राजा! करतं काय? पराया मुलखात कुठून आणावं भांडेकुंडे? ते आपलं गाव थोळंच व्हय? देवं तुयं भगुनं घडीभर म्हनाले" [23] आत्मसंवाद स्वरूपाचे हे निवेदन आहे. कादंबरीतील नायकाची गाव सोडून जातानाची असाह्य अवस्था, गाव सोडण्याचे दुःख हे सगळे या आत्मसंवादान्मक निवेदनांतून व्यक्त होताना दिसते. वरील सर्व उदाहरणांचा विचार केला असता संवादयुक्त निवेदन हे महत्त्वाचे असल्याचे व अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून त्याचा अत्यंत खुबीने वापर केला गेल्याचे दिसून येते.

### 4.2.6 बोलीप्रधान निवेदन

निवेदनासाठी प्रमाणभाषेपक्षा बोलीभाषेचा वापर करण्याची पद्धत साठोत्तर काळात पुढे आल्याचे दिसते व निवेदनासाठी बोली भाषेचा वापर हा विशेषतः ग्रामीण व दलित साहित्यातून झालेला दिसतो. निवेदनामध्ये बोलीचा वापर हे वास्तववादी कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. प्रमाणभाषेपेक्षा बोलीरूप अधिक जिवंत, रसरशीत असते. त्यामुळे बोलीतून केलेल्या निवेदनालाही एक जिवंतपणा प्राप्त होतो. लेखकांने आपल्या निर्मितीसाठी जो अवकाश निवडलेला असतो त्या अवकाशाचे प्रतिनिधित्व बोलीतील निवेदन अधिक वास्तववादी पद्धतीने करते. बोलीतून भाषेची स्थानवैशिष्ट्ये प्रकटत असतात. माणसाने अंगीकारलेल्या

जीवनपद्धतीमध्ये बोलीचे स्थान महत्त्वाचे आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या काही कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या बोली भाषेतील निवेदन पद्धतीचा आढावा या ठिकाणी घेतला आहे.

"भरम्याऽ, या पायऱ्या कोण झाडणार? तुजा बा? का हातात खराटा घेऊन मी झाडू?

मी सक्काळी झाडल्या. हितं पोरं येऊन खेळत्यात. माणसं बिड्या वडत्यात. घुटका खात पुड्या टाकत बसल्यात. किती झाडलं तरी कचरा हैच.

कसरा हुणार! ही सार्वजनिक जागा हाय. पुना पुना झाडाय तुज्या बाची काय कंबर झडत्या-? [24] यातील भाषेचा वापर पहाण्यासारखा आहे. हे संवादात्मक निवेदन आहे परंतु त्यात बोलीचा वापर केल्याने गावचा अवकाश या निवेदनाला सहजतेने प्राप्त झाला आहे. त्यात काहीशी विनोदाची झालर येते ती देखील या बोलीतील निवेदनामुळे आहे. बोली भाषेतील पुढील संवाद देखील पाहण्यासारखा आहे.

"मी हातीदगडाकडं गेलो. त्येच्या खालचं घरटं बघिटलं. डोळं मिटलं. काल-आज दुपारी त्या घरट्यातल्या पिलाजवळ बसलो हुतो. नुसतं डोळं मिट् मिट् करत्याली. घरट्यासकट जळून खाक. दुपारी बघितली तवा हालत हुती नि आता मातूर कुठल्या कुठं गेली? त्येंची आई कुठं गेली आसंल? का होंच्याबरुबर जळून गेली आसंल? जळून गेली नसली तर कुठं आसंल? त्या आगीत जळताना त्यांस्नी तिनं बघिटलं असंल? काय तिचा जीव झाला आसंल? कशाचा पत्या न्हाई. थोडाबूत हाडूद वाचला खरं. आशी किती किड्या-मुंग्या पाखरं जीवाला मुकली ह्या आगीत त्येचा बी पत्या न्हाई. काय मिळीवलं पेटिवणाऱ्यानं त्येचा बी पत्या न्हाई... [25] या बोली भाषेतील प्रथमपुरूषी निवेदनातून आंदीच्या हृदयातील सर्वांप्रती असलेला सहानुभाव तर दिसतोच पण बोलीतील या निवेदनातून ती निसर्गाशी किती जोडलेली आहे हे देखील लक्षात येते. त्याच बरोबर कोल्हापूर कडील बोलीतील स्त्रियांच्या बोलीतील पुरूषवाचक रूपे आपले लक्ष वेधून घेतात. हे केवळ बोलीच्या वापरामुळे शक्य होते. बोलीतील हे पुढील निवेदनही पहाण्यासारखे आहे.

"मिरूग निघाला. आणि पाऊस चांगला पडल्यामुळं मिरगातच पेरण्या सुरू झाल्या. उनाळ पाळीला सोन्या कसा तरी चालला. पण पेरणीला त्येनं कसा करतो की, म्हणून नामू काळजीत पडलेला. मोरंडीच्या रानात पिवळा आन् चवाळीला उडीद पेरावं, म्हणून नामू सारी जांगजोड करून बसलेला. आपल्या सारखाच आजून एखादा कुणी भेटला तर बरं त्येच्या संगं सावड करावं आणि पेरण्या हेवड्या वडावं. म्हणून त्येनं आपटत हिंडत होता. [26] या बोलीप्रधान निवेदनातून जो शेतीचा अवकाश कादंबरीकारांने निवडला आहे त्याचे विशेष बोली भाषेतून सहजतेने व्यक्त होताना दिसतात. शेतकऱ्यांची शेतीशी असलेली एकरूपता आणि शेतीबद्दलची त्याची चिंता

याचे दर्शन देखील यामधून होते.  एकूणच निवेदन हे भाषिक अभ्यासातील एक महत्त्वाचे अंग आहे. निवेदन जेवढे परिणामकारक असेल तेवढी कादंबरीची मांडणी चपखल होते व तिची वाचनियता वाढते. लेखक आपले निवेदन करण्यासाठी अनेक पद्धतींचा वापर करताना दिसतात. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता या कादंबऱ्यांतून विविध निवेदन पद्धतीचा वापर झाल्याचे दिसून येते. तसेच 'चाळेगत' सारख्या कादंबरीतून निवेदना संबंधीचे अनेक प्रयोग देखील केल्याचे दिसतात, ज्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. कादंबरीच्या मांडणीमध्ये निवेदनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते हे या सर्व विवेचनांतून अधोरेखित होताना दिसते.

### 4.3. कादंबऱ्यांतील वर्णनात्मकता

कादंबरीतील निवेदनाचा विचार केल्यानंतर आता आपणाला वर्णनात्मकतेचा विचार करायचा आहे. वर्णनात्मकतेमध्ये कादंबरीतील व्यक्तिरेखा, त्या ठिकाणचा परिसर वा एकूण कादंबरीचा अवकाश या सर्वाचा समावेश होतो. हा कादंबरीच्या भाषिक अंगाचा महत्त्वा घटक असल्याने आपणाला याचे विस्ताराने विवेचन करायचे आहे.

### 4.3.1 कादंबरीतील पात्रे

कादंबरीचा विचार करताना कादंबरीतील व्यक्तिरेखा किंवा व्यक्तिदर्शन हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे आपल्या लक्षात येते. कादंबरीच्या कथानकाच्या पार्श्वभूमीवर कादंबरीकार व्यक्तिचित्रांची निर्मिती करीत असतो व कथानकाला आकार येतो तो व्यक्तिचित्रणामुळेच. व्यक्तिरेखा नसतील तर कथानक आकारच घेऊ शकणार नाही. या संदर्भात डॉ. मदन कुलकर्णी यांनी केलेले विश्लेषण महत्त्वाचे आहे ते म्हणतात, मानवी स्वभाव-मानवी वर्तन हा नेहमी वाङ्मयाचा विषय मानला गेला आहे. या मानवी स्वभावाचा तळ गाठण्याच्या प्रक्रियेतून वांङ्मय निर्मिती झालेली आहे. वाङ्मयातील व्यक्तींच्या स्वभाव गुणवैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणे म्हणजेच त्या व्यक्तीचे पात्राचे व्यक्ती दर्शन घडवणे होय [27] कादंबरीतील व्यक्तिदर्शनामध्ये मानवी स्वभावाचे दर्शन होणे तेवढेच महत्त्वाचे असते, हे मदन कुलकर्णी अधोरेखित करताना दिसतात. मानवी मन हे अथांग असते आणि त्याचे दर्शन आपणाला कादंबरीत रेखाटलेल्या व्यक्तिरेखांच्या स्वभावदर्शनातूनच होत असते. त्यामुळेच कादंबरीतील व्यक्तिचित्रण करायचे म्हणजे पात्रांच्या मनाचा शोध घेत त्यांच्या मनात काय चाललंय याचा शोध घेणे. माणसाची कृती ही त्याच्या मनातील विचारांवर अवलंबून असते. त्याच प्रमाणे, एकाद्या पात्राच्या जडणघडणीत त्याच्या आजुबाजूचा परिसर, परिस्थिती, सांस्कृतिक, सामाजिक वातावरण या सर्वाचा ही खूप मोठा वाटा

असतो. या सर्वांचा विचार करून व कथानकाच्या आशयाला अनुरूप अशी पात्र निर्मिती होते तेव्हा ती पात्र जीवंत वाटतात व कादंबरीतील आशयाला देखील अधिक अर्थपूर्ण करण्याचे काम करतात. यासाठी लेखकाला मात्रांची निर्मिती अत्यंत विचारपूर्वक करावी लागते. एकाच प्रकारचे वातावरण असले तरी दोन भिन्न स्वरूपाची व्यक्तिमत्त्वे आकार घेतात हे आपणाला वैयक्तिक जीवनात दिसते तसेच कादंबरीतही दिसते. म्हणजे मानवी स्वभावाची जडणघडण अत्यंत गुंतागुंतीची असते हे आपल्या लक्षात येते. दोन सख्खे भाऊ परस्पर भिन्न प्रवृत्तीचे असल्याचे आपण दररोजच्या व्यावहारिक जीवनांतही पाहतो. त्यामुळे कथानकाच्या अनुषंगाने पात्रांची जडणघडण करावी लागते. काहीवेळा पात्रेच जास्त शक्तिशाली होतात व ती कथानकाची मोडतोड करतात किंवा त्या कथानकाचे स्वरूप अनेक वेळा बदलते असेही घडते. त्याबरोबरच, लेखकाच्या किंवा कादंबरीतील निवेदकाच्या आदेशानुसार पात्रे वर्तन करीत आहेत असे दिसू लागले तरी देखील त्या पात्रातील व कथानकातील जीवंतपणा संपून जातो व ती पात्रे म्हणजे ठोकळे होतात. त्यामुळेच, कादंबरीतील पात्ररचना ही कादंबरीकारासाठी दोरीवरची कसरत असते असे म्हणण्यास हरकत नाहीं. कादंबरीकार नुसती पात्रे निर्माण करीत नसतो तर त्या माध्यमातून जीवनावर भाष्य देखील करीत असतो. त्यामुळे कादंबरीतील व्यक्तिरेखा या अत्यंत महत्त्वाच्या आहेत हे आपल्या लक्षात येते. या संदर्भात विल्यम ई. बॅरेट यांनी व्यक्त केलेले व मदन कुलकर्णी यांनी आपल्या पुस्तकात उद्धृत केलेले मत फार महत्त्वाचे आहे. विल्यम ई. बॅरेट म्हणतात, "श्रेष्ठ कादंबरी एखाद्या कल्पित व्यक्तीचे जीवन चरित्र असते आणि जेव्हा ते पूर्ण होते तेव्हा व्यक्ती कल्पित राहात नाही तर त्याच्या निर्मात्याप्रमाणे ती जिवंत व सत्य बनते. (पण) यासाठी, पात्रांच्या व्यक्तिदर्शनात मानवसामान्यता व व्यक्ती वैशिष्ट्ये हे दोन पैलू एकत्र आले पाहिजेत"[28] हे विश्लेषण लक्षात घेता कादंबरीतील व्यक्तिरेखा हा घटक किती महत्त्वाचा आहे हे सहजतेने समजते. या पार्श्वभूमीवर जेव्हा अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून चित्रित झालेली पात्रे कशा स्वरूपाची आहेत याचा आपणाला आढावा घ्यायचा आहे. या सर्व कादंबऱ्या ग्रामीण पार्श्वभूमीच्या असल्याने यातील बहुतेक पात्रे ही ग्रामीणतेचे विविध विशेष घेऊन आकाराला आलेली दिसतात. ग्रामीण कादंबरी ही बऱ्याच प्रमाणात वास्तवाचे चित्रण करीत असल्याने त्या अनुषंगानेच या पात्रांची जडणघडण झाली आहे असे म्हणता येते. कधी वर्णनातून तर कधी संवादातून, कधी पात्रांच्या प्रतिक्रियेतून कधी त्यांच्या विशिष्ट अशा कृतीतून तर कधी त्यांच्या मानसिक चित्रणांतून ही पात्रे या कादंबऱ्यातून आकाराला आलेली दिसतात. ग्रामीण कादंबरीचा एक महत्त्वाचा विशेष म्हणून सांगितला पाहिजे तो म्हणजे, ग्रामीण जीवनांत सामुहिकतेला आत्यंतिक महत्त्व असल्याने अनेकवेळा हे चित्रण हे एका व्यक्तिचे असण्यापेक्षा ते एकूण शेतकरी वर्गाचे प्रतिनिधी म्हणून

कादंबरीत आल्याचे दिसते. पात्रांचे बाह्यवर्णन अनेकवेळा अत्यंत तुटक स्वरूपात येते कारण बाह्यांगाने ग्रामीण परिसरातील सर्व व्यक्ती सर्वसाधारण एकसारख्याच असतात. त्यांचे होणारे आंतरिक दर्शन मांत्र वैविध्यपूर्ण असते. त्यांची मनःस्थिती, त्यांच्या वेदना, दुःख, त्यांचा परिस्थितीशी चालू असलेला लढा, त्यांचे विचार, कल्पना, त्यांचे जगण्याविषयीचे तत्त्वज्ञान, त्यांच्या आस्था या सर्वांचे दर्शन आपणाला पात्रांच्या आंतरिक चित्रांतून होते. अर्थात, कादंबरीतील व्यक्तिचित्रणाचा विचार करताना बाह्यचित्रण व आंतरिक वा मनःस्थितीचे चित्रण हे दोन्ही घटक तेवढेच महत्त्वाचे असल्याचे लक्षात येते. काहीवेळा भाषिक लकबींद्वारे देखील व्यक्तिचित्रण रेखाटता येते. या लकबी त्या पात्रांची मानसिकता, त्यांचा सामाजिक स्तर, त्यांचे विचारविश्व या सर्वांचे चित्रण भाषिक लकबींद्वारे केलेले असते.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्या या कृषिकेंद्रीत असल्यामुळे या कादंबऱ्यांमधून ज्या व्यक्तिरेखा आल्या आहेत त्या कृषी व्यवसाय व ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या अशाच स्वरूपातील आहेत त्यामुळे एरवीच्या अभ्यासात मध्यमवर्गीय व्यक्तिरेखा, उच्चभ्रू व्यक्तिरेखा, अशाप्रकारचे व्यक्तिरेखांचे जे काही वर्गीकारण केले जाते ते या ठिकाणी गैरलागू ठरते. खरेतर, या कादंबऱ्यांमधून जी पात्रे आली आहेत ती एकूण ग्रामीण समुहाची प्रतिनिधी म्हणूनच कादंबरीतून चित्रित होताना दिसतात. त्यामुळे विकसित पात्रे, स्थिर पात्रे असे जे काही वर्गीकारण करण्यात येते ते देखील ग्रामीण कादंबऱ्यांच्या अभ्यासात तेवढेसे उपयुक्त ठरत नाही. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधील काही पात्रे प्रातिनिधिक स्वरूपात निवडून आपणाला आता या कादंबऱ्यांमधून व्यक्त झालेल्या पात्रचित्रणाचा आढावा घ्यायचा आहे. या कादंबऱ्यांमधील जी पात्रे आली आहेत त्यांची विभागणी करायची झाल्यास 1) कादंबऱ्यांच्या केंद्रवर्ती असलेली पुरूष पात्रे, 2) कादंबऱ्यांच्या केंद्रवर्ती असलेली स्त्री पात्रे, 3) खल प्रवृत्तीची पात्रे, 4) दुय्यम स्वरूपाची पात्रे, काही मोजक्या कादंबऱ्या वगळल्यास बहुतांश कादंबऱ्या या व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने पुरूषप्रधान आहेत असे नक्कीच म्हणता येते. तसेच यातील अनेक कादंबऱ्यांत फक्त एकच पात्र केंद्रस्थानी आहे असेही म्हणता येत नाही. अनेक कादंबऱ्यांत एका पेक्षा जास्त पात्रे ही केंद्रस्थानी असल्याचे दिसतात. या संदर्भात ‘असं जगणं तोलाचं’, ‘चिखलवाटा’ आणि ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबऱ्यांची उदाहरणे घेता येतील. यातील शिक्षक असलेली दोन पात्रे पहिल्या दोन कादंबऱ्यांमध्ये आहेत तर तिसऱ्या कादंबरीत शहरात नोकरी करणारे पुरूष पात्र आहे. ही पात्रे कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत असे म्हणता येते पण त्याच बरोबर, त्यांचे गावात असलेले भाऊ जे शेती पाहतात ते ही या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसतात. ‘वाहतं पाणी’ या कादंबरीतील नायक हा अभियंता आहे.

‘चाळेगत’ ‘वनराईचा लढा’ व ‘इदवास’ या तीन कादंबऱ्यांत कोणतेच पात्र केंद्रवर्ती आहे असे सांगता येत नाही. परंतु यातील पात्रे ग्रामसंस्कृतीशी संबंध असलेली अशीच आहेत. ‘भगदाड’ कादंबरीतील नायक हा शिक्षक आहे व शेतकऱ्यांबद्दल कळवळा असणारा व त्यांच्यासाठी लढणारा असा आहे. ‘तणकट’ कादंबरीतील नायक हा दलित असून विद्यार्थी आहे. व कृषिव्यवस्थेशी जोडलेला आहे. ‘बोडखी’ या कादंबरीतील नायक हा दलित समाजातील कारागीर आहे व बलुतेदार असल्याने अपरिहार्यपणे कृषिव्यवस्थेशी जोडलेला आहे. बाकी कादंबरीतील नायक मांत्र पूर्णपणे कृषिव्यवस्थेतच वावरणारे आहेत. अर्थात ही कृषिव्यवस्था त्यांनी आनंदाने स्वीकारली आहे असे म्हणण्यापेक्षा अपरिहार्यता म्हणून स्वीकारली आहे असेही दिसून येते. यासंदर्भात ‘बारोमास’ मधील एकनाथ, ‘एसईझेड’ मधील चंदू, या केंद्रवर्ती पात्रांचा उल्लेख करता येईल. ‘ऐसे कुणबी भूपाळ’, ‘फाटलेलं आभाळ’, ‘पाडा’,’साखरफेरा’, ‘कापूसकाळ’ या कादंबरीतील मध्यवर्ती पुरूष पात्रांची जडणघडण मात्र पूर्णपणे कृषिव्येवस्थेतच झालेली आहे. ‘जिनगानी’ आणि ‘गावठाण’ या दोन्ही कादंबऱ्या या स्त्रीपात्र प्रधान असून दोन्ही कादंबरीतील केंद्रवर्ती असलेली स्त्रीपात्रे कृषिव्यवस्थेशी निगडीत अशीच आहेत.

### 4.3.1.1 कादंबऱ्यांच्या केंद्रवर्ती असलेली पुरूष पात्रे

अभ्यासासाठी निवडलेल्या ज्या कादंबऱ्या आहेत त्यातील जी केंद्रवर्ती अशी पुरूषपात्रे आहेत त्यांचा आपणाला परिचय करून घ्यायचा असून एकूण ग्रामीण पार्श्वभूमीच्या संदर्भात ही पात्रे किती परिणामकारक ठरली आहेत हे देखील पहायचे आहे. ‘बारोमास’ मधील एकनाथ हे केंद्रवर्ती असलेले महत्त्वाचे पात्र आहे. तो चांगला एम्. ए. बी.एड. पर्यंत शिकला आहे परंतु गुणवत्ता असूनही डोनेशनला देण्यासाठी एक लाख रुपये नसल्याने किंबहुना जमीन विकून आईवडीलांनी ते पैसे उभे करण्यास विरोध केल्याने तो बेकार आहे व त्यातूनच तो अपरिहार्य पणे कृषीकडे वळला आहे. त्याला शेतीविषयी आवड नाही असे नाही, त्याला शेतीबद्दल आस्था आहे, प्रेम आहे आणि त्याच्या रक्तात मातीची ओढ देखील आहे परंतु आजची शेती आपणाला आणि आपल्या कुटुंबाला सुखाचे दिवस दाखवू शकणार नाही याची जाण देखील त्याला आहे. आपणाला नोकरी मिळाली असती तर नोकरीच्या आधारे आपण संसार ही आनंदाचा केला असता आणि शेती देखील त्यात पैसा घालून बरकतीला आणली असती असे त्याला वाटते. नोकरी मिळत नसल्याने त्याची सर्वच स्वप्ने विरून चालली आहेत. त्यातच याचे शिक्षण पाहून विद्यूत खात्यात अभियंता असलेल्या बापाने नोकरी लागेल या भरवशावर आपली शिकलीसवरलेली नाजूक, सुस्वरूप मुलगी याला दिलेली असते परंतु जसजसे याच्या नोकरी मिळण्याच्या आशा मंदावतात तसा नवरा-बायकोतील संघर्ष देखील वाढू लागतो. तिला एकनाथ आवडत नाही असे नाही पण

ग्रामीण जीवनाशी ती अजिबात जुळवून घेऊ शकत नाही. घरात सासूशी, दीर मधूशी व मग एकनाथशी तिचे कायम खटके उडतात. एकदा मधू सोबत तिचे भांडण होते व ती सासर कायमचे सोडून माहेरी निघून जाते. या गावातल्या खाताडात मी माझ्या मुलाला जन्माला घालणार नाही या हट्टापायी ती आपणाला मूल देखील होऊ देत नाही. एकनाथचे जीवन एवढ्या हलाखीचे आहे की जेव्हा अलका माहेरी जाण्यासाठी त्याच्याजवळ पन्नास रुपये मागते ते ही तिला देण्यासाठी त्याच्याजवळ नसतात. या सर्वातून एकनाथला नैराश्य येणं स्वाभाविक आहे आणि ते त्याला येते ही! एकूण कादंबरीत एकनाथची व्यक्तिरेखा ही नैराश्यांने ग्रासलेली आणि आत्मवंचना करणारी अशीच आहे. आपण अलकाशी लग्न करून तिच्या आयुष्याची माती केली असे त्याला वाटते. तसेच, आपण आईला पसंत असलेल्या मामाच्या मुलगी मुक्ता हिच्यिशी लग्न केले असते तर ती या जीवनात रमली असती. आईशी पण तिचे जुळले असते असे त्याला वाटते. आपण तिच्याशी लग्न न करून तिचे ही आयुष्य बरबाद केले. म्हणजे अलकाशी लग्न करून व मुक्ताशी न करून आपण दोघांचे आयुष्य उद्ध्वस्त केले म्हणून तो स्वतःलाच दोष देताना दिसतो. एकनाथ किती विमनस्क झाला आहे हे तो आंधळयाचा खेळ खेळतो त्यावरून दिसून येते. “पुस्तक वाचता वाचता त्याच्या मनात चमत्कारिक विचार आला झाले, आपल्याला डोळे आहेत. उदासीनता भरून आली की पुस्तक आपण आपलं मन रमवतो. डोळेच नसते तर आपलं जगणं किती भयान असतं? कसं वाटलं असतं? कसं वाटलं असतं हे पाहण्यासाठी मग तो उठला डोळे त्यांने गच्च लावून घेतले आणि या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत चालून पाहू लागला. मग त्यांने ठरवलं, आता दाराजवळ जायचं. बरोबर गेला. ठरवलं, आता कपाटाजवळ जाऊन हँडल उघडायचं. पण नाही साधलं. यात बरा वेळ जाऊ लागला. आणि तो अमूक या ठिकाणी जाऊन अमूक एक उचलायची असं ठरवून किंवा अमूक एक अशी गोष्ट करायची, पुस्तक उघडायचं, लाईट लावायचा असं करायला लागला.” [29] या वर्णनातून त्याची विमनस्क अवस्था सहज लक्षात येते. कधी त्याला आपले जीवन मोडक्या तलवारीसारखे वाटते तर कधी आपले आयुष्य म्हणजे उंदरामांजराचा खेळ झाला आहे असे त्याला वाटते. कादंबरी जसजशी पुढे सरकते तसतसे आपलं सगळे जीवन ही निर्थक आहे, आपण आता जगाच्या खूप मागे पडलो आहोत हे विचार त्याचा मनाला पूर्णपणे व्यापून टाकताना दिसतात. सकाळी बाहेर पडलेले धुके पाहून हे धुके सगळया रब्बी पिकाची नासाडी करणार आहे असे त्याला वाटते. आपल्या ही आयुष्यात असेच धुके पसरले असून त्यांने आपल्या आयुष्याची नासाडी केली आहे असे त्याला वाटते. निळावंतीच्या गोष्टीसारखा काही चमत्कार व्हावा आणि आपल्या आयुष्यात सुख यावे असा भाबडा विचारही त्याच्या मनात येतो. एकूणच परिस्थितीला पूर्णपणे शरण गेलेले असे हे पात्र आहे. आधुनिक सुशिक्षित

बेकार तरूणांची विमनस्क अवस्था या पात्राच्या माध्यमांतून लेखकांने नेमकेपणांने पकडली आहे. नोकरी मिळवण्यासाठी डोनेशन म्हणून एक लाख रूपये देण्यासाठी जमीन विकण्याशिवाय एकनाथ समोर दुसरा कोणताच मार्ग नव्हता का? नोकरीची संधी चालून आलेली असताना मुलाला चांगली नोकरी मिळेल या आशेवर आपली मुलगी एकनाथला दिलेला आणि विद्यूत खात्यात अभियंता असलेला त्याचा सासरा काहीच मदत कशी करीत नाही? एकनाथ कादंबरीत कुठेच कठोर भूमिका का घेत नाही? हे प्रश्न ही कादंबरी वाचताना पुन्हा पुन्हा मनात डोकावत राहतात. या एकूण परिस्थितीला बाकी सर्व घटक जबाबदार असले तरी, एकनाथचा स्वभावही बऱ्याच अंशी जबाबदार आहे असे आपणाला म्हणता येते. आधुनिक शेतीची भयाण अवस्था मात्र या पात्राच्या माध्यमातून चित्रित करण्यात लेखक चांगलाच यशस्वी ठरला आहे. मधू हा या कादंबरीतील दुसरे महत्त्वाचे असलेले केंद्रवर्ती पात्र आहे. हे पात्र काहिसे खलनायकी स्वरूपाचे वाटत असले तरी, अगदी खलनायकी पात्र असे त्याला म्हणता येणार नाही. एकनाथच्या पार्श्वभूमीवर मधूचे पात्र कादंबरीतील संघर्षाची तीव्रता वाढविण्याचे काम करते. तो चांगला सुशिक्षित आहे. व त्यांने कृषितील अभ्यासक्रम देखील पूर्ण केला आहे परंतु तो शेतीकडे ढुंकूनही पहात नाही उलट शेती करणे हा मुर्खपणा आहे हेच तो म्हणताना दिसतो. हा विरोधाभास आपणाला आपल्या शिक्षण व्यवस्थेबद्दल खूप काही सांगून जातो. तो काहिसा हूड प्रवृत्तीचा आहे त्यामुळे आपणाला पैसे हवे म्हणून शेतावरच्या बाभळी कोणाला न विचारता तो ठेकेदाराला देतो व त्या पैशांनी आपल्या गरजा पूर्ण करतो. शेतीत काम करण्याऐवजी तो रात्ररात्र गावातील आपल्या इतर काही मित्रासमवेत गुप्त धनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो यातून सहज मिळणाऱ्या पैशाची हाव त्याला आहे हे सहज लक्षात येते. त्याला तलाठ्याची नोकरी लावण्याचे आमिष सुरेश साठे दाखवतो तेव्हा त्याला देण्यासाठी जमीन गहाण ठेवून दोन लाख रुपये देण्याचा तकादा तो घरातील माणसांकडे लावतो व एका वर्षात आपण ते पैसे परत करू असे तो सांगतो, एकनाथ त्याला तलाठ्याची नोकरी करून तू एका वर्षात दोन लाख कसे परत करशील? असे विचारतो, तेव्हा नोकरीतून कुठे, मी इतर खुडण खात जाईन आणि त्यातून पैसे फेडीन असे तो सांगतो. अनैतिक गोष्टी करू नये, असे करणे चुकीचे आहे, अशी कोणतीही टोचणी त्याच्या मनाला बोचत नाही हे लक्षात येते. तो विज्ञानवादी आहे. गुप्त धन शोधण्यासाठी त्यांनेच बोलावलेला बनुबा मांत्रिक नको ते सांगून सर्वांना फसवतो हे त्याला माहीत आहे परंतु सर्व जण एकत्र रहावेत म्हणून तो मांत्रिकाचे पैसे मुकाट्याने देत राहतो व त्यांने सांगितलेले सर्व विधी देखील करीत राहतो. अलकाचे आणि त्याचे भांडण होते तो अलकाला मारहाण करतो व म्हणूनच ती घर सोडून जाते. अलकाबद्दल त्याच्या मनात राग आहे कारण त्याला एक चांगली सोयरीक आली होती परंतु अलकाने

मुलीकडील लोकांचे कान भरल्याने सोयरीक होऊ शकली नव्हती. तो कोणाचा मुलाहिजा बाळगणारा नाही. बाप जेव्हा जमीन गहाण ठेवून पैसे द्यायला नकार देतो तेव्हा बापाला "काय म्हन्ले तुमी? आमी आमचं काई करा. आमचं करणं तुमच्याकून व्हत नाई त मंग आमाले कशाले झक मारायले पैदा केलं? का आपला कंड जिरवायले?"[30] असे तोंडावर विचारायला तो मागेपुढे पहात नाही. आठ दिवस उपाशी राहून तो मळा गहाण ठेवायला बापाला बाध्य करतो व एक लाख रुपये सुरेश साठेने सांगितलेल्या माणसाकडे पोचवतो पण यात त्याची फसवणूक होते आणि नोकरीतर नाहीच मळा ही हातातील जातो व शेवट तो दरोडा घालायला सुरूवात करताना दिसतो. एकूणच पैशाला महत्त्व देणारे, विधिनिषेध न पाळणारे काहीसे हूड प्रवृत्तीचे हे पात्र एकनाथचे जे वर्णन आहे त्याच्याशी तुलना करता परस्पर विरोधी मनोवृत्तींचा ताण कादंबरीत निर्माण करण्याचा आणि तो साधण्याचे काम नेमकेपणाने करते, म्हणूनच मधूचे पात्र देखील कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे. अर्थात या देखील पात्राची शोकांतिकाच होते हे दाखवून कोणाचीही झाली तरी आजच्या कृषी व्यवस्थेत शोकांतिकाच होते हे सांगण्यात लेखक यशस्वी ठरला आहे.

कादंबरीच्या रचनातंत्राच्या दृष्टीने अत्यंत प्रयोगशील कादंबरी म्हणून आपणाला 'चाळेगत' या कादंबरीकडे पहाता येते. कादंबरी रचनेच्या पारंपरिक चौकटी मोडणारी अशी ही कादंबरी आहे. यात कोणतेच असे एक कथानक नाही त्यामुळे कथानकाच्या अनुषंगाने निर्माण झालेली पात्रे या ठिकाणी नाहीत. लेखकाच्या मनातल्या असंख्य तुकड्यातला एखादा तुकडा निवडून सूत्रधार रचना करीत आहे व त्यात इतर काही तुकड्यांची गुंफण करीत आहे त्यामुळे या कादंबरीत निवेदकच म्हणतो त्या प्रमाणे कोणतीही एक सुसूत्रता नाही पण सुसूत्र पद्धतीने एखादे कथानक सांगणे हा या कादंबरीच्या लेखकाचा हेतू ही नाही. आजच्या वास्तवाच्या काही भागावर प्रकाश टाकत आजच्या वास्तवाची दाहकता सर्वांसमोर मांडणे हेच लेखकाचे ध्येय आहे. त्यामुळे या कादंबरीत पात्रांपेक्षा निवेदनालाच जास्त महत्त्व आहे. पात्रांचा विचार केल्यास, लेखक हाच या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे आपणाला म्हणता येते. लेखक व त्याचा मित्र परिवार यांच्यातील चर्चा, त्यांचा संघर्ष, त्यांच्या राजकीय सामाजिक निष्ठा त्यांच्या अपेक्षा, त्यांचा होणारा अपेक्षाभंग, जागतिकीकरणाच्या बदलत्या लाटेत नैतिकता बाजूला ठेवून अनेक मित्रांनी जगण्यासाठी स्वीकारलेले अनैतिक मार्ग आणि या सर्वांमध्ये लेखक म्हणून आपली भूमिका याबद्दलचे लेखकाचे चिंतन या सर्वाभोवती ही कादंबरी फिरते. लेखक हाच या कादंबरीत केंद्रवर्ती पात्र आहे. आजूबाजूला सर्वत्र कल्पनातीत असे बदल होत असताना, काही एक नैतिक भूमिका घेण्याचा प्रयत्न लेखक करीत असला तरी हे होणारे बदल आपण थोपवू शकत नाही या बद्दलची लेखकाची असाह्यता

या कादंबरीतून व्यक्त होते. जी 'चाळेगत' उठली आहे तिला शांत करण्याचे सामर्थ्य लेखक म्हणून आपल्यात नाही याची जाणीव व्यक्त करतानाच, हे थांबविण्याची धमक आता कोणत्याही व्यवस्थेत नाही हे तो लेखक म्हणून अधोरेखित करताना दिसतो. आता जे होते ते स्वीकारत राहणे एवढेच आपल्या हातात आहे, असा एक निराशादर्शक सूर व्यक्त करीतच ही कादंबरी संपते. कादंबरीतील एक पात्र म्हणून आपल्या मित्रांचे उद्ध्वस्त होत जाणे लेखक थोपवू शकत नाही हे कादंबरीतील एक पात्र म्हणून लेखकाची खूप मोठी हार आहे असेही म्हणता येते. जागतिकिकरणाच्या प्रारंभानंतर निर्माण झालेली व्यवस्था ही सर्वांगीण उद्ध्वस्ततेकडे नेणारी आहे हेच या सर्वांमधून सूचित करण्यास लेखक कमालीचा यशस्वी झाला आहे. ज्या कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडल्या आहेत त्यातील 'तणकट' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. 'कबीर' हे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र असून या केंद्राभोवतीच ही कादंबरी आकाराला आल्याचे दिसते. कबीर हा दलित समाजातील शिक्षण घेणारा एक विद्यार्थी आहे. तो आपल्या आवतीभोवतीच्या परिस्थितीकडे अत्यंत समंजसपणे पाहताना दिसतो. मुख्यतः दलित-दलितेतर संघर्षाकडे तो अत्यंत डोळसपणे पाहतो हे निश्चितपणे जाणवते. दलित समाजाची स्थिती अजूनही अशी का आहे, याबद्दलचे चिंतनही तो वेळोवेळी करताना दिसतो. या पात्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तो सर्वांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे त्याच्या गोतावळयात दलित आहेत तसेच त्याचे दलितेतर मित्र देखील आहेत. ज्या  वेळी बाळासाहेब शेडबाळे म्हारवाड्यातील महारांना फूस लावून गावातील सवर्णांविरूद्ध चिथावायला सुरूवात करतो तेव्हा बाळासाहेबाला विरोध करणारा तो एकटाच असतो. गावाशी फटकून राहून म्हारवाड्याचा विकास करता येणार नाही, म्हारवाड्याचा विकास करायचा असेल तर तो गावाच्या समन्वयानेच करावा लागेल ही त्याची स्पष्ट धारणा आहे. त्यांने आंबेडकर नुसता वाचलेला नाही तर आंबेडकरांना डोळसपणे अभ्यासला आहे. म्हणूनच दलितांच्या तथाकथित नेत्यांना आंबेडकर अजिबात कळत नाही हे त्याचे स्पष्ट मत आहे. आजचे दलित नेतृत्व हे अत्यंत स्वार्थी, भ्रष्ट आणि आपल्याच लोकांचा घात करणारे असल्याने, तो कोणत्याच दलित नेत्याबरोबर जाताना दिसत नाही. गावातील म्हारवाड्यातील तथाकथित नेत्यांना व विशेषतः बाळासाहेब शेडबाळेच्या नादी लागलेल्या तरूणांना तो परावृत्त करू शकत नाही तो शेडबाळेचा कावा त्यांना पटवून देण्यास कमी पडतो हे ही तेवढेच खरे! शेडबाळे म्हारवाड्यातील अनेकांच्या डोक्यावर हजारो रुपयांचे कर्ज ठेवून सुलीला घेऊन पोबारा करतो तेव्हा या संकटातून म्हारवाडा तेव्हा आपले ऐकत नव्हता हे माहीत असूनही तो या कर्जाच्या फेऱ्यात अडकलेल्या सर्वांना सर्वोतोपरी मदत करण्याचा प्रयत्न करतो पण या वेळी देखील शहरातील दलितांचे तथाकथित पुढारी नको ती विधाने करतात आणि त्यांने आक्काबा राणेंच्या

सहकार्याने वकिलांच्या माध्यमातून जे जुळवून आणले होते ते सर्व फिस्कटते. म्हारवाड्याची होणारी दुर्दशा तो रोखू शकत नाही परंतु म्हारवाडा उद्ध्वस्त होऊ नये म्हणून त्याला शक्य ते सर्व प्रयत्न मात्र करतो. कबीरच्या माध्यमांतून आता दलित समाजात हळूहळू का होईना समंजस नेतृत्त्वाचा उदय होऊ लागला आहे हे अधोरेखित करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. आक्काबा राणे हे या कादंबरीतील मध्यवर्ती असलेले महत्त्वाचे पुरूष पात्र आहे. हा जातीने पंचकुळी, वतनदार आणि गावात खूप प्रतिष्ठा असणारा असा म्हातारा आहे. तो अत्यंत समंजस व काळाप्रमाणे आपण बदलले पाहिजेत या विचारांचा आहे. उच्च जातीतील लोकांच्या मनात स्वतः बद्दलची श्रेष्ठत्त्वाची आणि इतर जातीबद्दल जी तुच्छतेची भावना असते त्या भावनेच्या वर येऊन मानवतेच्या दृष्टिकोनातून सर्वांकडे पाहणारे असे हे पात्र आहे. अर्थात हे पात्र लेखकांने जाणीवपूर्वक निर्माण केलेले असले तरी, ते अत्यंत प्रभावशाली ठरले आहे. उच्च जातीतील उन्मादी लोकांना आवरण्याचे काम तो बऱ्याच वेळा करताना दिसतो. कबीरला सायकल देताना अपण सायकल का देतोय याचे तो जे स्पष्टीकारण देतो त्यावरून गरीबांबद्दलची त्याला असलेली कणव देखील आपणाला दिसून येते. गाव आणि म्हारवाडा यांच्यातील सामंजस्य कायम रहावे असे प्रामाणिकपणे वाटणारे व त्या प्रकारे कृती करणारी दोन पात्रे या कादंबरीत आहेत एक कबीर व दुसरे आक्काबा राणे.

'ऐसे कुणबी भूपाळ' ही देखील अभ्यासाला निवडलेल्या कादंबरीतील ग्रामीण व कृषिकेंद्रीत जीवनांतील ढासळणाऱ्या एकत्रित कुटुंब व्यवस्थेचे चित्रण करणारी आणि त्याची कारण मिमांसा करणारी अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. काशीनाथ आणि विश्वनाथ या दोन केंद्रवर्ती पात्रांच्या माध्यमांतून हा ढासळणारा कुटुंब व्यवस्थेचा आलेख लेखकांने ताकदीने मांडला आहे. लहानपणीच वडील वारल्यानंतर मोठा असल्याने एकत्र कुटुंबाची आणि कारभाराची मुखत्यारकी त्याच्याकडे येते. पहिली काही वर्षे आपल्या कर्तृत्वाने त्यांने आपला आब आणि जरब निर्माण केलेली असते. गावात त्याला खूप मान मिळत असतो. ग्रामीण परिसरात वावरतांना तुमचे चारित्र्य महत्त्वाचे असते. काशीनाथचा गावात एवढा दरारा असतो पण जेव्हा तो शेणखाढ्या चंद्रीच्या नादाला लागतो तेव्हा त्याचा हा सगळा दरारा संपून जातो. नैतिक अधःपतन माणसाची किंमत शुन्य करते याचे हे उत्तम उदाहरण आहे. या संदर्भात त्याच्याकडे कामगार म्हणून असलेल्या विठ्याचा आणि त्याचा संवाद महत्त्वाचा आहे. वरच्या वाड्यातल्या बाल्या आपल्या बायकोला बदडून काढतो. या अगोदर त्यांने बायकोला मारली तेव्हा काशीनाथने त्याला धमकी दिली होती आणि तो गप्प बसल होता. आता तो पुन्हा बायकोला मारतो हे जेव्हा विठू त्याला सांगतो तेव्हा काशीनाथ म्हणतो, 'मी मागच्या वेळेला त्याला धमकी दिली होती तरी त्यांन बायकोला मारलं?'

तेव्हा विठ्या म्हणतो, “तेव्हाचं येगळं व्हतं, तात्या. आजकाल लोक तुमाला येगळं समजायलेत.” [31] हे विठूचं सांगणं त्याची गावातील पत किती घसरली आहे हे सांगण्यासाठी पुरेसे आहे. अर्थात, काशीनाथ हा लहानपणापासून चंचल व हट्टी असल्याचे व आपला स्वार्थ कसा साधा हे पुरेपूर माहीत असलेला असा आहे. बैलांना शेतात चरवल्याने वडील रागावले म्हणून त्यांने एकदा विष घेतले होते. आताही जेव्हा विश्वनाथ शेणकाढी चंद्रीला कामावरून कमी करतो तेव्हा तो रागावून मामाच्या घरी जाऊन बसतो. आई आपल्या सगळया अटी पूर्ण करून आपणाला परत घेऊन जाईल हे त्याला माहीत असते आणि तसेच होते. त्याचे जेव्हा शेतीकडे पूर्ण दुर्लक्ष होते व त्याच्या बेजबाबदारपणाचा पाढा विश्वनाथ द्वारकाबाईसमोर पुन्हा पुन्हा वाचू लागतो तेव्हा ती व्यवहाराची सगळी मुखत्यारकी विश्वनाथ कडे देते व काशीनाथ शक्तीहीन होतो. सत्ता मिळाल्यावर जे काशीनाथ करत होता तेच विश्वनाथ करतो. गावातील आशी सोबत त्याचे अनैतिक संबंध स्थापित होतात. तो तिला घर बांधून देतो, राजकीय आकांक्षेपोटी लोक आपल्या सोबत राहावेत म्हणून लोकांना उधार पैसे देतो व या सर्व उपद्व्यापात त्याचे देखील शेतीकडे दुर्लक्ष होते. द्वारकाबाईला सगळा कारभार पुन्हा एकदा काशीनाथ कडे द्यावा लागतो. हे दोन्ही भाऊ एकमेकाना पाण्यात पाहताना दिसतात. विश्वनाथची आशी बरोबर भानगड आहे हे काशीनाथच गावभर सांगत फिरतो. विश्वनाथ सरपंच होऊ नये म्हणून काशीनाथच प्रयत्न करतो. विश्वनाथच्या नाकवर टिच्चून त्याला नको असलेले कामगार कामावर ठेवतो. विश्वनाथ ही सत्ता आल्यावर असेच करतो. त्यामुळे दोन्ही भावातील वितुष्ट वाढत जाते व याची परिणती म्हणजे घराच्या आणि जमिनीच्या वाटण्या अटळ ठरतात. कुणबीच कुणब्याच्या ऱ्हासास कसा कारणीभूत आहे हेच या दोन पात्रांच्या वर्तनातून लेखकांने नेमकेपणांने मांडले आहे. काशीनाथ आणि विश्वनाथ यांच्या बहिणीचे सासर व विशेषतः तिचा दिर श्रीपती हा देखील या कादंबरीतील एक केंद्रवर्ती पुरूषपात्र आहे.  जमीनदार असूनही वारकरी असलेल्या त्याच्या बापाला बाळाजीला सर्वच लुबाडतात तेव्हा मोठा मुलगा या नात्यांने श्रीपती सर्व व्यवहारात लक्ष घालून संसाराचा गाडा पुन्हा व्यवस्थित मार्गी लावतो. सुनंदाचा नवरा नामदेव व दुसरा भाऊ किसन हे शेतीत विशेष रस घेणारे नसतात एकटा वारकरी तर दुसरा कामचुकार. श्रीपतीला काहीच मुलबाळ नाही. नामदेवला दोन मुली व एक मुलगा परंतु मुलगा पाण्याच्या बादलीत पडून दगावतो. किसनच्या बायकोचा गर्भपात होतो व याचे खाफर श्रीपतीच्या बायकोवर फुटते. किसन वाटणीसाठी हट्ट धरतो. श्रीपती शेवटपर्यंत वाटण्या टाळण्याचा प्रयत्न करतो परंतु जेव्हा शेवट वाटण्या होतात तेव्हा वाटणीचे उजवेमांप आपल्या पदरात पडेल याची खातरी करून घेतो. एकूणच श्रीपतीच्या व्यक्तिचित्रातून मानवी स्वभावाच्या गुंतागुंतीचे आपणाला दर्शन होते.  ‘असं जगणं तोलाचं’ ही ग्रामीण पार्श्वभूमी

वरील अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ही कादंबरी नव्वदोत्तर काळात लिहिली असली तरी यात चित्रित झालेले जीवनचित्रण १९५० च्या आसपसचे व त्यानंतरच्या काही वर्षांतील आहे. नामू आणि गोपाळ ही या कादंबरीतील केंद्रवर्ती पुरूषपात्रे आहेत. नामू हा हारबा आणि कासाचा मुलगा. हारबाने केलेले विष्णू सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी नामूला खूपच त्रास सहन करावा लागतो, त्यातच हाणमू या सावत्र भावांने आत्महत्या केल्यांने या कुटुंबावर खूपच कठीण प्रसंग येतो. या आत्महत्येच्या प्रकरणातून बाहेर येण्यासाठी आणखी खर्च करावा लागतो. कासाच्या माहेरच्यांनी मदत केल्याने नामू पुन्हा आपली जमीन कसू लागतो. मेहनतीचे आपले कुटुंब चालवतो. नामूचा भाऊ गोपाळ हा किरकोळ प्रकृतीचा आहे. शेतीतील कामे त्याला झेपणारी देखील नाहीत परंतु त्याला शिक्षणांची आवड आहे. कासा व नामूच्या बायको धुरपा हिने पुढाकार घेतल्यांने त्याला शिक्षण घेणे शक्य होते. अत्यंत कष्टाने तो शिक्षण घेतो. दहावीच्या परीक्षेत इंग्रजी विषय उरतो तरी परत अभ्यास करून तो विषय सोडवतो व दुरच्या गावात त्याला शिक्षकाची नोकरी मिळते. तो नामूला पैशांची बरीच मदत करतो त्यामुळे त्यांची परिस्थिती थोडी सुधारते. नामूचे लग्न खरेतर त्याच्या मनाविरुद्ध झालेले असते, त्याचे एका दुसऱ्या मुलीवर प्रेम होते परंतु धुरपाशी त्याच्या घरच्यांनी त्याच्या मनाविरुद्ध लग्न लावून दिलेले असते. अनेक वर्षे तो तिच्या सोबत फटकून राहत होता. अनेकांच्या विशेषतः कमळाबाईच्या सांगण्यानंतर बऱ्याच वर्षांनंतर तो तिच्याशी व्यवस्थित वागू लागतो. गोपाळला नोकरी लागल्यानंतर नामूच्या व गोपाळच्या दोहोंच्या इच्छा आकांक्षांना नवीन पंख फुटतात. आपल्या आवारात आपली स्वतःची विहीर असावी असे दोहोंना वाटते. मध्यंतरीच्या काळात गोपाळचे लग्न त्यांचा विरोधक असलेल्या विष्णू सावकाराच्या मुलीच्या मुलीशी मोठा हुंडा घेऊन होते. खरेतर ती गोपाळला शोभण्यासारखी नसते परंतु भरपूर हुंडा घेऊन गोपाळ तिच्याशी लग्न करतो. लग्न झाल्यावर तिला तो आपल्यासोबत नोकरीच्या गावी कधीच घेऊन जात नाही. कायम तिचा पाणउतारा होईल असेच बोलतो व ती गरोदर असताना तिला विहिरीच्या कामाला जाण्यास सांगतो. तिच्या सोबत लग्न करून आपणाला सतावणाऱ्या विष्णू सावकाराचा गोपाळ बदला घेतो का? असा प्रश्न मनांत निर्माण होतो. विहिरीचे काम सुरू होते आणि या दोन्ही भावांच्या आयुष्यातील संकटांची मालिका ही सुरू होते. धुरपदा विहिरीचे काम करताना जखमी होते आणि धनुर्वात होऊन मरता मरता वाचते. विहिरीच्या कामाला गेल्याने गोपाळच्या बायकोचा गर्भपात होतो. पैशांची ओढाताण होऊ लागते व त्यामुळे दोन्ही भावात कुरबुरी निर्माण होतात. शेवट विहिरीला पाणी लागते चांगल्या एकरभरात ऊस पिकवला जातो खूप चांगले उत्पन्न येते. गुळ तयार करून बाजारात नेला जातो परंतु

दर पडल्याने खर्च ही भरून निघत नाही व यामुळे दोन्ही भावात कटूता येते. शेवट ही कटूता नष्ट झाली तरी शेती ही नुकसानदायक आहे व शेतीत कितीही पैसा घातला तरी त्याची मातीच होते हे कटू सत्य या दोन पात्रांच्या चित्रांणांतून ही कादंबरी मांडताना दिसते.

'साखरफेरा', 'पाडा', 'कापूसकाळ', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', 'फाटलेलं आभाळ' या सर्वच कादंबऱ्या समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत व त्यामुळे एका समान सूत्राभोवती या कादंबऱ्यांची रचना झाली आहे. 'साखरफेरा' मध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा आहेत तर 'पाडा' मध्ये केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा चित्रित झाल्या आहेत 'कापूसकाळ' मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा तर 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मध्ये अवकाळी पाऊस पडल्याने समस्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा मुखर झालेल्या आहेत. 'फाटलेलं आभाळ' मध्ये प्रकल्पांतर्गत जमीन गेलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा आहेत. या कादंबऱ्या काही पात्रांच्या भोवती लिहिल्या गेल्या असल्या तरी त्यातील कथानक व पात्रे प्रातिनिधिक स्वरूपातीलच आहेत हे आपण लक्षात घेतले पाहिजे. 'साखरफेरा' कादंबरीत किशा हे प्रमुख पात्र आहे. त्याचा एका एकरातील ऊस जळून खाक होतो या घटनेतून या कादंबरीला सुरूवात होते तर त्यांने कर्ज काढून लावलेल्या उसावर मावा रोग पडून सगळे पीक नष्ट होण्याच्या शक्यतेने कादंबरीचा शेवट होतो. एकूण ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथा यातून व्यक्त झाल्या आहेत. किशा हा एक सामान्य ऊस उत्पादक शेतकरी आहे. ऐन दुपारी लागलेल्या आगीत त्याचा अगदी तोडणीला आलेला एका एकरातील जवळपास पन्नास टन ऊस त्याच्या डोळयादेखत जळून खाक होतो. त्याच्या मित्रांनी थोडा धीर दिल्याने तो स्वतःला सावरू शकतो. त्याचे मनच त्याची जी समजून घालते त्याचे वर्णन या कादंबरीत आले आहे या वर्णनातून किशा मनाने किती कणखर आहे हे आपल्या लक्षात येते. उसाला योग्य तो दर मिळावा म्हणून जे आंदोलन होते त्यातही तो सक्रीयपणे भाग घेतो. अगोदरचे कर्ज असतानाही कारखान्याच्या योजनेतून कर्ज घेऊन पुन्हा ऊस लावतो. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनानंतर केंद्राकडून काही मदतीचे आश्वासन मिळते त्यानंतर सकाळी सकाळी आपल्या ऊसाला पाणी द्यायला आला असता, आजूबाजूच्या उसावर मावा रोग पडलेला त्याला दिसतो व तो हबकून जातो. एकूण ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सर्व वेदना या पात्राच्या माध्यमांतून या कादंबरीतून जीवंतपणे चित्रित झाल्या आहेत. 'पाडा' ही केळी उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी कादंबरी असून चांगदेव तापीकर या मुख्य पात्राच्या आधारे या कादंबरीचे कथानक मांडण्यात आले आहे. केळीची बाग करणे हा त्यांचा पिढ्यानपिढ्या चालत आलेला धंदा आहे. कादंबरीची सुरूवात त्याच्या मुलीला बघायला पाहुणे यायचे आहेत या प्रसंगातून होते. चांगदेवची आर्थिक

स्थिती एवढी चांगली नाही पण बाहेरील लोकांचा मात्र 'केळी उत्पादक शेतकरी खूप श्रीमंत असतात' असा समज आहे या समजातूनच ते अव्वाच्या सव्वा हुंडा मागतात. ठरावाची बोलणी होताना त्याचा चुलतभाऊ रमेश तापीकर पुढाकार घेऊन जो हुंडा नक्की करतो तो ही त्याला परवडणारा नाही परंतु तो भिड पडल्यांने तसे बोलू शकत नाही पण एवढा पैसा कसा जमा करायचा? या विवंचनेत तो अत्यंत चिडचिडा होतो. त्याच्या बायकोच्या हे लक्षात येते व ती त्याबद्दल त्याला जाब देखील विचारते. रमेश हा त्याचा राजकीय विरोधक आहे त्यामुळे मुद्दाम जास्त हुंड्याला होकार देऊन त्यांने आपणाला त्रासात टाकले आहे, असे देखील त्याला वाटते. त्याचा स्वभाव हा आक्रमक व अन्यायाला विरोध करणारा असा आहे. चहाच्या दुकानावरील चर्चेतून दोन दर काढणाऱ्या व्यापाऱ्यांविरूद्ध आंदोलन करायचे ठरते. बैठकीला खूप लोक येतात परंतु आंदोलनाच्या दिवशी कोणीच येत नाहीत व त्याचे कारण, 'करंट आहे तो पर्यंत शेताला पाणी लावून घेतले पाहिजे' असा विचार सर्व शेतकरी करतात, हे आहे. जे उपस्थित शेतकरी असतात त्यांच्यासमोर चांगदेव जे भावनिक भाषण करतो तेव्हा तो हा लढा किती कळवळयांने लढतो आहे, तो यासाठी किती प्रतिबद्ध आहे हे लक्षात येते. हळूहळू लोक जमू लागतात व सर्वात अगोदर भारनियमन करणाऱ्या वीज खात्यावरच प्रचंड मोर्चा नेला जातो. त्याची चर्चा राज्य पातळीवर होते. मुख्यमंत्री मोर्चाची दखल घेतात आणि पारपट्टीतील भारनियमन रद्द होते. चांगदेव देखील शेतकरी नेता म्हणून पुढे येतो. 'पाडा' करून तो बाजारात घेऊन जातो. मुलीच्या बस्त्याची तारीख ठरलेली असते. आयत्या वेळी व्यापारी दर पाडतात व त्याविरोधात त्या ठिकाणी चांगदेवच्या नेतृत्त्वाखाली 'केळीफेको' आंदोलन केले जाते. यातून शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या मान्य होतात परंतु चांगदेवचा सगळा 'पाडा' फुकट जातो व केळी विकून हातात पैसाच न आल्याने लग्न मोडते. हा धक्का सहन न झाल्याने त्याची बायको अंथरूण धरते. तो आपल्या मुलीचे लग्न आपल्या बहिणीच्या मुलाशी लाऊन देतो, त्यासाठी तो सोसायटीकडून कर्ज घेतो. बहीण हुंडा मागत नाही पण मुलाला नोकरीचा कॉल येईल तेव्हा आवश्यक ते पैसे चांगदेवने भरायचे ठरते. मुलीच्या लग्नानंतर बायकोची तब्येत आणखी बिघडते तिला हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. पैशांची जमवाजमव करायची म्हणून तो म्हैस विकायची ठरवतो तर ती साप चावून मरते त्यामुळे तो बैलजोडी विकतो परंतु बायकोला वाचवू शकत नाही. बैलजोडी विकून आलेले पैसे हॉस्पिटलची बिले आणि अंतिम विधी यात संपतात. एवढ्यात सुनीताच्या नवऱ्याला नोकरीचा कॉल येतो. बहीण पैशाचा तकादा लावते. 'पाडा' पुन्हा तयार झालेला असतो परंतु वाहतूकदारांच्या संपामुळे सोसायटी 'पाडा' पुढे ढकलत राहते. चांगदेव सोसायटीच्या अध्यक्षांना भेटून कशीतरी एक गाडी आपल्यासाठी मिळवतो परंतु अंतिम क्षणी राजकारण फिरते आणि याला

मंजूर झालेली गाडी विरोधी गटातील रमेश तापकिरेला दिली जाते. चांगदेव बेभान होतो. सोसायटीच्या कर्मचाऱ्यांवर धावून जातो. त्याला अटक केली जाते. त्याला तुरूंगातून सोडवायला देखील कोणी जात नाहीत आणि अटक झाल्यापासून बरोबर आठव्या दिवशी त्याची मुलगी सुनीता भाजून निधन पावल्याची बातमी त्याला समजते. आयुष्याची लढाई पूर्णपणे हरलेले असे हे चांगदेवचे पात्र आहे. मालाचा दर ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला नसणे, व्यापाऱ्यांकडून होणारी सतावणूक, व्यापाऱ्यांच्या मिंध्या झालेल्या व्यापार समित्या व हुंड्या सारख्या समाज विघातक प्रथा या सर्वांमुळे आजचा शेतकरी उद्ध्वस्त होत आहे याचे बोलके चित्र लेखकांने चांगदेव या पात्राच्या माध्यमातून परिणामकारक पणे रंगविले आहे. 'कापूसकाळ' या कादंबरीत जगू हे प्रमुख पात्र आहे, तो एक अल्पभूधारक कापूसउत्पादक आहे. नुसत्या शेतीवर जगणे शक्य नसल्याने तो मोकळा असे त्या वेळी रोजंदारीवर देखील जातो. कादंबरीच्या सुरूवातीलाच त्याचा मुलगा आजारी आहे तर त्याला डॉक्टरकडे घेऊन जाण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. गोळा केलेला काही कापूस बायकोकडे देऊन तो तिला मुलाला घेऊन डॉक्टरकडे पाठवतो. कापूस पिकवण्यात व विकण्यात स्वतः जगूला खूप त्रास सहन करावे लागत नसले तरी, इतरांना किती त्रास सहन करावा लागतो, भ्रष्टाचार कसा सर्वत्र पसरलेला आहे या सर्वाची जाणीव आपणाला या कादंबरीच्या वर्णनातून होते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत यशानाना त्याचा भाऊ विलास व पुतण्या विश्वास ही कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेली पुरूषपात्रे आहेत. यशा नाना हा तसा सुशिक्षित आहे पण परिस्थितीने गांजलेला व त्यामुळे काहिसा तापट डोक्याचा आहे. आपणाला मुलगा नसल्याचे त्याला मोठे दुःख आहे. त्याला तीन मुली झाल्यावर आपल्या बायकोच्या पोटात असलेला मुलीचा गर्भ त्यांने तीन वेळा पाडला आहे. तिसऱ्या मुलीलाही मारण्याचा प्रयत्न त्यांने केला होता. कुत्रा बोकड मारतो या रागाने गावातील सर्व कुत्रे मरावेत म्हणून मेलेल्या बोकडात विष घालून ते बोकड तो गावदरीत टाकतो. तो कर्जबाजारी झालेला आहे, आणि शंकर सावकार त्याच्या मागे लागला आहे. यातच अवकाळी पावसाला सुरुवात होते. दुसऱ्या दिवशी विषारी बोकड खाऊन अनेक कुत्रे व कितीतरी कावळे सर्वत्र मरून पडतात. तो सकाळी प्रातर्विधीला जातो तेव्हा कावळे त्याच्यावर हल्ला करतात. लोक त्याला धरून घरी आणतात. बाहेर पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे आपण कर्ज फेडू शकू ही त्याची शेवटची आशा देखील मावळते व मुलींना शेतावर पाठवून तो आपल्या बायकोसह घरातच आत्महत्या करतो. एकूणच परिस्थितीने गांजलेला व काहिसा माथेफिरू असलेल्या यशवंताचे चित्रण लेखकाने अगदी नेमकेपणांने केले आहे. विलास हा यशानानाचा भाऊ आहे आणि शहरात नोकरी करणारा आहे. यशानानाने आत्महत्या केल्याने आता पुढील सर्व जबाबदारी

त्याच्यावर येऊन पडली आहे. ज्या परिणामकारक रित्या हे पात्र चित्रित झाले पाहिजे होते तेवढ्या परिणामकारक रित्या हे पात्र चित्रित झालेले नाही. कर्ज कसे फेडायचे कसे, हा मुद्दा असो, भावाच्या मुलींचे काय करायचे, हे असो किंवा शंकर सावकाराविरूद्ध पोलीसात तक्रार द्यायची की नाही, हा विषय असो, तो कोणत्याच प्रसंगी कोणतीच निश्चित भूमिका घेत नाही त्यामुळे या कादंबरीतील केंद्रवर्ती पात्र असूनही ते प्रभावहीन ठरले आहे. विलास पेक्षा त्याचा मुलगा विश्वास याचे पात्र मात्र दमदार झाले आहे. तो विचारी आहे, समाजाबद्दल आपल्या बहिणींबद्दल त्याला कळवळा आहे, बहिणींच्या भविष्याबद्दलची चिंता त्याला आहे, जगाकडे पाहण्याचा एक समंजस व आधुनिक दृष्टिकोन त्याच्याकडे आहे. बाकी सर्व जण उषाला तिच्या प्रेमप्रकरणांवरून टोचून बोलत असताना तो तिच्यामागे ठाम उभा राहतो. खालच्या जातीचा असला तरी तिला सुभाषसोबत लग्न करायचे असेल तर त्याचा तिला पाठिंबा आहे. उषा स्मशानात जाऊन जी बडबड करते तो त्याला शुद्द मुर्खपणा वाटतो. काही वैचारिक भूमिका घेऊन वावरणारा व जगण्याबद्दलचा स्वतःचा असा निश्चय दृष्टिकोन असलेलेल्या विश्वासचे पात्र या कादंबरीत महत्त्वाचे असून ते परिणामकारक पणे वठले आहे.

फाटलेलं आभाळ या कादंबरीत बापूराम व त्याचा बाप मांजीराम ही पात्रे केंद्रस्थानी आहेत. मांजीराम हा शेतकरी आहे परंतु भाऊ कुसाप्पा याने वाटणीत जास्त जमीन घेऊन मांजीरामला कमी जमीन देतो. जे आहे त्यात समाधान मानण्याची वृत्ती असल्यांने मांजीराम आपला संसार चालवतो व आपल्या मुलाचे लग्न देखील लाऊन देतो. तो अचानक मरण पावतो. कष्टाचे जीवन असले तरी बापूरामचे सर्व व्यवस्थित चाललेले असते परंतु सरकार बांधत असलेला नवीन रस्ता त्याच्या शेताच्या बरोबर मधून जातो व त्याला शेती करणे कठीण होते. शेती गेल्यांने तो ऊस तोडणी कामगार होतो. दुर्दैवाने ऊस तोडणी करण्याची यंत्रे येतात व काहीच वर्षे ऊस तोडणी केल्यावर बापूरामवर बेकारीची कुऱ्हाड कोसळते. एकूणच या दोन पात्रांच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्यांचा जगण्याचा संघर्ष लेखकाने चित्रित केला आहे.

‘चिखलवाटा’ ही गाव आणि शहर यातील सूक्ष्म संघर्ष चित्रित करणारी व आधुनिक काळात शेती कशी नुकसानीची झाली आहे त्याचे वर्णन या कादंबरीत आले आहे. व्यंकट व अर्जुन ही या कादंबरीतील दोन महत्त्वाची पात्रे आहेत. अर्जुन जास्त शिकू शकलेला नाही परंतु आपण कष्ट काढून त्यांने आपला भाऊ व्यंकट याला शिकवले आहे. व्यंकटला शहरात शिक्षकाची नोकरी असून तो दरमहा घरी पैसे देखील पाठवताना दिसतो. आपले शहरात घर असावे असे त्याची बायको साधना हिला वाटते कारण शाळेतील शिपयांनी देखील घरे बांधली आहेत. व्यंकटला पण मनात कुठेतरी आपले घर असावे असे वाटते. साधनाने एक प्लॉट बघितला असून

हा स्वस्तात मिळणारा प्लॉट घेण्यासाठी तिने त्याच्या मागे तकादा लावला आहे. घराकडून शेजारच्या साळुंख्याने पाणी द्यायचे बंद केल्याने बोअर मारण्यासाठी पंचवीस हजार रुपयांची व्यवस्था करण्याविषयी पत्र येते. हे पत्र वाचून साधनाचा त्रागा होतो. आपला नवऱ्याने प्लॉट घेण्याचा विचार बदलू नये म्हणून ती त्याच्यासोबत भांडते देखील. पैसे द्यायला मिळणार नाहीत हे सांगण्यासाठी तो घरी येतो तेव्हा, तो पैसे देणार नाही हे समजल्यावर बाप त्याला खूप बोलतो. त्यामुळे एका भावूक क्षणी तो पैसे देण्याचे मान्य करतो परंतु त्या वेळी अर्जुन त्याला रोखतो व त्यांने प्लॉट घ्यावा आपण आपल्या बायकोला माहेरी पाठवून तिच्या भावाकडून पैशाची व्यवस्था करतो असे सांगतो. प्लॉटच्या आणि नंतर घर बांधण्याच्या कामात व्यस्त झाल्यानंतर व्यंकटचे घरी बरेच दुर्लक्ष होते. खरेतर आपण घर बांधणार आहोत हे तो घरी सांगत देखील नाही. अर्जुनाची अवस्था नियतीच्या फेऱ्यात अडकल्यासारखी होते. बायकोच्या भावाकडून पैसे आणून बोअर मारली जाते परंतु पाणी लागत नाही आणि पंचवीस हजार मात्र मातीत जातात. अर्जुन शेतकरी चळवळीचा निष्ठावान कार्यकर्ता असतो त्यामुळे नेत्यांना गावबंदी करायची असू दे किंवा गावात वसुलीसाठी आलेल्या बँक अधिकाऱ्यांना विरोध करून त्यांना वसुलीपासून रोखण्याचे काम असो, तो सर्वात पुढे असतो. घरात त्याची मुलगी लग्नाला आलेली असते. चांगली स्थळे येत असतात परंतु पैशाकडे सगळे अडत असते. घरात म्हातारा बाप व बायको मुलीच्या लग्नाचा तकादा लावत असतात. शेतकरी संघटनेच्या कामामुळे त्याचे शेतीकडे दुर्लक्ष होत असते त्यामुळे बाप त्याच्यावर नाराज असतो. एकदा पैशांमुळे मोडलेली सोयरिक पुन्हा येते तेव्हा तो शहरात व्यंकटला भेटायला जातो परंतु तो घर बांधतोय हे लक्षात आल्यावर गप्पच परत येतो. बायकोचा भाऊ भ्रष्टाचाराच्या एका प्रकरणांत अडकतो व त्याला तातडीने पंचवीस हजार रुपये द्यावे लागतात, त्यासाठी त्याला जमीन गहाण ठेवावी लागते. संघटनेचे करीत असताना त्यांने ज्यांना ज्यांना मदत केलेली असते त्या सर्वांकडे तो जातो व आर्थिक मदतीबद्दल विचारतो पण कोणीच त्याला मदत करीत नाही. आपण आपली शेतीभाती अर्धवट टाकून लष्कराच्या भाकऱ्या भाजण्याचे जे काम केले ते काही उपयोगाचे नसल्याचे त्याच्या लक्षात येते व म्हणूनच कादंबरीच्या शेवटी तो आपल्या छातीवर अभिमानाने मिरवत असलेला शेतकरी संघटनेचा बिल्ला दूर भिरकावून देतो. व्यंकटची बायको साधना हिचे बी.एड. होऊन तिला त्याच्याच शाळेत नोकरी लागते. एक दिवस शाळेचे हेडमास्तर नटुरे तिला मस्टरवर सही करण्यास मज्जाव करतात. व्यंकट चौकशी करतो तेव्हा मॅनॅजमेंट ने चाळीस हजार रुपयांची मागणी केल्याचे हेडमास्तर सांगतात व पैसे आपल्याचकडे आणून देण्यास सांगतात. काही नाटकीय घडामोडी घडतात व व्यंकट आपल्या मित्रांसोबत पैसे घेऊन सरळ संस्थेच्या अध्यक्षांच्या घरी जातो, तिथे त्याला संस्थेने अशी कोणतीही

मागणी केली नसल्याचे समजते व हे मुख्याध्यापकांनी रचले कुभांड होते हे ही समजते. तो ताबडतोब ते पैसे घेऊन घरी यतो. वाटेतच त्याला जमीन गहाण ठेवल्याचे समजते व ती सोडवून आणण्यासाठी तो सावकाराकडे जातो. एकूणच शहर आणि खेडे यातील ओढाताण कशी चालते याचे दर्शन आपणाला या कादंबरीतील या दोन पत्रांच्या माध्यमांतून होते. दोन्ही पात्रे आपापल्या जागी प्रामाणिक आणि कुटुंबाप्रती समर्पित वाटतात. परंतु आधुनिक शेती कोणालाच सुखाने जगू देत नाही हे मात्र ठळकपणे अधोरेखित होताना दिसते. 'एसईझेड' ही देखील समस्याप्रधान कादंबरी आहे. ही समस्या सरकारच्या शेतकऱ्यांना लुबाडण्याच्या फसव्या चालीमुळे निर्माम झाली आहे. कादंबरीच्या शिर्षकावरूनच याची कल्पना येते. उजाड नापीक जमीन ज्या गोष्टींसाठी वापरायच्या त्या कामासाठी हजारो एकर पिकाखालील जमीन देण्याचा घाट रचला जातो तेव्हा शेतकऱ्यांच्या विद्रोहाला जे तोंड फुटते आणि सरकारविरुद्ध ते निकाराचा संघर्ष पुकारतात त्याचे प्रत्ययकारी चित्रण म्हणजे 'एसईझेड' ही कादंबरी! चंदू (चंद्रकांत) हे पात्र या कादंबरीच्या मध्यवर्ती असल्याचे दिसते. अर्थात हा सगळा संघर्ष कादंबरीच्या उत्तरार्धात चित्रित झाला आहे. पूर्वार्धात बेकार असलेल्या चंदूच्या जगण्याचा संघर्षच चित्रित झाला आहे. चंदू हा अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील आहे. त्यांने चांगले शिक्षण घेतले आहे परंतु बेकार असल्याने त्याचा जगण्यासाठीचा संघर्ष सुरू आहे. त्याच्या अनेक सुशिक्षित बेकार मित्रांचाही असाच संघर्ष चालू आहे त्यामुळे चंदू हे असंख्य बेकार तरूणांचे प्रातिनिधिक पात्र आहे असेही म्हणता येते. तो गुरूजींच्या सांगण्यावरून पोल्ट्री उद्योगासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण घेतो.  ही पोल्ट्री करण्यासाठी त्याला बरीच वणवण करावी लागते. पोल्ट्री काढण्यासाठी जागा पाहिजे परंतु त्याच्या घराकडे एवढी जागा नव्हती म्हणून तो शेतावर पोल्ट्री करण्याचे ठरवतो. शेतावर लाईट नव्हती त्यामुळे पिल्लांना उबेसाठी पेट्रोमॅक्स ची व्यवस्था त्याला करावी लागते. अर्थात पोल्ट्री साठी त्याला कर्ज पाहिजे होते परंतु कोणतीच बँक त्याला कर्ज द्यायला तयार होत नाही.  शेवटी एक खाजगी कंपनी त्याला पोल्ट्रीसाठीचे सगळे भागभांडवल पुरवते पिल्ले देखील देते. अट फक्त एकच, माल फक्त त्यांनाच विकायचा. चंदू हे मान्य करतो आणि धंदा सुरू करतो.  तो आता शेतावरच राहू लागतो. बाकी जगाशी त्याचा संबंधच जणू तुटतो, एवढा तो आपल्या कामात व्यग्र होतो. एक दोन बॅच तयार होऊन गेल्यावर आतात थोडा पैसा खेळू लागतो तो धंदा वाढवतो पाचशे ऐवजी हजार पिल्लांची बॅच करतो. त्यातच बहिणीचे लग्न ठरते. ही बॅच जाऊन लग्नाच्या खर्चाचा भार कमी होईल असे त्याला वाटत असते आणि एवढ्यात जगभर बर्ड फ्ल्यू चे थैमान सुरू होते. चिकनची मागणी घटते आणि याच्या कोंबड्या चांगल्या असूनही नष्ट करण्याची वेळ त्याच्यावर येते. त्यांने कंपनीकडून लग्नासाठी उचल घेतलेली असते त्यामुळे डोक्यावर कर्ज

होते. एवढ्यात एसईझेड चे वारे घोंगाऊ लागते व पोल्ट्रीचा विषय बाजूला ठेवून तो या आपल्या जमिनी वाचविण्याच्या आंदोलनात स्वतःला झोकून देतो. संघर्ष समितीचा सदस्य होतो. वर्तमानपत्रातून लेख लिहितो. पत्रके वगैरे काढायचे सगळे काम स्वतःवर घेतो. प्रत्येक बैठकीत, मोर्चात, आंदोलनात सहभागी होतो. शेवटच्या निकाराच्या लढ्यावेळी तो पोलीसांवर व सरकारी लोकांवर पेट्रोल बाँब देखील फेकतो व इथेच कादंबरी संपते. 'एसईझेड' हा विषयच अत्यंत दाहक आहे फक्त या कथानकाची उभारणी करण्यासाठी म्हणून काही पात्रे येतना दिसतात. या कादंबरीच्या केंद्रस्थानी चंदू असल्याचे दिसते. आपल्या हक्कांसाठी आणि अधिकारांसाठी आणि आपली काळी आई वाचविण्यासाठी एक युवक काय करू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे चंदू आहे. एकूण या कादंबरीच्या निर्मितीत हे पात्र मध्यवर्ती आणि अत्यंत महत्त्वाचे असल्याचे दिसते.

अभ्यासासाटी निवडलेल्या बाकी कादंबऱ्यांचा विचार करता प्रतिमा इंगोले यांची 'बोडखी' ही कादंबरी काहीशी वेगळ्या स्वरूपाची आहे. कादंबरी ग्रामीण पार्श्वभूमीचीच असली तरी ते शीती केंद्रीत नाही तर ग्रामीण भागातील दलित कारागिराला केंद्रस्थानी ठेवून लिहिण्यात आली आहे. 'डोमा' या चर्मकार समाजातील पात्राच्या भोवती या कादंबरीची गुंफण करण्यात आली आहे. त्याच्या आईवडीलांचा एकुलता एक आणि नवसाने झालेला असा तो मुलगा आहे. तो रंगाने काळा असल्याने त्याचे नाव पांडुरंग असले तरी सगळे लोक अगदी घरातील देखील 'डोमा'च म्हणतात. सुरूवातीला त्याला याचे वाईट वाटायचे पण मग तोच जणू आपले मूळ नाव विसरला. त्याच्या बाप चंपत याने त्याला लहानपणापासून हाताशी घेऊन चपले बांधण्यातील विविध कौशल्ये चांगल्याप्रकारे शिकवली होती. तसेच, तो स्वतः उत्कृष्ट कारागीर होता. 'बोडखी' सारखी चप्पल तो एवढी सुंदर बांधायचा की सगळे लोक त्याची स्तुती करायचे. काळ बदलू लागला तसा बलुत्यावर चालणारा आपला व्यवसाय 'मरेल भाकर' ठरायला लागला याचे त्याला दुःख होताना दिसते. जे आपल्या हक्काचे आहे ते ही त्याला भीक मागितल्यासारखे मागावे लागते. बलुतं मागायला गेल्यास तू केलेल्या चपलांना आता कोणी हुंगत नाही असे सांगून त्याच्या हक्काची ज्वारी त्याला नाकारली जाते. या धंद्यातील लोकांना तुच्छतेची वागणूक दिली जाते. त्याच प्रमाणे, जातीयतेच्या ज्या इंगळ्या सहन कराव्या लागतात त्यासाठी देखील त्याला हा धंदा नकोसा वाटतो. आपल्या मनाची वेदना व्यक्त करताना एकदा तो म्हणतो, "आपल्या गावचे लोक लयच माजरू हायेत सायाचे. आंग धुतल्यावर कुतळल्याले जोळ घेतात. पण मायासारख्या 'मानसासारक्या मानसाले' म्हनतेत सकाय ये. त्यानंच जीवावर येते सायाचा हा धंदा! जे शिळं शिळं करतेत त्याईच्याच दाराशी जा लागते दा खेप. कुंदा खननं पुरलं पन हे अईल्यासारखं चलवाद्याईच्या घरी जानं नायी पुरलं."[32] कुत्र्यापेक्षाही आपली किंमत कमी

आहे ही भावना त्याच्या जिव्हारी लागणारी आहे. म्हणूनच, आपला मुलगा प्रकाश याला तो आपल्या धंद्यापासून दूर ठेवतो. अगदी धंद्याबद्दलचा काही निरोप कोणी प्रकाशकडे दिला तर तसे नकरण्याबद्दल तो संबंधित माणसाला सांगताना दिसतो. या धंद्यातून मुलाला बाहेर पडायचे असेल तर त्यांने शिक्षण घेतले पाहिजे हे त्याला जाणवले आहे म्हणून त्यांने खूप शिकावं म्हणून तो मेहनत घेतो. हुशार व श्रीमंत असलेल्या मारवाड्याच्या मुलाशी त्याची दोस्ती आहे याचा त्याला आनंद होतो परंतु ही दोस्तीच डोमाच्या सत्यांनाशाला कारणीभूत ठरते. काळया मांजरीच्या कातडीवर घासल्याने सोने दुप्पट होते हे वाचून आईच्या दागिन्यातील काही दागिने चोरून मारवाड्याचा मुलगा प्रकाशकडे ठेवण्यासाठी देतो. दागिन्यांची चोरी झाल्याचे मारवाड्याच्या बायकोच्या लक्षात येते व संशयित म्हणून अभ्यास करण्यासाठी रोज आपल्या घरी येत असल्याने प्रकाशचे नाव ते पोलीसांना देतात. डोमाच्या घरावर धाड पडते तेव्हा डोमा सोडून आणखी कोणीच घरी नसतात. आपल्या घरात सोने मिळाले म्हणजे आपल्या मुलानेच चोरी केली असली पाहिजे असे डोमाला वाटते. या वयात चोरीच्या आरोपाखाली पकडला गेल्यास मुलाचे आयुष्य बरबाद होईल असे वाटून चोरीचा आळ तो आपल्यावर घेतो. आळ आपल्यावर घेत असताना आपण तुरूंगात गेल्यास घरच्यांची काय अवस्था होईल याचा मात्र तो विचार करीत नाही. तो असा तुरूंगात गेल्याने त्याच्या बायकोवर पोलीस पाटलाकडून लैंगिक अत्याचार होतात कारण त्याला सर्व रान मोकळे मिळते. तसेच ज्यांने शिकावे म्हणून हा आळ तो स्वतःवर घेतो त्या प्रकाशाच्या शिक्षणाची ही वाट लागते. पोलीस पाटील जबरदस्तीने त्याला अनैतिक धंदे करण्यास भाग पाडतो. इकडे न केलेल्या गुन्ह्याचा आळ स्वतःवर घेऊन आपण मोठी चूक केल्याचे डोमाच्या लक्षात येते. प्रकाश अल्पवयीन असल्याने लवकर सुटला असता किंवा त्यला शिक्षा देखील झाली नसती. जेव्हा चोरी मागचे सत्य त्याल समजते व आपल्या मुलाने चोरी केलीच नव्हती हे समजते तेव्हा तर त्याला आपल्या निर्णयाचा खूपच पश्चात्ताप होतो. बायको त्याला पुन्हा भेटायला जाते तेव्हा घरची सर्व कर्म कहाणी सांगते व जेलरला विनंती करून त्याची सुटका करवून त्याला घरी घेऊन येते. त्या रात्री पोलीस पाटील आला असता तो आपले चामडे कापायचे हत्यार उपसतो तेव्हा पोलीस पाटील निघून जातो परंतु आता आपल्याला या गावात राहणे शक्य नाही असे डोमाला वाटते. आता सगळे गाव आपल्याला चोर म्हणून बघणार असे त्याला वाटते व पोलीस पाटलाचा त्रासही होणारच होता म्हणूनच काही भांडीकुंडी घेऊन तो रात्रीच आपले एवढ्या वर्षांचे घर सोडतो व रेल्वे स्टेशन गाठतो. कुठे जाणार, काय करणार, याची काही कल्पना नसते फक्त गाव सोडायचे एवढेच माहीत असते. एका कारागिराची झालेली ही दुर्दशा आपले

काळजी पिळवटून टाकते. एका दलित कारागिराची व्यथा ‘डोमा’ या पात्राच्या माध्यमांतून या कादंबरीत प्रत्ययकारक रित्या चित्रित करण्यात आली आहे.

‘गावठाण’ कादंबरीत आंदीचा बाप(कोंड्या) व तिचा नवरा ही दोन महत्त्वाची पुरूष पात्रे म्हणून सांगता येतात. आंदीचा बाप हा अतिशय कष्ट करणारा आहे. संसाराला हातभार लागावा म्हणून कुठून कुठून तो म्हशी अर्धेलीने आणताना दिसतो. तो शेतीच्या कामात इतरांनाही मदत करताना दिसतो. तो तसे कोणाचे ऐकून घेणारा नाही म्हणून ज्याचा सगळया गावात दरारा आहे त्या नारूआबाला देखील तो ये “जा-जा जवाचं घव तवाच्या पोळया बघू” (पृ.10) असं सांगायला मागेपुढे बघत नाही. तो आंदीला तिच्या कठीण काळात सर्व प्रकारची मदत करतो. म्हशीची रेडी तिला देतो. एक कुटुंबवत्सल बाप म्हणून तो आपल्यासमोर उभा राहतो. तिचा नवरा(बाळया) हा नंतर बराच सुधारल्याचे दिसते. एकत्र कुटुंबात असताना तो आंदीला अजिबात किंमत देताना दिसत नाही. परंतु घरचे लोक त्यांने घर एवढे नेकीने चालवूनही त्याच्यावरच आरोप करतात तेव्हा त्याचे डोळे उघडतात. आपण आपल्या बायकोला किंमत दिली नाही याची जाणीव त्याला होते तो पर्यंत वेळ निघून गेलेली असते व शेवट आंदीला त्रासात टाकूनच तो कायमचा निघून जातो. आजारपणांत आंदी त्याची सर्व सेवा करते परंतु शेवट त्याला झालेलाच रोग मुलालाही झाला हे समजते तेव्हा मात्र, बिचारं जातानं “‘बी’ च्या ‘बी’ नी कीडच्या कीड ठेवून गेला कवा कवा न्हाई खरं आज रागच आला.” [33] असे आंदी म्हणते एका अर्थाने त्याच्या आत्म्यालाही टोचणी लागणारी ही गोष्ट आहे. जिनगांनी कादंबरीत केंद्रस्थानी असलेली अशी एकही पुरूष व्यक्तिरेखा नाही. या कादंबरीत त्या काही पुरूष व्यक्तिरेखा येतात त्या फक्त कथानकाची गरज म्हणून आल्या असून त्यातील एकही पुरूष व्यक्तिरेखा प्रभावी वाटत नाही.

‘इदवास’, ‘वाहतं पाणी’, ‘भगदाड’ आणि ‘वनराईचा लढा’ या अभ्यासात घेतलेल्या चारही कादंबऱ्या गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या आहेत. हे या कादंबऱ्यांचे वेगळेपण म्हणून सांगता येते. ‘इदवास’ या कादंबरीत गोवा-महाराष्ट्राच्या सिमेवर 1970 नंतरच्या काळात जी प्रचंड वृक्षतोड झाली व गावच्या गावे नैसर्गिक व सांस्कृतिक दृष्ट्या उद्ध्वस्त झाली त्याची कहाणी या कादंबरीतून चित्रित झाली आहे. खरेतर कोणतेही एक पात्र या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे नाही. सगळा गावच एक प्रमुख पात्र म्हणून या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे म्हणता येते. कोणत्याच एका माणसाला केंद्रस्थानी ठेवून या कादंबरीचे कथानक रचलेले नाही. अनेक पात्रांच्या कोसळण्यांतूनच ही कादंबरी आपणाला एका नैसर्गिक आणि नैतिक ऱ्हासाचा जळजळीत अनुभव देताना दिसते. अगदीच काही महत्त्वाची पुरूषपात्रे म्हणून उल्लेख करायची तर सगुण, चौगुले गुरूजी, बाप्पा

यांचा उल्लेख करता येईल. कारण हे तिघेही जंगलतोडीच्या विरोधात असतात. गुरूजींनी त्यांच्या गावात झालेल्या जंगलतोडीमुळे गावाला जे भकासपण आले आहे ते अनुभवले होते ते भकासपण या गावच्या वाट्याला येऊ नये असे त्यांना वाटत होते. सगुण हा वयाने लहान आहे परंतु गुरूजी सांगतात ते चांगलेच असणार या भरवशावर तो गुरूजींच्या सोबत असताना दिसतो. त्याचाच बाप सर्वात अगोदर जमीन विकतो तेव्हा तो बापाला जमीन विकण्यास विरोध करतो, आपल्या शेतातून रस्ता काढण्यास विरोध करतो व बापाने सांगूनही जंगलतोडीच्या कामाला जाण्यास विरोध करतो. यामुळेच बापात आणि त्याच्यात खूप दुरावा निर्माण होतो. त्याच्या समोर रोजगाराचा प्रश्न येतोच. ज्या वेळी साखळीचा नाडकर्णी त्याला जंगलतोडीवर मुकादम म्हणून काम करण्यास सांगतो तेव्हा तो सुरूवातीला तयार होत नाही परंतु नाडकर्णी व त्याती आई त्याला हे पटवून देतात की, तू हे काम स्वीकारले नाहीस म्हणून जंगल तुटायचे थांबणार नाही. फक्त तुला काम मिळणार नाही. आपल्या पोटाचा प्रश्न त्याच्या समोर असतोच व जंगलचे काम स्वीकारल्यास मीराला कामावर घेऊन तिच्यासोबत वेळ घालवता येईल हा विचारही त्याला हे काम स्वीकारण्यास प्रवृत्त करतो. बदलती परिस्थिती एखाद्या चांगल्या माणसालाही आपल्या जबड्यात कसा ओढते याचे हे उत्तम उदाहरण म्हणून या घटनेकडे पाहता येते. बाप्पा हे काहीसे तिरसट स्वभावाचे पात्र या कादंबरीतून येते. तिरसट तरी नैतिक मूल्यांशी आणि आपणाला पटलेल्या विषयाशी एकनिष्ठ राहण्याची व त्यासाठी काहीही करण्याची तयारी असणारे असे हे पात्र आहे. गावात घडणाऱ्या अशुभ घटनाचा संबंध तो जंगलतोडी सोबत लावतो. जंगलतोडीमुळे गाव उद्ध्वस्त होणार आहे हे त्याला दिसत असते परंतु हे सगळे थांबविण्याची ताकद मात्र त्याच्यात नसते. तो थांबवू शकला नाही तरी शेवटपर्यंत संघर्ष मात्र करीत राहतो आणि म्हणूनच तो या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र ठरतो. 'भगदाड' ही कादंबरी स्वरूप गावडे या पात्राभोवती केंद्रीत झाली आहे हा स्वरूप गावडे एक शिक्षक आहे व दिवाडी सारख्या गोव्यातील एका बेटावर त्याला शिक्षकाची नोकरी मिळाली आहे. स्वरूप हा बहुजन समाजातील असून आधुनिक व वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारा आहे. तसेच, सामान्य माणसाबद्दलची एक कणव त्याच्या मनात आहे तोच कादंबरीचा निवेदक देखील आहे. स्वरूपच कादंबरीचा निवेदक असल्याने त्याच्या मुखातूनच या सर्व कादंबरीचे कथन होताना दिसते. दिवाडी बेटावर गेल्यावर तो त्या ठिकाणच्या काही अंधश्रद्धांचा आपल्या विद्यार्थ्यांचे सहकार्याने भांडाफोड करतो त्यामुळे तो सगळयांच्या लक्षात येतो. या बेटावर मोठ्याप्रमाणावर खाजन शेती केली जाते. खाजन शेती म्हणजे मातीचे बांध घालून खारेपाणी अडविले जाते व निर्माण झालेल्या जागेत शेती केली जाते. या शेतींची मालकी कोमुनिदाद या संस्थेकडे किंवा काही खाजकी

लोकांकडे असली तरी हे शेती करणारे हे बहुतांशी गावडा व भंडारी या बहुजन समाजातील लोक आहेत. ते बेटावर स्थायिक नाहीत शेतीच्या काळापुरते या ठिकाणी येऊन शेती करणारे आहेत. आता बरेच या भागात स्थायिक देखील झाले आहेत. एक दिवस सकाळी फेरीबोटीतून येताना पाणी सगळे रस्त्यावर भरून वाहताना त्याला दिसते तेव्हा याच शाळेत शिक्षक असलेला त्याचा मित्र मंगेश याच्याकडे तो याबद्दल चौकशी करतो तेव्हा शेतीसाठी घातलेले हे बांध काही लोक मुद्दाम फोडतात हे त्याला समजते. असे बांध फोडले की ताजी चवीष्ट मासळी मोठ्याप्रमाणात मिळते ज्याला हॉटेल्समधून खूप मागणी असते. तसेही या बांधाला पडलेली भगदाडे बुजवण्याचे काम करणारा एकच कंत्राटदार आहे व त्याला या कामासाठी लाखो रुपये मिळतात हे देखील समजते. एकूणच या सगळ्या गोष्टीत अंगदी मंत्र्यांच्या पातळीपासून मोठा भ्रष्टाचार होत असतो. स्वरूप मधील नेतृत्व गुण हेरून मंगेश या सगळ्या विरुद्ध त्याला लढा देण्यास सांगतो. ते गावागावात जाऊन लोकांच्या भेटी घेतात हे बांध फुटण्याची सगळे कारणे जाणून घेतात. गावात एक सभा घेतात आणि राजधानीच्या शहरात मोर्चा घेऊन जायचे ठरवतात. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो. स्वरूपला धमकी दिली जाते परंतु तो घाबरत नाही. मोर्च्याविळी कंत्राटदार मुद्दाम आपली माणसे मोर्चात घुसवतो व दगडफेक करायला लावतो. मोर्चातील अनेक लोक जखमी होतात. पोलीस फक्त बघ्याची भूमिका घेतात. स्वरूपवर जीवघेणा हल्ला होतो तो हॉस्पिटलमध्ये दोन दिवसानंतर शुद्धीवर येतो. या एकूण प्रकरणांमुळे वातावरण चिघळते व याचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य होतात. स्वरूपचा लढा सफल होतो. तो लोकनेता म्हणून समोर येतो. बाकी सर्वच ग्रामीण कादंबऱ्या निराशेचा सूर लावीत असताना ही कादंबरी जो आशादायक सूर लावते तो निश्चितच आनंददायी आहे. स्वरूप सोबत मंगेशचे पात्र देखील या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. खरेतर तोच स्वरूप मधील नेतृत्व गुण हेरून त्याला या लढ्याचे नेतृत्व करण्यास सांगतो. जेव्हा स्वरूपला धमकी देण्यास लोक आलेले असतात तेव्हा त्यांनी काही आगळीक केल्यास त्यांचा समाचार घेण्याची तयारी त्यांने स्वरूपला काही न सांगता केलेली असते. एकूणच स्वरूप सोबत मंगेश हे पात्र देखील या कादंबरीत तेवढेच महत्त्वाचे आहे हे लक्षात येते.

'वनराईचा लढा' या कादंबरीत देखील कोणी एक पुरूषपात्र कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असे सांगता येत नाही तरी शंकर मोलू, हरीष कुंभाट हे कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत असे म्हणता येते. ही वनराई या राज्यातील मारीबून या अत्यंत दुर्गम प्रदेशातील त्या ठिकाणी येऊ घातलेल्या एका रासायनिक कंपनीच्या येण्याची, त्याला विरोध होण्याची व त्या कंपनीने आपला गाशा गुंडाळण्याची कथा आहे. हे राज्य त्यातील हे खेडे हे सकळे काल्पनिक असले तरी या सर्वाला गोव्यात अशाप्रकारे येऊ पाहणाऱ्या व त्याला विरोध झाल्याने ते प्रकल्प बंद

पडल्याच्या घटनेची पार्श्वभूमी आहे. यातील अनेक पात्रे ही तत्कालीन गोमंतकात राजकीय व सामाजिक जीवनात वावरणाऱ्या अनेक पात्रांच्या प्रतिकृतीच आहेत. शंकर मोलू हे गावातील सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारे आहेत तर हरीष हे एका होतकरू उद्योजकाचे प्रतिनिधित्व करतात. एकूणच एखादा प्रकल्प येत असताना त्यामागे कोणत्या प्रकारचे राजकारण चालते याची कल्पनाही आपणाला या सर्वातून येते. आपला प्रकल्प उभा राहिल्यास स्थानिकांना रोजगार मिळेल ही हरीष यांची प्रामाणिक भूमिका असते तर फॅक्टरी आल्यास गावाचे कल्याण होईल ही शंकर मोलूची प्रामाणिक भावना असते परंतु राजकारणाच्या साठेमारीत दोघांचीही स्वप्ने आधुरी राहतात. 'वाहतं पाणी' ही कादंबरी गोमंतकीय लेखकांने लिहिलेली असली तरी ती गोमंतकीय पार्श्वभूमीवर घडणारी कादंबरी नाही तर ती एकूण कृषी जीवनाचा व पर्यायाने ग्राम व्यवस्थेचा मुलभूत विचार मांडणारी कादंबरी आहे. सत्याजी काळे हा या कादंबरीचा नायक तर त्याचे वैचारिक परिवर्तन घडवून आणणारे पटेल गुरूजी या कादंबरीतील एकार्थाने सर्वात महत्त्वाचे पात्र आहे. सत्याजी हा सामान्य शेतकरी कुटुंबातून मोठा झालेला आणि आपल्या हुशारीमुळे पाटबंधारे खात्यात उपअभियंता या पदावर थेट नेमणूक मिळालेला युवक आहे. कामाच्या ठिकाणी आल्यावर सरकारी कामाचे स्वरूप त्याच्या लक्षात येते. तो ही भ्रष्टाचार करतो. एक प्रकारण अंगाशी येते त्यातून चौकशी अधिकाऱ्यांना लाच देऊन सुटतो. त्यानंतर त्याचा परिचय 'पटेल गुरूजी' या अजब व्यक्तिमत्त्वाशी होतो व त्याचे जीवन बदलून जाते. पाणी आणि शेती या विषयावर पटेल गुरूजी त्याचे एवढे प्रबोधन करतात की आपली नोकरी सोडून या दोन गोष्टी आपले जीवन ध्येय आहे असे मानून तो त्यासाठी आपले आयुष्य समर्पित करण्याचा निर्णय घेतो. 'पटेल गुरूजी' म्हणजे शेती आणि पाणी या विषयातील नुसते तज्ज्ञ नाहीत तर ते स्वतः अत्यंत कृतीशील असलेले व्यक्तिमत्त्व आहे. अत्यंत फाटका दिसणारा हा मनुष्य विचारांनी एवढा संमृद्ध आहे की त्यांचे या विषयावरील मूलभूत विचार एकून मी मी म्हणणाऱ्यांनी मान खाली घालावी. सत्यजितला देखील ते प्रत्येक गोष्टीचा स्वतः अनुभव घ्यायला सांगतात आणि मग ती स्वीकारण्यास सांगतात. शेती कशी करावी, पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे, पीक व्यवस्थापन कसे करावे आपली कृषी व्यवस्था कोणती मुलभूत तत्त्वे केंद्रस्थानी ठेवून विकसित झाली आहे. उत्तम शेती कनिष्ठ का झाली, शेती न परवडण्यामागील कारणे, हायब्रीड बियाणांचा चकवा, मिश्र पिकांची आवश्यकता का आहे, या बद्दल त्यांचे विचार ऐकून कोणीही अंतर्मुख झाल्याशिवाय राहणार नाही. एकूणच पटेल गुरूजी हे या कादंबरीचा आत्मा आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या महत्त्वाच्या अशा पुरूष पात्रांचा आढावा या ठिकाणी घेतला आहे. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरी ही 'पुरूषपात्र' प्रधान कादंबरी आहे असा निष्कर्ष यातून काढता येते. याचा

दुसरा अर्थ ग्रामीण भागातील पुरूषसत्ताक पद्धती अजूनही दृढमूल असल्याचे दिसते. या पुरूषसत्ताक वर्चस्ववादी प्रवृत्तीचा प्रत्यय विविध कादंबऱ्यातील असेक घटना-प्रसंगातून येते ही त्यामुळे लेखकांनी रंगवलेली ही पात्रे वास्तववादी आहेत याचाही प्रत्यय येतो.

### 4.3.1.2 कादंबऱ्यांच्या केंद्रवर्ती असलेली स्त्री पात्रे

'बारोमास' कादंबरीचा विचार करता एकनाथची आई शेवंतामाय आणि बायको अलका ही दोन पात्रे या कादंबरीच्या केंद्रवर्ती आहेत असे दिसते. शेवंतामाय ही कृषिव्यवस्थेशी पूर्णपणे एकरूप झालेली आहे. चूल आणि मूल हेच आपलं जीवन ध्येय मानून तिने आपल्या जीवनाची वाटचाल केली आहे. अत्यंत गरीबीत दिवस काढून तिने मुलांसाठी जे शक्य आहे ते सर्व केले आहे. स्वतः अर्धपोटी राहून मुलांना शिक्षण दिले आहे. एवढे शिक्षण देऊनही मुलांना नोकरी मिळाली नाही यामुळे मात्र ती निश्चितच निराश आहे. खरेतर, एकनाथचे लग्न तिला आपल्या भावाच्या मुलीबरोबर करून द्यायचे होते परंतु ती अशिक्षित म्हणून एकनाथ तिला नाकारतो. शहरातील मुलगी तर तिला अजिबात नको असते. लग्न होऊन आल्यावर ती अलकाबरोबर अजिबात जुळवून घेत नाही त्यामागे ती शहरातील आहे हेही एक कारण असते. एवढेच नव्हे, तर आपला मुलगा बायकोची सांगणी ऐकतो असे म्हणून त्याला ही अद्वातद्वा बोलताना ही दिसते. ती मधू चुकीचा असला तरी त्याची बाजू घेताना दिसते आणि एकनाथवर ती पूर्ण विश्वास दाखवताना दिसत नाही. अलका घरात असेल तर ती घरातील कोणत्याच कामाला हात लावीत नाही आणि ती नसेल तेव्हा स्वयंपाकपाणी तर करतेच पण घरही अगदी लखलखीत ठेवते. एकनाथचा संसार मोडू नये म्हणून ती काही विशेष प्रयत्न तर करीत नाहीच पण तिला टोचून बोलायची वा तिच्या चुका काढायची एक ही संधी सोडत नाही. आपल्या मुलाचा संसार मोडतो आहे हे दिसत असताना तिचे त्याबद्दल उदास असणे आश्चर्यकारक वाटते. अलकाचे आपले दागिने विकायला विरोध केला म्हणूनच आपल्या जावयाने आत्महत्या केली असेही बोलायला ती मागेपुढे बघत नाही. कदाचित आपल्या मनाविरुद्ध झालेलं एकनाथचं लग्न तिला अजिबात मानवलं नसावे. एकूण सगळ्याचा परिणाम म्हणून तिची वृत्ती अशी तिरसट झाली असावी. स्त्रीचा मनोविश्लेषणात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीने देखील कादंबरीतील शेमंतामायचे पात्र चिंतनीय आहे. अलका हे या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र आहे. ती एकनाथचे शिक्षण बघून त्यांच्यासोबत या घरात लग्न करून आली होती. अलका शहरात लहानाची मोठी झाली होती, सुखात म्हणावी अशी वाढली होती. गावातले जीवन व शेतीची कामे तिला पूर्ण अपरिचित अशीच होती. गावातील जीवनांशी ती कधीच एकरूप होऊ शकली नाही. ती एकनाथला पुन्हा पुन्हा शहरात जाऊन राहण्यास विनवायची.

आपल्या हिस्याची जमीन विकूया म्हणून सांगायची. एकनाथचे आयुष्य वाया चालले आहे याची त्याला जाणीव करून द्यायची परंतु एकनाथ गाव सोडून जाण्यास तयार होत नाही आणि इथेच त्यांच्यातील दरी वाढत जाते. त्यातच शेवंतामाय तिची उणीधुणीच काढत असते व त्यातच अलकाने आपल्यासाठी आपल्या माहेरच्यांच्या पैशातून आणलेला आंघोळीच्या साबण मधू जबरदस्तीने घेतो व तिला मारहाण देखील करतो. ही मारहाण निर्णायक ठरते तिच्या सहनशक्तीचा अंत होतो व ती कायमची घर सोडून जाते. जाताना या घराला श्रापून देखील जाते. त्यानंतर ती एकदा एकनाथच्या समोर येते पण त्याला चुकवून जाते. अर्थात, अलकाच्या एकूण वागण्यासाठी तिला दोष देणे तेवढेसे बरोबर नाही. बारीक विचार केला असता, ती योग्यच वागते असेच म्हणावे लागते. खरे म्हणजे, ती ज्या सुखाच्या अपेक्षेने या घरात आली होती ते सुख तिला देण्यास एकनाथ कमी पडतो. लेखकाने पूर्णपणे न्याय दिलेले पात्र म्हणून आपणाला या कादंबरीत अलकाच्या पात्राकडे पाहता येते. तिच्या विचार करण्यात, वागण्यात आणि कृती करण्यात एक सुसूत्रता असल्याचे दिसते. 'चाळेगत' मधून महत्त्वाचे स्त्री पात्र म्हणून जे पुढे येते ती म्हणजे प्रिया. लेखकाची व तिची भेट रत्नागिरीत दोघही बी.एड. चे शिक्षण घेत असताना होते. ती धर्माने मुसलमान असते पण ती पारंपरिक मुसलीम वातावरणात वाढलेली नाही. तिचे वडील मुस्लीम सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते त्यामुळे त्यांचे घर आधुनिक विचारांचे होते. लेखकाचे प्रियावर प्रेम असूनही तो आपल्या घरात तिच्या सोबत लग्न करण्याचा विचार काढू शकत नाही आणि नोकरी धंद्याचे काहीच नक्की नसल्यांने घरच्यांच्या विरोधात जाऊन तो कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. प्रिया त्याची वाट पहातेय परंतु आता आपले प्रेम सफल होणे अशक्य आहे हे तिला पटू लागले आहे आणि म्हणूनच ती निराशेच्या गर्तेत गुरफटताना दिसते. समुद्रातील विशिष्ट प्रकारच्या दगडावर मिळणाऱ्या चिंबोऱ्या गोळा करून त्यांनी दंश केल्यावर जी नशा येते ती अनुभवून ती वास्तव विसरण्याचा प्रयत्न करताना दिसते. तिचा चुलता अनैतिक धंद्यात गुरफटला असून मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात पकडला गेला आहे. वडील कृतीशुन्य आहेत तर प्रियकर देखील घाबरटच आहे त्यामुळे जगण्यासारखे आपल्याकडे काही शिल्लक आहे, असे तिला वाटत नाही. अत्यंत विमनस्क अवस्थेतील हे पात्र लेखकांने अत्यंत संवेदनशील रित्या रेखाटले आहे. प्रियाच्या या अवस्थेस आपण कारणीभूत आहोत ही त्याच्या मनातील टोचही त्यातून व्यक्त होताना दिसते. 'तणकट' मधील मध्यवर्ती स्त्री पात्राचा विचार करताना सुली हे पात्र समोर येते. सुली काळी असली तरी कोणाच्याही नजरेत सहज भरेल अशी आहे. तिचे लग्न रामा सारख्या आडदांड माणसांशी होते. जो तिला कोणतेच सुख देऊ शकत नाही. ती कामाला वाघ आहे त्यामुळे सर्व जण तिला कामाला बोलवायला पहात असतात. कोणाकडे मान वर करून न पाहणारी

अशी तिची खरंतर प्रतिमा होती परंतु ती शेडबाळेच्या शेतावर ती काही वेळा गेली आणि शेडबाळेच्या गळला व्यवस्थित लागली. सुली सोबतच्या सलगीनंतर शेडबाळेचे म्हारवाड्यात जाणे वाढले. एकार्थाने ती शेडबाळेची रखेलच झाली. तीने कामाला जाणे बंद केले. शेडबाळे तिला नवीन घर बांधून दिले. दलित नेते गावात आले की त्यांची उठबस सुलीच्याच घरात होऊ लागली. शेडबाळेच्या सांगण्यावरून ती आपली छेड काढल्याच्या खोट्या तक्रारी देखील गावातील काही लोकांविरुद्ध करते. शेडबाळे सर्वांना टोप्या घालणार आहे हे कदाचित तिला माहिती नसावे पण जेव्हा शेडबाळे सर्वांना टोप्या घालून पळ काढतो तेव्हा सुली देखील त्याच्या बरोबर पळून जाते. एकूणच आपल्या सांसारिक जीवनात असमाधानी असलेली व त्यामुळे शेडबाळेच्या गळाला लागलेली अशी ही सुली आहे. स्त्री शारीरिक वा मानसिक दृष्ट्या आपल्या घरात अमाधानी राहिल्यास ती आपले सुख बाहेर शोधण्याचा प्रयत्न करते. अशावेळी तिचे आयुष्य भरकटते देखील हे सुली या पात्राचा अभ्यास केल्यावर लक्षात येते.  द्वारकाबाई हे 'ऐसे कुणबी भूपाळ' मधील मधील अत्यंत महत्त्वाचे असे स्त्रीपात्र आहे. योग्यवेळी योग्य निर्णय न घेतल्यास, प्रसंगी कठोर न झाल्यास सगळ्या गोष्टी कशा बिघडतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे द्वारकाबाई आहे. जेव्हा काशीनाथ चंद्रीच्या नादी लागतो तेव्हा ती त्याला जाब तर विचारत नाहीच परंतु विश्वनाथने तिला कामावरून काढून टाकली म्हणून तो रुसून मामाकडे जाऊन बसल्यावर विश्वनाथ व काशीनाथची बायको निर्मला यांचा विरोध असतानांही त्याच्या सर्व अटी मान्य करून ती त्याला पुन्हा घेऊन येते.  आई म्हणून हा तिने घेतलेला अत्यंत चुकीचा निर्णय होता. जेव्हा काशीनाथ शेताकडे जात देखील नाही तेव्हा ती त्याला एकदाही खडसावून जाब विचारत नाही वा त्याला शेताकडे जाण्यास बाध्य करीत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घरात तिच्याच शब्दाला वजन असूनही पैशांच्या हिशेबाबद्दल ती दोन्ही मुलगे कारभारी होतात तेव्हा एका शब्दाने त्यांना काही विचारत नाही. विश्वनाथ कारभारी झाल्यावर तो देखील अनैतिक गोष्टी करतोय हे लक्षात येऊनही ती गप्प राहते. एकूणच सगळे आयुष्य दुःखात गेलेले व दोन्ही भाऊ एकमेकांच्या उरावर बसत असून वाटणी अटळ आहे ही कटू सत्य स्वीकारत तिला या जगाचा निरोप घ्यावा लागतो. 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतील कासा आणि धुरपा ही दोन महत्त्वाची अशी स्त्रीपात्रे आहेत. कासा ही हरबाची दुसरेपणांची बायको. पहिल्या बायकोचा मुलगा हाणमू लग्नानंतर आत्महत्या करतो त्याचा ठपका तिच्यावर येतो. परंतु ती या सर्वात निर्दोष असते तरीही तिला बराच मनस्ताप सहन करावा लागतो. सावत्र मुलाने आत्महत्या केल्यानंतर सावकाराचे कर्ज व आत्महत्येचे प्रकारण मिटवण्यासाठी करावा लागलेला खर्च या सर्वासाठी घरातील बैल जोडी, जनावरे सर्व विकावे लागते व हारबा आपली जबाबदारी टाळून घर सोडून निघून जातो. अशावेळी कासा

काही महिने माहेरी जाऊन राहते. काही महिन्यात गावात येऊन मोठा मुलगा नामू याच्या सहाय्याने पुन्हा संसार उभा करते. घरच्यांचा विरोध शांत करीत गोपाळला शाळेत घालते व त्याच्यासाठी भरपूर खस्ता काढते. मुलींची व्यवस्थित लग्न लावून देते. त्यामुळे एक करारी बाई म्हणून तिची प्रतिमा या कादंबरीत निर्माण झाल्याचे दिसते. कादंबरीच्या उत्तरार्धात मांत्र तिचे अस्तित्व नाममांत्र राहिल्याचे दिसते. या पात्राला उत्तरार्धात लेखक न्याय देऊ शकला नाही अन्यथा हे पात्र अजूनही परिणामकारक झाले असते. 'धुरपा' ही नामूची बायको म्हणून या घरात येते ती कासाच्या भावाचीच मुलगी असल्यांने तिला या घरात तसा परकीपणा नसतो. ती या घरात लग्न होऊन येते तेव्हा अगदी दहा-बारा वर्षांची असते. लग्न मनाविरुद्ध झाल्याने नामू तिच्याकडे बरीच वर्षे दुर्लक्ष करीत असतो परंतु ती एकदाही कधी त्याबद्दल तक्रार करीत नाही. स्त्रीची जन्मजात असणारी सोशिक वृत्ती आपणाला धुरपाच्या पात्रात दिसून येते. आपल्या दिराला शिकायची हौस आहे परंतु घरचे लोक गाईला राखायला कोण नाही म्हणून त्याला शाळेत जाऊ देत नाहीत हे तिच्या लक्षात येते तेव्हा त्याच्याकडील काम ती आपल्यावर घेते व त्याचा शिक्षणाचा मार्ग मोकळा करते. ती आपल्या संसारासाठी खूप कष्ट सहन करते अगदी मरणांतून वाचते परंतु बरी झाल्यावर पुन्हा कामाच्या घाण्याला स्वतःला जुंपून घेते. आपल्या मुलाने शिक्षण घेतले पाहिजे याकडे देखील लक्ष देते. एकूणच धुरपाच्या माध्यमांतून खरी ग्रामीण स्त्री लेखकांने उभी केली आहे.

''साखरफेरा', 'पाडा', 'कापूसकाळ', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', फाटलेलं आभाळ या पाच कादंबऱ्यांचा विचार करता, अवकाळी 'पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील उषा, 'कापूसकाळ' मधील सुशाबाई, 'पाडा' मधील कमळाबाई, व 'साखरफेरा' मधील बायजा ही महत्त्वाची स्त्री पात्रे म्हणून आपणाला सांगता येतात. यातील उषाचे पात्र हे सर्वोत्कृष्ट रेखाटलेले पात्र म्हणून सांगता येते. "तायडीला तर पुरुषवाचक नावानेच हाक मारतात, 'तायड्या'. ती तर एखाद्या गड्यापेक्षा जास्त राबते. मढेला खांदा देऊन दोन्ही बैल जूखाली सापतीनं बांधून परत ताकदीनिशी लोखंडी नांगराचे दोन्ही दांडे हातांनी तोलून तिने मुरमाड रान नांगरलं आहे. ऐन कडाक्याच्या थंडीत एकटीनं शाळवाला पाणी दिलंय. सायकलवर वैरणीचं ओझं घेऊन घरापर्यंत आली आहे. वाटेत कोणी भेटलं तर एक पाय जमिनीला टेकवून ओझ्याचा तोल सावरीत बोलली आहे, परत तोल सावरून पायडलवर पाय ठेवून लालित्यांने निघून गेलीय." [34] तिचा भाऊ विलास याने केलेल्या तिच्या वर्णनांतून ती कशी मुलगी आहे हे सहज लक्षात येते. ती तेवढीच सुंदर व हुशार देखील आहे. तिचा बालपणांपासूनचा मित्र असलेला परंतु खालच्या समाजातील, मुळचा कानडी प्रदेशातील असलेला व आता लष्करात नोकरी करीत असलेल्या सुभाषवर तिचे प्रेम आहे. खरेतर ज्या दिवशी रात्री अवकाळी पावसाला सुरूवात होते त्याच्या दुसऱ्या

दिवशीच्या सकाळी ती त्याच्याबरोबर पळून जाणार होती. अवकाळी पाऊस सुरू झाल्याने अशावेळी आपण पळून गेल्यास घरच्यांचे काय होईल? या विचाराने ती आयत्या वेळी आपला निर्णय बदलते. आपण सुभाष सोबत पळूनजाण्या अगोदर शक्य तेवढा शाळू व कडबा घरात आणून टाकला नाही तर घरची कशी जगतील? या विवंचनेने ती कडबा व शाळू घरात भरल्यानंतर सुभाषसोबत पळून जाण्याचा निर्णय घेते. यावेळी आपल्या कुटुंबाबद्दल जे विचार तिच्या मनात येतात त्यातून तिला कुटुंबाबद्दल असलेली आपुलकी दिसून येते. तसेच, तिचे निष्पाप मन देखील व्यक्त होते. सुभाष सर्व तयारीनिशी आला असतानाही ती त्याला परत पाठवते व त्याच दिवशी तिचा बाप व आई दोघेही आत्महत्या करतात. या ध्यानिमनी नसलेल्या आत्महत्येमुळे तिचे सगळे जीवनच बदलून जाते. आईला शहरातील हॉस्पिटलमध्ये घेऊन जातात तेव्हा आईसोबत उषा असते. सुभाष त्या ठिकाणी येतो तेव्हा आता यापुढे आपलं लग्न शक्य नाही मला कुटुंबाची जबाबदारी झटकून तुझ्याशी लग्न करता येणार नाही हे ती त्याला स्पष्ट शब्दात सांगते. एकार्थाने प्रेमाचे सर्व पाश ती तोडून टाकते. ती अत्यंत करारी आहे. बाप गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी जेंव्हा ती शेतावर जायला निघते तेव्हा चुलता तिला तिथे कोण भेटायला येणार आहे? असे विचारतो; तेव्हा, "कालपासून गुरं बांधून आहेत उपाशी, कोण भेटणार असेल तर बघायला या पाठीमागून." [35] असे सडेतोड उत्तर द्यायला ती मागेपुढे बघत नाही. जेव्हा चुलत्याच्या बोलण्यातून आईच्या पिंडाला कावळा शिवला नाही असे तिला समजते तेव्हा दोन्ही बहिणींना घेऊन ती स्मशानात जाते व आपल्य मृत आईला उद्देशून म्हणते, "आधीच अडकलाय तुझा जीव आमच्यात. घासभर धड न खाता पिताच तुम्ही उठून गेलात. हे बघ असा जीव नको अडकावूस इथं. मी हाय ना? हे बघ डोळे पुसलं. न्हाय जात मी कुठं. मग तर झाले ना? मी वचन देतेय तुला तुझी पोरगी."[36] यातून ती किती भाऊक आहे, आपल्या कुटुंबाबद्दल किती समर्पित आहे आणि किती समंजस आहे याची आपणाला जाणीव होते. ही कादंबरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर केंद्रीत असली तरी उषाचे पात्र या कादंबरीला खूप वरच्या पातळीवर घेऊन जाते एवढे निश्चित! 'साखरफेरा' मधील बायजाचे पात्र देखील असेच कणखर आहे आपल्या नवऱ्याला प्रत्येक गोष्ट अगदी तोंडावर स्पष्टपणे सांगायला ती अजिबात मागेपुढे पहात नाही. ऊस जळून तीन महिने झाले तरी नवरा काहीच हालचाल करीत नाही हे लक्षात येते तेव्हा, 'तुमचं काय चाललय? तुम्हाला व्यवस्थित वागायचे नसेल तर मी मुलाला घेऊन माहेरी जाईन' असे ती नवऱ्याला स्पष्टपणे सांगताना दिसते. कुडबुड्या जोशी जेव्हा काहितरी भविष्य सांगून किशाकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करीत होता व किशा त्याच्या बोलण्यात वाहत जात होता तेव्हा ती त्याठिकाणी येते व त्याला हाकलून लावते व त्याबद्दल किशा तिला जाब विचारू लागतो तेव्हा, "आमच्यात

भांडणं लावतोय व्हय त्यो कुडबुडा, त्येच्या गांडीला धोतार मिळंना आनी ह्यो गावाचं जोतिष सांगतोय. घर हाय तिथं भांडान हाय. त्या भाड्याचं घरात बायकुबरुबर भांडान होत नसंल? हां!" [37] यातून ते किती विचारी आणि सद्सदविवेक बुद्धीला स्मरून वागणारी आहे हे लक्षात येते. शेतकऱ्यांच्या बायकोने कसे असावे याचे उदाहरण म्हणजे बायजा हे पात्र आहे. 'कापूसकाळ' मधील सुशाबाई बद्दलही हेच सांगता येईल. एकूण कादंबरीत ती नवऱ्याच्या कायम सोबत असल्याची दिसते. नवरा आपल्या मुलीच्या शिक्षणाबद्दल काहिसा उदास असला तरी ती मात्र तिची शिक्षणाची आवड लक्षात घेऊन तिला दररोज शाळेत पाठवते. मुलाला डॉक्टरकडे घेऊन जातांना ती सोबत कापूस घेऊन गेलेली असते तेव्हा व्यापारी कमी दर सांगतो, तूट म्हणून काही कापूस द्यावा लागेल हे सांगतो तेव्हा, ती त्याच्याबरोबर भांडून जास्त दर व वजनातील तूट कमी करून घेते. त्यातून तिचा करारीपणा देखील दिसून येतो. 'पाडा' मधील 'कमळाबाई' ही नवऱ्याच्या काहीशा विचित्र स्वभावाने धास्तावलेली आहे. आपल्या मुलीला चांगले घर मिळाले पाहिजे असे तिला वाटते परंतु चांगल्यास्थळी लग्न ठरूनही नवरा काहीच हालचाल करीत नाही म्हणून ती वैतागलेली दिसते. 'मुलीचे लग्न करून द्यायचे आहे कि नाही?' हे देखील ती एकदा स्पष्टपणे त्याला विचारताना दिसते. लग्नाचा बस्ता काढणं ठरलेलं असताना; नवऱ्याने बाजारात नेलेला सगळा 'पाडा' रस्त्यावर फेकून दिला हे कळते तेव्हा तिला नवऱ्याच्या वागण्याचा प्रचंड राग येतो व ती पूर्ण कोसळते. मुलीचे लग्न मोडते परंतु मुलीला लग्नाशिवाय घरात बसवून ठेवता येणार नाही म्हणून शेवट चांगदेवची बहीण काशिबाई हिच्या मुलाची सोयरिक ती मान्य करते. काशीबाईचा स्वभाव माहीत असल्याने आपली मुलगी तिथे सुखात राहू शकणार नाही हे तिला स्पष्टपणे माहीत असते परंतु परिस्थितीपुढे शरण जाण्याशिवाय तिच्याकडे दुसरा मार्ग नसतो. या सर्व ताणातून ती आजारी पडते व हे जग सोडूनही जाते. एकूणच शेतकरी कुटुंबात स्त्रियांची घुसमट कशी होते त्याचे प्रातिनिधिक रूप म्हणून आपणाला कमळाबाईच्या पात्राकडे पाहता येते. फाटलेलं आभाळ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण असे स्त्रीपात्र असल्याचे दिसत नाही.

'चिखलवाटा' मधील व्यंकटची बायको साधना व अर्जुनची बायको रुक्मिणी ही दोन महत्त्वाची स्त्री पात्रे आहेत. खरेतर, दोन भिन्न मानसिकतेच्या त्या प्रतिनिधी आहेत. रुक्मिणी आपले घर व संसार यात गुरफटलेली आहे. तिला पाच मुले आहेत. ती अत्यंत सुस्वरूप आहे तिला शहरातील एका प्राध्यापकाचे स्थळ आले होते पण 'घरची शेती असल्याशिवाय काही खरं नाही' या पारंपरिक विचारसरणीतून तिचा बाप त्याला नाकारून या शेतकऱ्यांच्या मुलासोबत तिचे लग्न लावून देतो. भावाकडे पैसे मागायला जाते तेव्हा भावजयीच्या तिच्या सोबतच्या व्यवहारांने तिला कानकोंडे व्हायला होते. आपल्या मुलीचे लग्न ठरत नाही तेव्हा मात्र ती अस्वस्थ

होते, प्रसंगी काही एकर जमीन विकून देखील मुलीचे लग्न केले पाहिजे या मताची ती असते. शेवट म्हातारा जेव्हा जमीन विकायला तयार होतो तेव्हां ती आनंदीत होते. पारंपरिक ग्रामीण स्त्रीची प्रतिनिधी म्हणून आपणाला रुक्मिणीकडे पाहता येते. साधना शहरात राहात अल्यांने ती शहरी जीवनाला चटावली आहे. आपले स्वतःचे घर असावे असे तिला वाटते कारण भाड्याच्या घरात राहून ती कंटळली आहे. नवऱ्याच्या सांगण्यावरून ती बी.एड. करते व तिच्या शैक्षणिक कौशल्यावर तिला नोकरी मिळते. विकास त्यांच्या घरी राहायला येतो तेव्हा ती त्याला घालूनपाडून बोलते परंतु मग मात्र त्यांच्यात जिव्हाळा निर्माण होतो. माणूस त्या त्या परिसरात राहिला की त्या ठिकाणचे जीवन ज्या प्रकारचे असेल त्या प्रकारचे जीवन आपण जगावे असे वाटणे ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे व तीच प्रवृत्ती साधनांमध्ये असल्याचे दिसते. दोन वेगळ्या प्रवृत्तीची प्रतिनिधी म्हणून या दोन्ही स्त्री पात्रांना कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. 'एसईझेड' केंद्रस्थानी असणारे किंवा कादंबरीत आपला प्रभाव निर्माण करील असे एकही स्त्री पात्र दिसून येत नाही. 'बोडखी' या कादंबरीतील स्त्री पात्रांचा विचार करता. डोमाची बायको कौसल्या व मुलगी गोदावरी ही महत्त्वाची आहेत. कौसल्येला आपल्या माहेरी सावत्र आईचा खूप जाच सहनकरावा लागला होता. ती तिच्याकडून चामडे कमावण्याचे सगळे काम करून घेत असे. लग्न झाल्यानंतर डोमा सारखा समंजस नवरा मिळाल्याने व गुफा सारखी सासू मिळाल्याने तिचे दिवस आनंदात जातात. सासूचे निधन होते व प्रकाश व त्या पाठोपाठ गोदावरीचा जन्म होतो व संसार चालवण्यासाठी तिलाही रोजंदारीच्या कमाला जावे लागते. मुलगी जराशी मोठी होते तेव्हा ती देखील आई सोबत रोजंदारीवर जाऊ लागते. डोमाला पोलीस पकडून नेतात आणि तिच्या आयुष्यातील घातचक्राला सुरूवात होते. अगोदर डोमाने खरच चोरी केली असावी असे तिला वाटते आणि ते मनाने खचून जाते. पोलीस पाटलांने दम दिल्यांने प्रकाश तिला सत्य सांगत नाही. जेव्हा ती मुलांना घेऊन डोमाला भेटायला जाते तेव्हा तिला सत्याचा उलगडा होतो. एक दिवस रात्रीचा पोलीस पाटील येतो व रात्रीचा प्रकाशला जबरदस्तीने कापूस चोरण्यासाठी पाठवतो व कापूस चोरीच्या आरोपात त्याला आत पाठवतो अशी धमकी देऊन तिच्यावर लेंगिक अत्याचार करतो व हे दररोजचेच सुरू होते. तो अक्षरशः तिचे शोषण करतो. ती सगळा कामधंदा सोडते नुसती घरात बसून राहते. जिवंतपणी तिला नरकयातना भोगाव्या लागतात. जेव्हा डोमा तुरूंगातून सुटून येतो तेव्हा तिची यातून सुटका होते. एका दलित स्त्रीचे तिच्या असाह्यतेचा फायदा घेऊन तिचे कसे शोषण केले जाते ते यातून लक्षात येते. गोदावरी ही डोमाची मुलगी तिला लहानपणातच चांगली समज आली आहे. खरेतर ती मुलगी असल्याने नकळत तिला घरातही दुय्यम वागणूक मिळते. प्रकाशला गव्हाच्या पोळ्या मिळतात तेव्हा तिला मात्र सुखे तुकडेच मोडावे लागतात. कौसल्या बरी

नाही होते तेव्हा ती घरातील सर्व जेवण करायला शिकते. आपली माय हळूहळू चालते हे बघून ती तिला झपझप चालायला सांगते कारण हळू चालून उशिरा पोचल्यास मंजुरी चुकण्याची शक्यता असते व मजूरी मिळणे किती महत्त्वाचे हे तिला माहीत असते. एकूणच एक अत्यंत समंजस मुलगी म्हणून गोदावरीचे पात्र या कादंबरीत चित्रित झाले आहे.

'गावठाण' आणि 'जिनगानी' यो दोन्ही कादंबऱ्या स्त्रीपात्र प्रधान अशा आहेत. 'गावठाण' आंदी या पन्हाळयाच्या डोंगरात आपल्या कुटुंबासोबत राहत राहत असलेल्या व लग्न करून मैदानी भागात गेलेल्या 'आंदी' या स्त्रीची करूण कहाणी तिच्याच शब्दात चित्रित झाली आहे. बालपणी गुरेवासरे राखणे हेच तिचे जीवन आहे. तांबूजाईवर श्रद्धा ठेवून ती सर्व गोष्टी करताना दिसते. गुरे राखतानाचे तिचे अनेक अनुभव कादंबरीच्या पूर्वार्धातून चित्रित झाले आहेत. आंदी या जीवनांत पूर्णपणे रमल्याचे दिसते. लग्न होऊन गेल्यावर मात्र तिचे आयुष्य उत्तरोत्तर कठीण होत जाते. एकत्र कुटुंबात तिची बऱ्याच वेळा घुसमट होते. तिचा नवरा घरचे सगळे व्यवहार बघत असतो तेव्हा तो तिचे काहीच ऐकून घेत नसतो. तिला लागोपाठ दोन मुली होतात आणि मुलगा होण्यासाठी घरातून त्रास सुरू होतो. तिसऱ्या वेळी मुलगा होतो तेव्हा नवरा खुश होतो. ती मुलाला घेऊन माहेरून घरी येते तेव्हा घरात वाटणीच्या गोष्टी सुरू असतात. सगळा पैसा आंदीच्या नवऱ्याच्या ओषधपाण्यावर खर्च होतो असा आरोप त्याच्यावर होतो तेव्हा आपल्या नवऱ्याला काळजाचं दुखणं आहे ही तिला समजते. त्यातच घरच्या वाटण्या होतात आणि तिचे दुर्दैवाचे फेरे सुरू होतात. ती रोजगारासाठी जाऊन घर चालवण्याचा प्रयत्न करते. घरात कधी चूल पेटते तर कधी नाही अशी अवस्था सुरू होते. शक्य तेवढा पैसा ती नवऱ्याच्या औषधपाण्यावर खर्च करते. घरातील माणसे ढुंकूनही पाहत नाहीत. अशातच हळूहळू दुखणे वाढत जाते आणि एकदिवस त्याचा मृत्यू होतो. ती न डगमगता सगळया संकटांचा सामना करीत जगण्याचा संघर्ष कायम ठेवते. आपल्या दोन्ही मुलींची लग्ने करते व याच वेळी जो आजार नवऱ्याला झाला होता तोच मुलालाही झाला आहे हे समजते तेव्हा मात्र ती कोसळते. ती जगण्याची लढाई देखील हरल्यासारखी वाटते कारण ती आपले घर सोडून माहेरचा रस्ता धरते. आयुष्यभर संघर्ष करणारे पण शेवट मांत्र नियतीच्या समोर हरलेले असे हे पात्र आहे. जगण्यातील सगळी वेदना आंदीच्या माध्यमातून लेखकांनी परिणामकारक रित्या चित्रित केल्या आहेत. आयुष्यभर संघर्ष करणारे हे पात्र शेवट हतबल झालेले का दाखवले हे मात्र लक्षात येत नाही. ग्रामीण भागातील स्त्र ही चिवट असते आणि ती सहसा परिस्थिती समोर हार जान नाही हा अनुभव असतो. 'धग' कादंबरीतील कौतिक शेवट असाह्य स्थितीत वेडी झालेली दाखवली आहे. कौतिक वेडी होण्याचे परिस्थितीजन्य विश्लेषण

करता येते परंतु आंदीच्या परिस्थिती शरणतेचे विश्लेषण करता येत नाही. 'राधाबाई' या पात्रा भोवती 'जिनगानी' कादंबरी उभी राहिल्याचे दिसते. राधाबाईचा जन्म खाऊन पिऊन सुखी कुटुबातला होता. लग्न करून तिला धानोऱ्यातील प्रभू पाटलांच्या घरात दिली जाते. तीस एकर जमीन असलेले हे मोठे घराणे होते. सासू नसल्याने लग्न करून आल्यावर तिच्याच खांद्यावर सर्व जबाबदारी आली जी तिने फार कौशल्याने पार पाडली. या हसत्या खेळत्या घराला कोणाची तरी नजर लागते. वारीला गेले असता वारीतील घोडा उधळतो व त्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत प्रभू पाटलांचा मृत्यू होतो. हे दुःख राधाबाई व तिचा नवरा श्रीपती यांना पचवणे कठीण जाते. नंतर काही आनंदाने क्षण त्यांच्या वाटेला येतात. राधाबाईला दिवस जातात व तिला मुलगा होतो परंतु हे आनंदाचे क्षण काही काळच त्यांना उपभोगता येतात. संजू चार वर्षाचा असताना बाहेर प्रातर्विधीला बसला असता त्याला पिसाळलेला कुत्रा चावतो व त्याच्यावर फक्त गावठी उपचार केले जातात. या वेळेपासून त्याची प्रकृती खालावू लागते. त्यातच श्रीपतीची देखील तब्येत बिघडते. श्रीपती दुखणं आंगावर काढतो व जेव्हा रक्ताच्या उलट्या होऊ लागतात तेव्हा दवाखान्यात नेण्याची घाई केली जाते परंतु वाटेतच त्यांचा मृत्यू होतो. राधाबाईवर दुःखाचा डोंगर कोसळतो तरीही ती धीराने परिस्थितीला सामोरी जाताना दिसते. तिच्या दुःखाचे फेरे इथेच संपत नाहीत. छोट्या बहिणीच्या साखरपुड्याला माहेरी गेली असता तिचा मुलगा संजू हा देखील मृत पावतो. हा धक्का पचवणे तिला खूप कठीण होते परंतु ती हार मानीत नाही व जगण्याची लढाई लढण्यास सिद्ध होते. तिला दुसरे लग्न करण्यास अनेकजण सांगतात. सगळी जमीन विकून टाकण्यास सांगतात पण ती कशालाच बधत नाही. मध्यंतरी तिची मधली बहीण राणू हिचे निधन होते व तिची मुलगी गीता ही पोरकी होते. ती या पोरक्या झालेल्या मुलीला आपल्याकडे घेऊन येते व स्वतःच्या मुलीसारखी वाढवते व तिचे लग्न ही लावून देते. तिच्या घरचे अत्यंत लोभी असतात ते राधाबाईने आपली सारी जमीन गीताच्या नावावर करून द्यावी म्हणून हट्ट धरतात व त्यासाठी गीताचा छळ करतात. दररोजच्या छळाला कंटाळून ती पुन्हा राधाबाईकडे येते. मनातून गीताला देखील राधाबाईने जमीन आपल्या नावावर करावी असे वाटत असते. राधाबाईच्या भावाला राधाबाईने आपल्या मुलाला दत्तक घ्यावे असे वाटत असते. भावकितल्या लोकांना दुखवणे चांगले नाही म्हणून भावाच्या मुलाला दत्तक न घेता आपल्या चुलत पुतण्याचा मुलगा शिवा याला राधाबाईदत्तक घेते व आपल्या भावाची नाराजी देखील दूर व्हावी म्हणून त्याची मुलगी मीरा यांच्यासोबत त्याचे लग्न लावून देते. गीताचा नवरा गीताला सवत आणणार असल्याचे तिला समजते व ती आपल्या या मुलीच्या चिंतेने अस्वस्थ होते व इथेच कादंबरी संपते. एखाद्याच्या आयुष्यात सुख नसते फक्त दुःखच वाट्याला येते. राधाबाईची व्यक्तिरेखा अशाच प्रकरची आहे. सुख तिला कायम हूल देताना

दिसते. आयुष्यात एवढी संकटे येऊनही ती डगमगत नाही तर सर्वाचा सामना करते. तिच्या नवऱ्याचा आणि मुलाचा मृत्यू योग्यवेळी योग्य उपचार झाले असते तर टळला असता हे मात्र कादंबरी वाचत असताना जाणवत राहते. राधाबाईने गीतावर काहिसा अन्याय करते असेही कादंबरी वाचत असताना जाणवत राहते. अगोदरच भावकीतला एखादा मुलगा दत्तक घेऊन त्याच्यासोबत ती गीताचे लग्न का लावून देत नाही? हा प्रश्न मनात कायम येत राहतो. तसेच, त्यांच्या समाजात दुसरे लग्न करण्याची परंपरा असते तर राधाबाई दुसरे लग्नं नकरता विधवा राहिल्याचे दाखवून लेखिकेला नेमके काय सांगायचे आहे? हे देखील लक्षात येत नाही. परिस्थिती समोर संघर्ष करणारे, म्हणून हे पात्र आपल्यासमोर ठामपणे उभे राहते. या कादंबरीतील इतर स्त्रीपात्रांचा विचार करीत असताना 'गीता' या पात्राचाही विचार करावा लागतो. गीता हिला अनाथ म्हणून सर्वत्र हिणवून घ्यावे लागते. ती काहीशी आक्रमक स्वरूपाची आहे. उगाच कुणाचे ऐकून घेणारी नाही कदाचित हा तिचा स्वभाव देखील तिला काहिसा मारक ठरत असावा. एकूण तिच्या जीवनाची फरफटच होते व त्याला काही अंशी राधाबाईने कारणीभूत आहे असे दिसून येते आणि हे राधाबाईला देखील मान्य आहे म्हणूनच गीताचा नवऱ्याने दुसरे लग्न केले ही बातमी समजते तेव्हा ती चक्कर येऊन पडते.

'इदवास', 'वाहतं पाणी', 'भगदाड' आणि 'वनराईचा लढा' या अभ्यासात घेतलेल्या चारही गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधील स्त्री पात्रांचा विचार केला असता. 'वनराईचा लढा' व 'इदवास' या दोन कादंबऱ्यांच्या केंद्रवर्ती म्हणावीत अशी स्त्री पात्रे असल्याची दिसत नाहीत. 'वाहते पाणी' या खादंबरीत 'संध्या' हे पात्र महत्त्वाचे आहे. ती पेशाने पत्रकार आहे. ती मुलाखत घेण्याच्या माध्यमातून सत्याजीच्या जवळ येते. तिचा परिचय पटेल गुरूजींशी होतो तेव्हा तिच्याही अनेक मनोधारणा बदलतात व ती आपल्या जीवनाविषयी नव्याने विचार करू लागते. नव्याने झालेल्या वैचारिक संक्रमणातून ती सत्याजीच्या नवीन कामात त्याला पूर्ण साथ द्यायची ठरवते व समर्पित वृत्तीने त्याच्याशी एकरूप होते. सत्याजीला आपला जीवनसाथी म्हणून निवडताना ती जात-पात, पैसा-अडका, कशाचाही विचार करीत नाही. एक प्रामाणिक आणि समर्पित वृत्तीची स्त्री म्हणून ती या कादंबरीतून पुढे येते. 'भगदाड' मधील मधुबाला हे स्त्री पात्र महत्त्वाचे आहे. कादंबरीतील नायकाशी जेव्हा या पात्राची पहिली भेट होते तेव्हा नायकाला देखील हे पात्र जास्त आगाऊ असल्यासारखे वाटते. हळूहळू त्यांच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात होते. मोर्चाच्या वेळी ती सावली सारखी त्याच्या सोबत राहते व त्याचे रक्षण करते. खरेतर तिच्यामुळे तो वाचतो असेही म्हणता येईल. आपल्या मुलाबद्दल मधुबालाची काळजी व आपलेपणा पाहून स्वरूपची आई त्यांचे प्रेम सहजतेने स्वीकारताना दिसते. मनापासून एखाद्यावर प्रेम करणारी

व त्या साठी कोणताही त्याग करण्यास तयार असलेली म्हणून मधुबाला आपल्या लक्षात राहते. अभ्यासाठी निवडलेल्या कादंबरीतील स्त्री पात्रे एका ठरावीक चौकटीत राहून आपला जीनवव्यवहार करताना दिसतात. या स्त्री पात्रांचा परामर्श घेतला असता काळ बदलला असला तरी ग्रामीण स्त्रीच्या जगण्यात नोंद घ्यावेत असे कोणतेच बदल झाल्याचे दिसत नाहीत. आजही ग्रामीण स्त्रीची परिस्थिती कशी आहे याचे वास्तव दर्शन या कादंबऱ्या घडवतात व हेच नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील स्त्री वास्तव आहे असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

**4.3.1.3 खल प्रवृत्तीची पात्रे**

'बारोमास' मधील खलप्रवृत्तीच्या पात्रांचा विचार करीत असताना सर्वात अगोदर समोर येणारे पात्र म्हणजे दगडू महाकाळ अर्थात तो मुद्दाम दुसऱ्याचे काही वाईट करावे म्हणून काही करतो असे नाही परंतु व्याजाने पैसे देण्याचा त्याचा धंदा असल्याने पैसे परत न मिळाल्यास तो त्या माणसाच्या जमिनी बळकावतो. गावातील सत्तेची सूत्रे पण त्याच्याच हातात आहेत. त्यामुळे अधिकार गाजवण्याची वृत्ती देखील त्याच्याकडे आहे. मधू गावात त्याच्या विरुद्ध बोलतो म्हणून सरकारी योजनेतून मिळू शकणारा संडास तो त्यांना मिळू देत नाही. कल्याणीचा मळा दोन लाखाला त्यांच्याकडे गहाण टाकला जातो. त्या मळ्यातील आपल्या बापाच्या समाधीची त्यांने केलेली दुरावस्था, त्या ठिकाणी चाललेल्या दारूच्या आणि मटणाच्या पार्ट्या, या जमिनीत गांजा लावायची असलेली महाकाळची योजना व एक लाख रुपये देतो आपला अर्धा मळा पुन्हा दे म्हणून सांगितल्यावर महाकाळनें केलेला अपमान या सर्वांमुळे सुभानराव आत्महत्येचा प्रयत्न करतो. एकूणच दगडू महाकाळ हा काहिसा निर्दयी वृत्तीचा आहे असेच दिसून येते. या कादंबरीतील सर्वात मोठे खलपात्र कोण असेल तर तो निसर्ग. कारण निसर्गाच्या बेभरवशीपणामुळेच शेतकरी सर्वात जास्त नाडला जातो असे दिसून येते. त्याचबरोबर, शेतकऱ्यांच्या मालाचा भाव ठरवणारे व्यापारी व सरकारचे आयात-निर्यात धोरण या सर्वच गोष्टी शेतकऱ्यांच्या आयुष्यात खलनायकाची भूमिका पार पाडतात असे दिसते. 'चाळेगत' सारख्या कादंबऱ्यांतून देखील एकूण बदलती व्यवस्थाच ही खलनायक म्हणून पुढे येताना दिसते. मग ते मच्छिमारांचे प्रश्न असतोत की मरिना पार्कचे किंवा गॅस पाईपलाईन टाकण्याचे वा अनिर्बंधपणे सुरू होणाऱ्या खाण व्यावसायाचे. राजकारण्यांचा या सर्वाला वरदहस्त आहे परंतु कोणता एकच राजकीय पक्ष यामागे आहे असे नाही तर सर्वच राजकीय पक्ष आपल्या स्वार्थाचा विचार करताना दिसतात. भ्रष्ट राजकीय व्यवस्था ही आजच्या सामन्य माणसाच्या जगण्यातील सर्वात मोठी खलनायक आहे हे ही कादंबरी अधोरेखित करताना दिसते. एक दोन राजकीय व्यक्ती या खल प्रवृत्तीच्या आहेत असे आपणाला म्हणता येते परंतु ते पूर्णपणे तसे आहेत असेही म्हणता येत नाही. 'बाळासाहेब शेडबाळे' हे खलपात्र म्हणून

'तणकट' या कादंबरीतून पुढे येताना दिसते. शेडबाळे चांगला शिकलेला आहे, हुशार म्हणावा असा आहे आणि आक्काबा राणेंच्या शब्दांमुळे त्याला बँकेत चांगली नोकरी देखील मिळाली आहे.  एकदा आपले बुड स्थिरस्थावर झाल्यावर त्यांने अनेक उचापती करायला सुरुवात केल्याचे दिसते.  व्याजाने लोकांना पैसे देऊन ते न फेडता आल्याने काहिंच्या जमिनी त्यांने आपल्या नावे करून घेतल्या आहेत.  कोणत्यातरी योजनेतून मिळणारे दोन भूखंड लाटले आहेत. गावातील सोसायटीत अफरातफर करून तो साठ हजाराचा घोटाळा करतो व स्वतः मात्र नामानिराळा राहतो. हे करण्यासाठी तो म्हारवाड्यातील एकाला हाताशी धरतो. अत्यंत विश्वासाने बंडू चेअरमनने सर्व कारभार एक संचालक म्हणून त्याच्या हातात दिलेला असतो त्याचा तो बरोबर गैरफायदा घेतो व बंडू चेअरमनलाच अडकवतो. अर्थात यामुळेच त्याला मारहाण होते आणि आक्काबा राणे त्याला हॉस्पिटलमध्ये पोहोचवतात म्हणून तो वाचतो. आपणाला 'लेकावळा' म्हणजे हलका समजतात ही सल देखील त्याच्या मनात कुठेतरी असते.  त्याला झालेल्या मारहाणीनंतर गावाला होता होईल तेवढा त्रास देण्याचे तो ठरवतो व म्हारवाड्यातील तरूण पोरांना आपल्या हाताखाली घेतो व कट-कारस्थाने सुरू करतो. तो अत्यंत चलाख आहे म्हणूनच तो अनेकदा कबीर आपल्यासोबत यावा म्हणून प्रयत्न करतो पण कबीर त्याला दाद देत नाही. आपुण्या म्हाराला सरपंचाचा मुलगा मारहाण करतो आणि या मुद्द्यावरून तो म्हारवाड्यातील तरूणांना भडकावतो. गावावर मोर्चा न्यायला लावतो. पोलीस तक्रार होते. म्हारांना गावावर बहिष्कार घालण्यास सांगतो व गाव व म्हारवाडा यात दरी निर्माण करतो. तो आपण म्हारवाड्याच्या कल्याणासाठी वावरतोय हे आपल्या अनेक कृतीतून दाखवून देतो.  म्हारवाड्यातील वृद्धांना कोणत्यातरी योजनेतून दरमहा पेन्शन सुरू करवून देतो. म्हारवाड्यातील प्रत्येक घरात लाईट घेऊन देतो. गावातील तरूणांचे मंडळ निर्माण करतो. दलित नेत्यांना बोलावून धुमधडाक्यात म्हारवाड्यात आंबेडकर जयंती साजरी करतो व हे सर्व करताना पदरमोड ही करतो. हे सर्व करीत असताना गाव व म्हारवाडा यातील संघर्ष कायम राहील याची काळजी घेतो. तो म्हारवाड्यासाठी पतसेस्था मंजूर करून आणतो व त्यासाठी हजारो रूपये लाच म्हणून देखील देतो. गवत्या व इतरांना हाताशी धरून गोड बोलून अनेकांच्या नावावर हजारोंच्या कर्जाची उचल करतो आणि जेंव्हा तो घरातील बायकोशी दररोज भांडतो म्हणून आजुबाजूचे लोक येऊन त्याला मारून अर्धमेला करतात व त्याला हॉस्पिटलमध्ये भरती केले जाते तेव्हा तिथूनच तो सुलीला घेऊन अगदी नियोजन बद्ध रीतीने पोबारा करतो. सर्व योजना तो अगदी काटेकोरपणे आखतो हे लक्षात येते. लेखकाने हे पात्र अगदी जाणीवपूर्वक निर्माण केले असून अशाप्रकारच्या ज्या प्रवृत्ती समाजात वावरत असतात व एका अर्थाने समाजाला पोखरत असतात त्यांचे नेमके दर्शन या पात्राच्या

घडवले आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीत खलस्वरूपाचे म्हणावे असे एकही पात्र नाही परंतु काशीनाथ आणि विश्वनाथ हेच एकामेकांच्या विरोधात ठाकल्याचे दिसतात किंवा श्रीपती व किसन, निर्मला व पुष्पा, गंगू, सुनंदा व कुसुम हीच एकमेकांसाठी खलप्रवृत्तीची पात्रे होताना दिसतात. घरातील माणसांत अविश्वास वाढतो तेव्हा कुटुंबाच्या उद्‌ध्वस्ततेसाठी बाहेरच्या कोणाची गरज नसते घरचे लोकच एकमेकांविरुद्ध ते काम करतात याची प्रचिती ही कादंबरी वाचताना वेळोवेळी येते. एकत्र कुटुंबाचे कोसळणें आणि जमिनीच्या होणाऱ्या वाटण्या या विषयाभोवती केंद्रीत असलेली ही कादंबरी आहे. हे सर्व घडण्यासाठी घरातील माणसेच एकमेंका विरूद्ध खलप्रवृत्तीने वागत असतात हे ही कादंबरी नेमकेपणांने अधोरेखित करते. 'विष्णू सावकार' हे 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतील खलपात्र आहे. त्याच्याकडून हरबाने दोनशे रुपये कर्जाऊ घेतलेले असतात परंतु पेरण्या उलटल्याने तो ते देऊ शकत नाही. सावकार घरी बेरड धाडून तो हारबाला वसूलीसाठी तकादा लावतो. त्याचा डोळा हारबाच्या दीड एकरच्या माळावर असतो. शेवटी नामूला मारवाड्याकडे सालाला लावून तो विष्णूचे कर्ज फेडतो. जेव्हा हाणमू आत्महत्या करतो तेव्हा पुन्हा विष्णू सावकार हारबाच्या भावकीतील लोकांना हाताशी धरून त्याचा खून घरच्यांनीच केल्याचा खोटा आळ त्यांच्यावर आणण्याचा प्रयत्न करतो परंतु तो फसतो. हाच विष्णू सावकार गोपाळला नोकरी लागल्यानंतर हारबाकडे गोड बोलून आपल्या नातीची सोयरिक गोपाळसाठी आणतो. एकूणच स्वार्थी आणि आपमतलबी अशाप्रकारचे हे पात्र या कादंबरीतून चित्रित झाले आहे.

''साखरफेरा', 'पाडा', 'कापूसकाळ', 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', 'फाटलेलं आभाळ' या पाच कादंबऱ्यांतील खलपात्रांचा विचार केला असता. 'साखरफेरा' कादंबरीतून साखर कारखान्यातील संचालक विशेषतः संभा खंदारे हे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना मारबडव करून आपला ऊस कारखान्यात आणण्याचा प्रयत्न करतात ही त्यांची कृती बहुतांश शेतकऱ्यांच्या भावनांच्या विरोधात असली तरी हे पात्र अगदी खलवादी प्रवृत्तीचे आहे असे म्हणता येत नाही. ही एका विषयासंबंधी घेतलेली टोकाची भूमिका होती असे म्हणता येते. या कादंबरीतील खरी खलवादी प्रवृत्ती म्हणून निसर्ग, साखर कारखानदार, सरकारचे साखर विषयक धोरण याचाच उल्लेख करावा लागेल. 'कापूसकाळ' मध्ये देखील भ्रष्टाचार, व्यापारी, भ्रष्टाचाराने माखलेली कापूस खरेदी केंद्रे, या सर्वांचाच कादंबरीतील खलनायक म्हणून उल्लेख करावा लागेल, 'फाटलेले आभाळ' मधून कुसाप्पा हे पात्र खलप्रवृत्तीचे म्हणून रेखाटले आहे परंतु एकूण कादंबरीत हे पात्र अत्यंत गौण आहे. 'पाडा' मधून देखील खरेदी संस्था, व्यापारी, वाहतूकदार हे सर्व खलनायक म्हणून समोर येतातच परंतु ज्या प्रकारे शेवट चांगदेवला मंजूर झालेला ट्रक रमेश तपकिरे कडे वळविला जातो, एकनाथ त्याच्याकडे पैसे मागायला गेला

असता तो त्याला जमीन गहाण ठेवायला सांगतो वा ज्या प्रकारे चांगदेवशी व्यवस्थित बोलाचाली न करता चांगदेवच्या मुलीच्या लग्नात भरभक्कम हुंडा देण्याचे मान्य करून टाकतो ते सर्व बघितल्यास त्याला राजकीय बदला म्हणून चांगदेवला त्रास द्यायची मनिषा लक्षात येते, त्यामुळे हे पात्र खलप्रवृत्तीचे आहे असे म्हणता येते. चांगदेवची बहीण काशिबाई ही देखील खलप्रवृत्तीची आहे. ती चांगदेवची स्थिती माहीत असूनही त्यांच्यामागे पैशांचा तकादा लावते, मांजर चुलीत पडून मेल्याचे तिला काहीच वाटत नाही व ज्या प्रकारे चांगदेवला अटक झाल्याच्या आठव्या दिवशी चांगदेवची मुलगी सुनीता जळून निधन पावल्याची बातमी येते ते बघितल्यास काशिबाईनेच घातपात करून तिला मारले असावे असा संशय निश्चितच घेता येतो. ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबरीत शंकर सावकार हे खलप्रवृत्तीचे पात्र आहे. त्यांने यशानानाला कर्ज दिले असून पैसे परत कर किंवा तुझी जमीन आपल्या नावावर कर अशी धमकीच तो त्याला देत असताना दिसतो. त्याला कमळाबाईवर पण वाईट डोळा आहे. यशानानाने बायकोसहीत आत्महत्या केल्यानंतर आपल्यावर कोणतेच किटाळ येऊ नये व आपली वसुली ही व्हावी म्हणून, उषा ही सुभाष सोबत पळून जाणार हे समजल्यने त्यांनी आत्महत्या केली आहे असे चित्र रंगविण्याचा तो खूप प्रयत्न करतो परंतु तो आपला हेतू साध्य करू शकत नाही. एकूण या कादंबऱ्यांमधून वा एकूणच ग्रामीण कादंबऱ्यांमधून पारंपरिक स्वरूपाची खलपात्रे क्वचितच दिसतात परंतु नैसर्गिक गोष्टी व शेतकऱ्यांसाठी म्हणून उभारलेल्या व्यवस्था याच शेतकऱ्यांच्या आयुष्यात खलनायकाचे काम मोठ्याप्रमाणांत करतात असे म्हणता येते.

‘चिखलवाटा’ मधील खलपात्रांचा विचार करताना कादंबरीतील नायकाच्या गावातील जमिनीवर डोळा असलेला साळुंखे याचे नाव घेता येते. त्यांने यांचे पाणी बंद केले त्यामागे पाणी न मिळाल्यास त्यांना जमीन विकावी लागेल व ती आपणास मिळेल हाच स्वार्थी हेतू असल्याचा दिसतो. अर्जुना आर्थिक विवंचनेत आहे हे समजते तेव्हा घरी येऊन म्हाताऱ्याला जमीन विकण्याविषयी तो सूचवतो. अर्थात, म्हातारा त्याचा अपमान करून त्याला परत पाठवतो. निटुरे हे मुख्याध्यापक देखील हावरे किंवा भ्रष्ट मनोवृत्तीचे असल्याचे दिसतात ते मधल्यामध्ये चाळीस हजार संचालक मंडळाला अंधारात ठेवून व्यंकट कडून उकळण्याचा प्रयत्न करतात परंतु त्यांच्या दुर्देवाने व्यंकट संस्थेच्या अध्यक्षापर्यंत पोहचतो व त्याचे बिंग फुटते. खरेतर व्यंकट व अर्जुनची बहिण हौसा हिचा नवरा श्रीमंतराव हा देखील अगदी खलप्रवृत्तीचा म्हणता येत नसले तरी अत्यंत स्वार्थी आणि आपलं तेवढं पाहणारा आहे. म्हातारा त्याला दिलेले पैसे मागायला त्याच्याकडे जातो तेव्हां तो पैसे देत नाही. तसेच हुंडा मिळणार नाही म्हणून आपल्या मुलासाठी धोंडाबाईचे स्थळ नाकारतो. नाकारण्याचे कारण मात्र ती

अशिक्षित असल्याचे देतो. त्याची बायको जेव्हा निवडणूकीला उभी राहते व तिच्याविरुद्ध जो उभा राहिलेला असतो तो अर्जुनचा मित्र आहे व अर्जुनने सांगितल्यास तो ऐकेल असे वाटते, तेव्हा पैसे घेऊन तो येतो व निमत्त मात्र मुलीला बघायचे येण्याचे करतो. जेव्हा अर्जुन काही विशेष प्रयत्न करणार नाही हे लक्षात येते तेव्हा मात्र तो अद्वातद्वा बोलायला लागतो. यावरून त्याची एकूण प्रवृत्ती लक्षात येते. इतर अनेक कादंबऱ्यांप्रमाणेच 'एसईझेड' या कादंबरीतही सरकार, मल्टी नॅशनल कंपन्या, विकाऊ राजकारणी, हेच सर्व या कादंबरीतून खलनायक असल्याचे दिसतात. 'बोडखी' कादंबरीतील खलपात्र म्हणून पोलीस पाटील हे पात्र पुढे येते. जेव्हा संधी मिळते तेव्हा तो डोम्याला तुरूंगात पाठवतो. डोम्या त्याच्यावरील आरोप मान्य करून पोलीस पाटलाचे काम अजूनच सोपे करतो. जेव्हा कमलकिशोर कडून खरे काय ते कळते तेव्हा मारवाड्याला हा मुलगा बाहेर काही बोलल्यास तुमची नाचक्की होईल हे पटवून देऊन तो मुलाला रात्रीच्याच ट्रेनने मूळ गावी पाठवायची व्यवस्था करतो. आता प्रकाशने काही बोलू नये म्हणून रात्रीच्या वेळी येऊन तो प्रकाशला भरपूर मार देतो व एवढा दम भरतो की त्याच्या मनावर परिणाम होऊन त्याची बोलतीच बंद होते. हे सर्व व्यवस्थित जमवून आणल्यानंतर तो कापूस चोरीच्या आरोपाखाली प्रकाशला आत टाकायची धमकी देऊन कौसल्येवर शारीरिक अत्याचार करतो. गावचा पोलीस पाटील असूनही गावातील सगळ्याच अनैतिक धंद्यात त्याचा वाटा असतो. कापूस चोरणाऱ्यांकडे त्याचे संगनमत असते, मारवाड्याला दारू पोहचवण्याचे काम तोच करीत असतो. शेवट जुगल किशोर कडून पैसे घेऊन गोदावरी बरोबर त्याला लावून देण्याचा त्याचा विचार असतो परंतु डोमा आल्याने सगळे फसते. पारंपरिक चौकटीतील असे हे खलपात्र आहे. 'गावठाण' कादंबरीतील नारूआबाचे पात्र काहिसे खलस्वरूपाचे आहे. कोंडाबा बरोबर भांडण झाल्यानंतर त्यांच्या गाईवर कुऱ्हाडीचा घाव घातला जातो व तो त्यांनेच घातला असावा असा सर्वांचा संशय असतो. वाटणी नंतर आंदीच्या घरची सगळी आंदी सोबत खलप्रवृत्तीची कशीच वागताना दिसतात. 'जिनगानी' या कादंबरीतील खलपात्रांचा विचार करता. गुणवंत पाटील व त्याच्या घरची ज्या प्रकारे गीताशी वागतात ते लक्षात घेता या कादंबरीतील खलप्रवृत्तीची माणसे म्हणून यांचा उल्लेख करता येतो. गीताच्या आजाने दिलेली पाच एकर जमीन त्यांनी अगोदरच ताब्यात घेतली आहे व राधाबाईच्या तीस एकर जमिनीवर त्यांचा डोळा आहे हे सर्व लक्षात घेता गुणवंत पाटील व त्याची बायको ही निश्चितच खलप्रवृत्ती म्हणून सांगता येतात.

'इदवास', 'वाहतं पाणी', 'भगदाड' आणि 'वनराईचा लढा' या अभ्यासात घेतलेल्या चारही गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधील खल पात्रांचा विचार केला असता. 'भगदाड' चा अपवाद वगळता इतर

कादंबऱ्यात अगदी खलपात्रे म्हणावीत अशी पात्रे दिसत नाहीत. ‘भगदाड’ मध्ये मात्र धर्मा खेमकार हा खलपात्र म्हणून समोर येतो. अर्थात, कादंबरीत त्याचे थेट अस्तित्व कधीच जाणवत नाही. बांध जिलेटीन घालून फोडणे, स्वरूपच्या घरी त्याला धमकावण्यासाठी माणसे पाठवणे, शेतकऱ्यांना फितवणे, मोर्चात आपली माणसे पाठवून दगडफेक करणे, स्वरूपला संपविण्याचा प्रयत्न करणे अशा अनेक गोष्टींमधून त्याची ही खलप्रवृत्ती व त्याचे अस्तित्व दिसून येते. अर्थात शेवट शेतकऱ्यांच्या सगळ्या मागण्या मान्य होतात त्यामुळे ही खलप्रवृत्ती आपोआपच संपते. नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्याचा विचार केला असता पारंपरिक खलप्रवृत्तीची माणसे अगदी क्वचितच येतात. निसर्ग, सरकारचे, आयात-निर्यात धोरण, मुजोर व्यापारी, भ्रष्ट सरकारी नोकर हेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने करे खलनायक आहेत याची जाणीव आपणाला वारंवार होताना दिसते.

**4.3.1.4 दुय्यम स्वरूपाची पात्रे**

‘बारोमास’ या कादंबरीत दुय्यम स्वरूपाची म्हणता येतील अशी बरीच पात्रे आहेत. सुभानराव हा एकनाथचा बाप असला तरी या कादंबरीत तो दुय्यम स्वरूपाचाच आहे. तो वारकरी आहे. शेतीशी इमान राखणारा आहे परंतु त्यांच्याजवळ कोणता ही ठाम निर्णय घेण्याची क्षमता नाही. त्यामुळे कायमच तो पडद्याआड राहताना दिसतो. काहीकडे तो एकदम भोळसट वाटतो तर क्वचित काहीकडे आतल्या खाठीचा असावा असेही वाटते. तो कल्याणीचा मळा महाकाळ कडे गेल्यावर व तो परत मिळण्याची शक्यता नाही हे लक्षात आल्यावर एकदा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो परंतु सर्व जण मिळून त्याला वाचवतात. त्यानंतर एकदा एकनाथकडे बोलताना तो म्हणतो, स्वर्ग आणि नरक या पृथ्वीवरच असतात ज्याच्याकडे पैसा आहे तो स्वर्गात राहतो आणि शेतकऱ्यासारखे कायम कडकी असणारे आयुष्य म्हणजे नरक. एकूणच तो आपल्या जीवनाला विटला आहे हे यातून लक्षात येते. शेवट त्यांने पुन्हा आत्महत्या केली असावी या शंकेनेच ही कादंबरी संपते. तेजराव खापके हे दुय्यम असले तरी या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र आहे. एकूण आजच्या शेतीची अवस्था काय आहे व ती तशी होण्यामागील कारणे काय? या सर्वाची समीक्षा लेखकांने या पात्राच्या माध्यमांतून केली आहे. नानू आजा हा अगदी सुरूवातीलाच येणारे पात्र असले तरी हायब्रीड खाणार नाही म्हणून अन्नत्याग करून त्यांने आपली संपवलेली जीवनयात्रा भावी काळातील शेतीतील अधोगतीच सूचित करते. दिनकर दाभाडे आणि त्याच्या सोबतचे इतर सर्व तरूण सुशिक्षित बेकार ही पात्रे एकूणच कादंबरीचा ताण तोलून धरण्याचे काम अत्यंत योग्यप्रकारे करतात. राजू हा एकनाथचा भाचा अगदी काही काळा पुरता कादंबरीत येतो परंतु तो शिक्षणाबद्दल व आपण का त्या शिक्षणाच्या मागे लागलो नाही याबद्दलचे विचार व्यक्त करतो ते सर्वांनाच अंतर्मुख करणारे

आहेत. मुगुटरावासारखा साधा कामगार पण तो ज्या अरेरावीच्या भाषेत बोलतो ते बघितल्यानंतर कामगार देखील शेतकऱ्याला कसा पिडतात हे आपल्या लक्षात येते. या कादंबरीत दुय्यम स्वरूपाची अनेक पात्रे असली तरी कादंबरीतील त्यांची उपस्थिती नक्कीच लक्षणीय आहे या कादंबरीला आशयदृष्ट्या आणि निर्मितीच्या अंगाने देखील संमृद्ध करण्यात या दुय्यम वाटणाऱ्या पात्रांचा मोठा हातभार असल्याचे दिसते. 'चाळेगत' कादंबरीचा विचार केला असता मंग्या, दिगू, रघू, डी.वाय्. ही दुय्यम दर्जाची पात्रे आहेत असे म्हणता येते. दुय्यम अशा अर्थाने की कादंबरीतील काही भागातच त्यांचे अस्तित्व ठळकपणे जाणवते. इतरही अनेक पात्रे जो लेखकाचा मित्रपरिवार आहे त्यामध्ये आहेत परंतु वर उल्लेख केलेल्या पात्रांचे वाहत जाणे किंवा त्यांचे सापळयात अडकणे या कादंबरीतून चित्रित झाले आहे. दिगू समाजवादी चळवळीतील खंदा कार्यकर्ता पण तो टायगर सेनेकडे जातो कारण समाजवादी नेतृत्वाकडून त्याचा भ्रमनिरास होतो. मंग्या काम नसल्याने अलगत अनैतिक धंद्यात ओढला जातो. या पात्रांसंदर्भात लेखकानेच केलेली एक गटवारी पाहण्यासाठी आहे.

"म्हणजे आता हे सरळ सरळ दोन गट किंवा त्यातही पुन्हा अनेक सूक्ष्म उपगट. मंग्या, दिगू, रघू एका बाजूला. पोटापाण्याच्या मजबूर सबबीखाली विरोधी विचारांच्या पंखांखाली गेलेले. आनंद, किशोर, डीवाय् सारखे तळयात मळयात; पोटातलं काही कळू न देणारे. किंवा कधी इकडे कधी तिकडे असे कुंपणावरचे, धवल, गोविंद, मल्हार, मी, पारस असे घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजू शकणं परवडू शकणारे समाजवादाचे टाळ कुटत, स्वतःचीच पाठ थोपटून घेत आणि एकमेकांना फुशारकीच्या पोकळ टाळ्या देत घेत म्हणत, पाहा! किती आम्ही एकनिष्ठ आमच्या विचारांशी, तत्त्वांशी...!" [38] हे लक्षात घेतल्यास या कादंबरीतील एकूण पात्रांचे स्वरूप कसे आहे हे आपल्या लक्षात येते. त्यामुळे एकूणच या कादंबरीत ही पात्रे तेवढी महत्त्वाची नसली तरी या पात्रांच्या माध्यमातून ही आधुनिक व्यवस्था किती भयानक आहे आणि सामान्य माणूस त्यात सहजतेने कसा भरडला जातो हे आपल्या लक्षात येते. 'तणकट' कादंबरीत दुय्यम म्हणता येतील अशी अनेक पात्रे आहेत परंतु कादंबरीच्या जडणघडणीत त्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचे दिसते. 'तणकट' कादंबरी, गावाच्या विस्तृत अवकाशात घडत असल्याने तिच्यात छोटीमोठी अनेक पात्रे आली आहेत. कादंबरीतील सर्वच पात्रे महत्त्वाची आहेत परंतु आपणाला त्यातील काही दुय्यम पण कादंबरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या पात्रांचा आढावा घ्यायचा आहे. थळूआजा, गवत्या, बंडू चेअरमन, सत्यपाल धर्मरक्षी, मोहन बल्लाळ, ही काही पात्रे या कादंबरीत दुय्यम असली तरी महत्त्वाची आहेत. थळूआजा हा गावच्या चालत आलेल्या परंपरांचा पाईक म्हणून आपल्यासमोर येतो. गावासोबत भांडण करून चालणार नाही याची समज त्याला आहे म्हणूनच त्याचे आणि

कबीरचे विचार पटतात. काळाच्या ओघात गाव कसा बदललाय याचा वेध त्याच्या बोलण्यातून येतो. पात्रांच्या माध्यमातून काळानुसार होणारे बदल सूचित करण्याच्या संदर्भात हे पात्र महत्त्वाचे आहे. गवत्या पंढऱ्या ही तारूण्याचा उत्साह असलेली अर्ध्या हळकुंडाने पिवळी होणारी पात्रे आहेत. शाळा मास्तराला जाऊन धमक्या देणे, शेडबाळेच्या सांगण्यावरून गावाकडे वाईटपण घेणे, गावावर बहिष्कार घालणे, जे आपले ऐकत नाहीत त्यांना धमक्या देणे अशी सर्व कामे ते करतात. आजच्या अर्धशिक्षित तरुणांचे हे प्रतिनिधी आहेत. कबीर शिकतो त्यामुळे त्याच्याबद्दलची एक असूया त्यांच्या मनात असावी अशी शंका देखील येते. अशा तरूणांना कसे वापरून घेतले जाते आणि मग त्यांची कशी अवस्था होते हे देखील ही कादंबरी अधोरेखित करते. हे सर्व पाहिल्यानंतर योग्यवेळीच सुधारणे किती आवश्यक असते हे लक्षात येते. बंडू चेअरमन असेल, सरपंच गणपतराव पाटील असेल किंवा गजा मुळीक असेल हे सगळे जात वर्चस्व मानणाऱ्या समुहाचे प्रतिनिधी आहेत. अर्थात त्यांचा म्हारांवरील राग शेडबाळेने सांगितलेले ते ऐकतात व त्याच्या सांगण्याने वागतात म्हणून आहे. शेडबाळेच्या या कृत्यामुळे गावातील दुही वाढत जाते. एका विशिष्ट मनोवृत्तीची प्रतिनिधी म्हणून देखील ही पात्रे महत्त्वाची आहेत. सत्यपाल धर्मरक्षी, जालिंदर बनसोडे, आनंदा कांबळे, अलताफ कांबळे ही सर्व पात्रे सुद्धा एका विशिष्ट मनोवृत्तीची प्रतीक आहेत. ते स्वतःला दलितांचे नेते समजतात परंतु दलित समाजापेक्षा स्वतःचा स्वार्थ साधण्यावर त्यांचा जास्त भर असतो. स्वतःच्या समाजातील लोकांनाच ते लुबाडताना दिसतात. असल्या नेत्यांमुळे दलित समाजाचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे हे दाखवून देण्यासाठीच या पात्रांचे बारीकसारीक तपशीलासह लेखकांने वर्णन केल्याचे दिसते. मोहन बल्लाळ हे या कादंबरीतील एक महत्त्वाचे पात्र म्हणून आपल्या समोर येते. तो उच्च वर्गातील असला तरी कबीरशी त्याची निखळ मैत्री आहे. प्रसंगानुरूप दलित नेते किंवा दलित मानसिकता याचे तो जे वर्णन करतो ते आपणा सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे. या कादंबरीत इतरही अनेक पात्रे असली तरी सर्वांचा विचार करणे शक्य नाही. एकूणच समाजातील वेगवेगळया प्रवृत्तींचे दर्शन ठळकपणे आपल्या कादंबरीतून घडेल अशाप्रकारची पात्ररचना लेखकांने या कादंबरीतू केली आहे.

'ऐसे कुणबी भूपाळ' या कादंबरीतील निर्मला, पुष्पा, गंगू, सुनंदा, कुसुम, बाळाजी, नामदेव, किसन, चंद्री, आशी ही या कादंबरीतील दुय्यम परंतु एकूण कादंबरीच्या रचनेत महत्त्वाची अशी पात्रे आहेत. नवरा बाहेरख्याली असल्याचे दुःख काय असते ते निर्मला व पुष्पा या पात्रांच्या माध्यमांतून लक्षात येते. तसेच एकत्र कुटुंबपद्धतीत स्त्री अत्यंत दुर्लक्षित असते हे देखील या पात्रांच्या माध्यमांतून आपल्या लक्षात येते. साध्या साध्या गोष्टी देखील

यांच्यासाठी इर्षेचे कारण कसे ठरतात याचे दाखले देखील या कादंबरीतून मिळतात. नव्याने कारभारी झालेल्या आपल्या नवऱ्याला बघण्याची इच्छा पुष्पाच्या मनांत आहे म्हणून टाचा वर करून ती खाली बघण्याचा प्रयत्न करते. तिच्या या कृतीचा निर्मलाला प्रचंड राग येतो कदाचित आपल्या नवऱ्याची मुखत्यारी जाऊन ती आता हिच्या नवऱ्याकडे गेली आहे त्यामुळे मनांत द्वेशाची भावना असणेही शक्य आहे म्हणूनच, 'तू ज्याला दररोज उरावर घेतेस तोच तो आहे' अशा आशयाचे वाक्य निर्मला पुष्पाला उद्देशून म्हणताना दिसते. सुनंदा व गंगू ही देखील या कादंबरीतील दुय्यम असली तरी महत्त्वाची पात्रे आहेत. गंगू फटकळ आहे परंतु तिच्या मनांत ओलावा असल्याचा दिसतो. तिला मूल नसल्यांने व त्यामुळे घरच्याच लोकांकडून तिचा जो अपमान होतो त्यामुळे ती जास्त चिडचिडी झालेली दिसते. तिला घरातील मुलांची मारेकरी ठरवली जाते अशावेळी तिला किती दुःख वाटले असेल याची कल्पना आपण करू शकतो. सुनंदा ही आपला नवरा अत्यंत अजागळ असल्यांने दुःखी आहे. आपल्या नवऱ्यांने टाळकुटेपणा सोडून श्रीपतीसारखी कर्तबगारी दाखवावी असे तिला वाटते. आत्मसन्मान नसलेल्या तिच्या नवऱ्याकडून तिच्या पदरी कायम निराशाच पडते. कुसुम ही काहिशी आधुनिक वळणाची स्त्री आहे. पारंपरिक कृषीसंस्कृतीत तिला आपल्या मनाप्रमाणे वागता येणे शक्य नाही व म्हणूनच किसनच्या मागे ती वाटणीचा भुंगा लावताना दिसते. बाळासाहेब आणि नामदेव हे वारकरी परंतु सर्व जबाबदाऱ्या टाळणाऱ्या पळपुट्या मनोवृत्तीचे प्रतीक म्हणून या कादंबरीतून येताना दिसतात. या मनोवृत्तीने आजपर्यंत कुणब्यांचे खूप नुकसान केले आहे हे लेखकला या पात्रांच्या माध्यमांतून अधोरेखित करायचे आहे. किसन हे पात्र आधुनिक वारा लागलेले व म्हणून कष्ट चुकवून सोप्या मार्गाने पैसा कसा मिळेल या मनोवृत्तीच्या माणसांचे प्रतिनिधित्व या कादंबरीत करताना दिसतो. एकूणच ही दुय्यम असली तरी या कादंबरीच्या बांधणीत महत्त्वाची असलेली अशी पात्रे आहेत. दुय्यम स्वरूपाची अनेक पात्रे 'असं जगणं तोलाचं' या कादंबरीत आली असली तरी यातील हारबा हे पात्र लक्षात घेण्यासारखे आहे. पळपुट्या मनोवृत्तीचा आणि जबाबदारी टाळणारा असा हा हारबा आहे. तो वारकरी आहे परंतु कोणतीच जबाबदारी तो घेत नाही. विष्णू सावकाराचे घेतलेले कर्ज फेडण्यासाठी तो काही विशेष परिश्रम घेतो असे दिसत नाही व फक्त चालढकल करीत राहताना दिसतो. शेवट विष्णू सावकार चावडीवर नेऊन त्याचा अपमान करतो तेव्हा आपल्या मुलाला सावकाराकडे सालाला लावून तो सावकाराचे पैसे फेडतो. हाणमूच्या आत्महत्येचे प्रकारण मिटवण्यासाठी गोठ्यातील बैल व बैलगाडी विकतो व शेवट आता शेती कशी कसायची? हा प्रश्न निर्माण होतो तेव्हा गाव सोडून निघून जातो. आपण असा निघून गेल्यास माझी बायका मुले

कशी जगतील? याचा जराही विचार करीत नाही. एकूणच कोणतीही जबाबदारी न घेणारा आणि पळपुट्या मनोवृत्तीचा म्हणून तो या कादंबरीतून चित्रित झाला आहे.

‘‘साखरफेरा’, ‘पाडा’, ‘कापूसकाळ’, ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’, ‘फाटलेलं आभाळ’ या पाच कादंबऱ्यांतील दुय्यम स्वरूपाच्या पात्रांचा विचार केला असता ‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबरीतील उषाचा प्रियकर सुभाष त्याचा मित्र दिलप्या, उषाच्या बहिणी आशा आणि नकोशी, अशा काही पात्रांचा उल्लेख करता येतो. सुभाष हा अत्यंत प्रामाणिक असून तो उषावर जीवापाड प्रेम करताना दिसतो. उषासाठी कोणताही त्याग करायची देखील त्याची तयारी आहे. उषांने त्याला नाही म्हटल्यानंतर देखील अजिबात विचलीत न होता मी शेवटपर्यंत तुझी वाट पाहत राहीन हे तो तिला सांगताना दिसतो. दिलप्या हे या कादंबरीतील दुय्यम स्वरूपाचे पण महत्त्वाचे पात्र आहे. तो चांगला शिकलेला आहे परंतु एका पायाने अधू असल्याने सर्व जण त्याची उपेक्षा करताना दिसतात. तसे त्याच्या बापाने मुलीची फसवणूक करून एका मुली सोबत त्याचे लग्न लावले होते परंतु ती बायको लग्नानंतर काही दिवसातच आत्महत्या करते व ज्या त्याच्या भावाला दिलप्या म्हणून दाखवलेला असतो तो कायमचे घर सोडून जातो. आई-वडिलांच्या निधनानंतर तो एकटाच उरतो. तो सुभाषला उषाला पळवून नेण्याच्या कामात त्याला सर्व ती मदत करतो परंतु जेव्हा त्यांचे लग्न शक्य नाही असे लक्षात येते तेव्हा उषासोबत लग्न करण्याचा आपला प्रस्ताव तो विलासला देतो. याचा अर्थ मनात कुठेतरी त्याला उषेची अभिलाशा होती हे लक्षात येते. उषाच्या दोन्ही बहिणी आशा व नकोशी या देखील महत्त्वाच्या आहेत. आशा ही फक्त एकटीच यशानानाची आवडती असते. यातील नकोशी ही महत्त्वाची आहे. तिच्या वर्णनांवरून तिला पुढे घडणाऱ्या घटनांची अगोदरच चाहूल लागते असे अपणाला दिसून येते. आपल्या आई बाबांचा मृत्यू किंवा उषा पळून जाऊ शकणार नाही याचे भाकित तिने अगोदरच केल्याचे दिसते. यशा नानाने खरेतर तिला मारण्याचा प्रयत्न ही अगोदर केला होता व त्यांनी आत्महत्या केली त्या दिवशी आशा शेतात जायला निघते तेव्हा ‘नाहीतर नकोशीला घरीच थांबू दे’ असे तो म्हणतो, यावरून आपल्यासोबत तिला ही संपवून टाकायचा त्याचा विचार असावा असे दिसते. म्हणूनच हे पात्र तिच्या नावावरून व वैशिष्ट्यपूर्ण अशा काही तिच्या बद्दलच्या गोष्टींमुळे कायम लक्षात राहते. ‘कापूसकाळ’ या कादंबरीत सुनील (सुन्या), बाबू कातखड्या, संज्या, ही पात्रे प्रातिनिधिक म्हणून येतात सुन्या व संज्या कापूस विकत घेण्याचा धंदा करतात व कापसावर पाणी मारणे, मीठ मारणे असल्या सर्व गोष्टी करतात. बाबू कातखड्या हे गावातील राजकारणी लोकांचे प्रातिनिधिक पात्र आहे. ज्याला राजकारणांत फार काही साधत नाही परंतु राजकारणाची खाज त्याला स्वस्थ बसू

देत नाही. कापसाच्या भोतावर बसलेला म्हातारा ज्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होते त्यांचा प्रतिनिधी म्हणून या कादंबरीत येताना दिसतो. तो येऊन महिना झाला तरी अजून त्याच्या कापसाचे वजन झालेले नाही. रख्मा हे गावातील एक विधवा स्त्री चे पात्र आहे. आपली शेती कसण्यासाठी गावातील या विधवा स्त्रीला काय काय करावे लागते याचे दर्शन या पात्राच्या माध्यमातून होते. गावातील सामान्य विधवा स्त्रीचे दुःख आपणाला यातून कळून येते. ही सर्व पात्रे दुय्यम असली तरी, एकूण कादंबरीच्या उभारणीत महत्त्वाची आहेत. 'फाटलेलं आभाळ' मध्ये अनेक पात्रे असली तरी महत्त्वाची म्हणावीत अशी दुय्यम पात्रे यात नाहीत. 'साखरफेरा' मध्ये, तुका मेंबर, जयसिंग अण्णा, किशाचे शामा, नामा, हे मित्र ही सगळी दुय्यम पात्रे म्हणून सांगता येतील. जयसिग अण्णा हे राजकीय आकांक्षा असणारे व्यक्तिमत्त्व आहे. पाणी सोसायटी त्यांच्या ताब्यात असली तरी त्यांचे समाधान नाही. त्यांना साखरकारखान्याचे संचालक व्हायचे आहे व त्यासाठी ते प्रयत्नरत असल्याचे दिसतात. तुका मेंबर हे अत्यंत जाणते असे व्यक्तिमत्त्व. गांधीवादी विचार बराच समजून उमजून त्याप्रमाणे कार्य करणारे पात्र म्हणून या पात्राकडे पाहता आहे. त्यांच्या हुशारीमुळे चार लोक त्यांना मान देतात. आजच्या राजकीय सामाजिक परिस्थिती बद्दलचे त्यांचे भाष्य सर्वांनाच विचार करायला लावणारे आहे. 'पाडा' मध्ये मुद्दामहून नाव घ्यावे असे कोणतेही पात्र दिसून येत नाही. 'चिखलवाटा' मधील दुय्यम पात्रांचा विचार करताना, म्हातारा बाप, विकास, भिमण्णा या पात्रांचा विचार करावा लागतो. म्हातारा वारकरी आहे परंतु त्या अगोदर तो हाडाचा शेतकरी आहे म्हणूनच बोअर मारणाऱ्याला मटण द्यावं लागेल हे समजतं तेव्हा वारकरी असूनही तो त्या गोष्टीसाठी तयार होतो. बोअरला पाणी लागत नाही हे कळतं तेव्हा त्याला अतिव दुःख होते कारण तो हाडाचा शेतकरी आहे. तो व्यंकटला तोंडावर बोलतो तरी पोटात त्याच्याबद्दल त्याला माया आहे म्हणूनच कणसे घेऊन तो धाप लागत असतानाही बसस्टॅंड पर्यंत जातो. जमीन विकायला प्रचंड विरोध करणारा हा म्हातारा धोंडूच्या लग्नासाठी काही जमीन विकायचा निर्णय घेतो यातून आपल्या लेकराबाळांबद्दल त्याला किती प्रेम आणि माया आहे हे लक्षात येते. त्याला औषधांसाठी दिलेल्या पैशातून तो अजय-विजयला कापडे आणतो एकूण बाप वा आजा हा फणसासारखा असतो बाहेरून काटेरी आतून रसाळ याचा प्रत्यय या पात्राच्या माध्यमांतून येतो. विकास हा देखील या कादंबरीतील दुय्यम तरी महत्त्वाचे पात्र आहे. त्याची शिक्षणाकडे काहिशी टंगळमंगळ होताना दिसते परंतु काकांकडे शिकायला गेल्यावर तो मन लावून अभ्यास करताना दिसतो. तसेच आपली घरची परिस्थिती लक्षात घेऊन घरची परवानगी देतील की नाही याचा विचार न करता तो सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेतो व त्यासाठीची परीक्षा देण्यासाठी जातो. परिस्थितीची समज असलेला मुलगा म्हणून तो आपल्यासमोर उभा राहतो.

भिमण्णा हे बरेच गौण पात्र असले तरी तो ज्या प्रकारे व्यंकटला गावच्या परिस्थितीची व त्याच्या कर्तव्याची त्याला जाणीव करून देतो त्यामुळे तो या कादंबरीतील लक्षात राहण्यासारखे पात्र होतो. 'एसईझेड' कादंबरीतल दुय्यम पात्रे म्हणत असताना गुरुजींचे पात्र महत्त्वाचे आहे. गुरूजी शिक्षक असले तरी चळवळीत देखील आपल्या नोकरीची पर्वा न करता ते स्वतःला झोकून देताना दिसतात. चंदूला देखील पोल्ट्रीच्या उभारणीत ते खूप मदत करतात. गुरूजी प्रमाणेच चंदूचा बाप देखील या कादंबरीतील एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. तो प्रत्येक निर्णयात चंदूचा विचार घेऊन निर्णय घेतो व चंदूच्या प्रत्येक कामात खूप मदत करतो. एरवी बाप आणि मुलगा म्हटले की अनेककडे संघर्ष पहायला मिळतो या कादंबरीत मात्र बाप आणि मुलगा यांच्यामध्ये एक उत्तम समन्वय असल्याचे दिसते. कॅप्टन ही या कादंबरीतील आणखी एक नोंद घेण्यासारखी व्यक्ती आहे. ही वयोवृद्ध व्यक्ती आहे त्याला सरकारकडूनच जागा मिळाली आहे परंतु आता ती जागा एसईझेड मध्ये चालली आहे. या मातीवर प्रेम करणारा असा हा असल्याने म्हातारपणांतही तो पूर्ण ताकदीने या आंदोलनात उतरताना दिसतो. तसेच त्याचे मार्गदर्शन सर्वांसाठी महत्त्वाचे ठरते. समितीच्या लोकांमध्ये काही भांडण तंटा झाल्यास त्यांना शांत करण्याचे काम हा कॅप्टन करतो. कादंबरीतील ही पात्रे काहीशी गौण असली तरी कादंबरीच्या उभारणीत महत्त्वाचे योगदान देतात.

'बोडखी' मधील दुय्यम पात्रांचा विचार करताना प्रकाश आणि कमलकिशोर या दोन पात्रांचा विचार करावा लागतो. प्रकाश हा डोमाचा मुलगा आहे व त्याला शिक्षणाची आवड आहे. शिक्षणातील त्याची गती वाखाण्याजोगी आहे. कमलकिशोर सोबत त्याची दोस्ती आहे आणि त्यांने सांगितलेले कोणतेच काम तो नाही म्हणत नाही, म्हणूनच त्यांने दिलेले सोने तो आपल्या घरात आणून ठेवतो. कमलकिशोर बरोबर काळे मांजर शोधण्यासाठी सर्वत्र फिरतो. अभ्यास तर तो त्याच्या सोबतच करतो. घरात देखील तो एखाद्या आज्ञाधारक मुलासारखा वागताना दिसतो. तो आपल्या आईची काळजी घेतो तसेच बहिणीला देखील प्रेमाने वागवताना दिसतो. तो मनाने जरा भित्रा आहे आणि वयानेही लहान आहे म्हणून पोलीच पाटलाचे सर्व अत्याचार तो सहन करताना दिसतो. कमलकिशोर हा देखील चांगल्या स्वभावाचा आहे. तो प्रकाश सोबत प्रामाणिकपणे दोस्ती करताना दिसतो. आपण सोने चोरले त्याचे एवढे गंभीर परिणाम होतील याची त्याला अजिबात कल्पना नसते. तो सर्वांना सत्य सांगण्याचा प्रयत्न करतो परंतु त्याचा आवाज दाबला जातो व त्याला दूरवर पाठवले जाते. एकूणच दुय्यम स्वरूपाची तरी महत्त्वाची अशी ही दोन पात्रे आहेत. 'गावठाण' मधील दुय्यम स्वरूपाच्या पात्रामध्ये आंदीच्या नवऱ्याचा मित्र 'रामा' याचा उल्लेख केला पाहिजे तो आनंदी व तिच्या नवऱ्याला सर्व

प्रकारची मदत करताना दिसतो. नवऱ्याच्या मृत्यूनंतरही तो आंदीला मदत करतो एक चांगला मित्र कसा असावा त्याचे उदाहरण म्हणून आपणाला त्याच्याकडे पाहता येते. ‘जिनगानी’ मधील दुय्यम पात्रांचा विचार करताना राधाबाईचा सासरा प्रभू पाटील, नवरा श्रीपती व भाऊ विजय यांचा उल्लेख करावा लागतो. प्रभू पाटील हे अत्यंत चांगल्या मनाचे गृहस्थ आहेत व ते आपल्या सुनेकडे अत्यंत प्रेमाने वागताना दिसतात. श्रीपती हा राधाबाईचा नवरा देखील खूप प्रेमळ आहे. राधाबाईची तो खूप काळजी घेतो व तिच्या भावनांचा विचार करून वागतो. अज्ञानामुळे त्याचे प्रकृतीकडे दुर्लक्ष होते व त्याचा मृत्यू होतो. विजय हा शिक्षण घेत असल्याने आधुनिक विचारांचा आहे. तो कुत्रा चावल्याने संजूला इंजेक्शन घेतले पाहिजे किंवा श्रीपतीनी डॉक्टरला दाखवले पाहिजे हे सांगतो पण प्रत्यक्षात येऊन काही कृती मात्र करीत नाही. त्यांने योग्यवेळी कृती केली असती तर दोन जीव निश्चित वाचले असते. शिक्षण घेऊनही त्याला कुठेही चांगली नोकरी मिळत नाही म्हणून तो शेवट कंडक्टरची परीक्षा देताना दिसतो. विजयच्या व्यक्तिरेखेतून आजच्या बेकारीचा प्रश्नाला लेखिकेने वाचा फोडल्याचे दिसते.

‘इदवास’, ‘वाहतं पाणी’, ‘भगदाड’ आणि ‘वनराईचा लढा’ या अभ्यासात घेतलेल्या चारही गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधील दुय्यम पात्रांचा विचार केला असता, या चारही कादंबऱ्यांमधून अनेक दुय्यम स्वरूपाची पात्रे असल्याची दिसतात. ‘भगदाड’ मधून प्रकाश हे पात्र बांध कसे फोडले जातात हे स्वरूप व मंगेशला सांगतो व जाहीर सभेतूनही त्याबद्दल बोलतो. हे पात्र दुय्यम असले तरी महत्त्वाचे आहे. ‘वनराईचा लढा’ या कादंबरीतील ‘लहानू’ हे अगदी छोटे तरी खूप महत्त्वाचे पात्र आहे. कादंबरीच्या सुरूवातीला तो अत्यंत लाचार दिसतो. जगण्यासाठी पैसा लागतो आणि तो मिळवण्याचे कोणतेच साधन त्याच्यापाशी नसते. ‘हांडिया’ पिऊन दिवस काढण्याची वेळ त्याच्यावर येत असे. ज्या वेळी कारखान्याचे काम सुरू झाले तेव्हा त्याला एवढा चांगला पैसा मिळू लागला की शंकर मोलूच्या घरी जायची ही त्याला आवश्यकता वाटेनाशी झाली. म्हणूनच जेव्हा शेवट कारखना बंद करण्यासाठी आंदोलन सुरू होते व हा प्रकल्प रद्द झाल्याची सरकार घोषणा करते तेव्हा लोक आनंद कसला साजरा करीत आहेत? हे त्याला समजत नाही. त्याच्या मनातील विचार व्यक्त करताना कादंबरीचा निवेदक म्हणतो, “हातात पडणारी रोख मजुरी, महिनाभर असलेलं काम हे सगळे आता फक्त त्याच्या आठवणीत शिल्लक राहिलं होतं. आता ते सुगीचे दिवस परत दिसणार नव्हते. याचा आनंद हे लोक कसा काय साजरा करत आहेत हे त्याला समजत नव्हतं.” [39] एकूणच कादंबरीत जो विषय मांडला आहे त्याच्या आकलनाच्या संदर्भात हे पात्र महत्त्वाचे असल्याचे दिसते. ‘इदवास’ मध्ये मुद्दामहून लक्षात घ्यावे असे दुय्यम पात्र असल्याचे दिसत नाही. तरी जंगलतोडीची कीड गावात घेऊन येणारा सीताराम वा पहिल्यांदा गावात

आलेला ठेकेदार गणपत शेडगे यांचे नाव घेता येते. सीताराम आपल्या स्वार्थासाठी गावाची वाट लावतो तर गणपत शेडगेच्या माध्यमातून भांडवलशाही प्रवृत्तीचे दर्शन आपणाला होते. या कादंबरीतील यमुनेचे पात्र देखील लक्षात घ्यावे असे आहे. पैसा व शरीरसुख याला चटावलेली ही बाई आपल्या नवऱ्याच्या नजरेआड रफिकशी अनैतिक संबंध ठेवते व त्याच्यापासून तिला एक मुलगा देखील होतो. पैशासोबत अनैतिकता कशी वाढू लागते याचे उत्तम उदाहरण म्हणजे हे यमुनेचे पात्र आहे. एकूणच कादंबरीच्या भाषिक अभ्यासात पात्र हा घटक अत्यंत महत्त्वाचा असल्याचे लक्षात येते. अभ्यासासाठी ज्या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्या निवडल्या आहेत त्या सर्व कादंबऱ्यांतील पात्रांचा विचार करता. या कादंबरीतील पात्रे ग्रामीण पार्श्वभूमीवर आकाराला आल्याची दिसतात. या पात्रांची जडणघडण पारंपरिक स्वरूपाचीच असून त्यांच्या जडणघडणीत विशेष स्वरूपाची कोणतीही प्रयोगात्मकता लेखकांनी केल्याचे दिसत नाही. परंतु बहुतांश पात्रे कादंबरीचा आशय समर्थपणे व्यक्त करताना दिसतात.

### 4.3.2 परिसर किंवा अवकाश

कादंबरीतील वर्णनात्मकता यामध्ये सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या पात्र या घटकाचा परिचय करून घेतल्यानंतर आता आपणाला 'परिसर' किंवा 'अवकाश' या घटकाबद्दल थोडक्यात जाणून घ्यायचे आहे. परिसर किंवा अवकाश हा घटक देखील कथानकाशी जोडलेला असाच असतो. कथानकाच्या उभारणीसाठी जशी पात्रांची आवश्यकता असते तसेच कथानक विशिष्ट अशा परिसराची किंवा अवकाशाची देखील आवश्यकता असते. कादंबरीतील घटना काल आणि अवकाशाच्या परिघातच घडत असतात. काळ आणि अवकाश यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संयोजनातून कलाकृती आकाराला येते असे म्हणता येते. ग्रामीण कादंबरी ही संज्ञाच एका विशिष्ट परिसराचा किंवा व्यापक अशा अवकाशाचा निर्देश करणारी आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्या या ग्रामीण पार्श्वभूमीवर घडत असल्याने यातील परिसर वा अवकाश हा ग्रामीण आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. असे असले तरी, लेखक आपल्या जीवनदृष्टीनुसार आशायाच्या प्रकटीकरणासाठी या ग्रामीण अवकाशाचा किंवा यातील छोट्या-छोट्या इतर अवकाशांचा वापर करून घेत असतो. म्हणजे, कादंबरीतील अवकाश लेखकाच्या जीवनजाणिवा व जीवनदृष्टी याच्याशी जोडलेला असतो त्यामुळे एकाच अवकाशात निर्माण झालेल्या कलाकृती परस्पर भिन्न गुणधर्मांनी युक्त असू शकतात हे लक्षात घेतले पाहिजे. 'अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर ग्रामीण कादंबऱ्यांचा अवकाश' अशा व्यापक परिप्रेक्ष्यात विचार केल्यास या अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांची जडणघडण ग्रामीण किंवा कृषिसंस्कृतीच्या

व्यापक अवकाशात होते असे म्हणता येते. ग्रामीण परिसर त्याच्या अनेक छोट्यामोठ्या अवकासांसह या कादंबऱ्यांतून व्यक्त झाला आहे. बदलत्या काळाचे चित्र देखील कादंबरीच्या अवकाशातून दृगोच्चर होत असते. कादंबरीतील अवकाश हा फक्त भौगोलिक वर्णनातून व्यक्त होत असतो असे नाही तर पात्रांच्या कृती-उक्ती, त्यांचे वर्तन व त्यांची मानसिकता याच्या दर्शनातून तो अधिक प्रभावीपणे व्यक्त होत असतो. अवकाशाच्या प्रकटीकरणांत सामाजिक मानसिकताही प्रभावी असते विशेषतः ग्रामीण जीवन हे सामुदायिक जीनवजाणिवांनी प्रेरीत असल्याने ग्रामीण कादंबरीच्या अवकाशात समाजाची विशिष्ट मानसिकता अत्यंत प्रभावी असते असे दिसून येते. कथानक, पात्रे आणि त्याच्या जडणघडणीसाठी वापरलेला अवकाश यांचा योग्य समन्वय जुळून आल्यास अजरामर कराकृती निर्माण होते असे म्हणता येते. कादंबरीतील 'काळ' याचे विवेचन अगोदरच्या प्रकरणात विस्ताराने केले असून त्यात या अवकाशाचा संदर्भ आलाच आहे. आता, काही मोजके अवकाश निवडून आपणाला याचे अधिक स्पष्टीकारण करायचे आहे.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्या या ग्रामीण असल्याने ग्रामीण या व्यापक परिसरात वा अवकाशात या कादंबऱ्या आकाराला येताना दिसतात परंतु त्यात कृषी जीवनाशी संबंधित छोटे छोटे अवकाश असल्याचे ही दिसते. किंबहुना हे छोटे छोटे अनेक अवकाश बनूनच ग्रामीणतेचा एक मोठा अवकाश तयार होतो असे म्हणता येते. या अवकाशातून त्या त्या वेळची परिस्थिती, त्या वेळी वापरली जाणारी भाषा, या सर्वांचा एक वेगळा परिचय तो अवकाश आपणाला करून देत असतो.

**4.3.2.1 ग्रामीण भागातील कुटुंबाचा अवकाश:**

अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून हा कुटुंबाचा अवकाश आपणाला दिसून येतो.

'ऐसे कुणबी भुपाळ' मधून व्यक्त झालेला कुटुंबाचा अवकाश पहाण्यासारखा आहे. काशीनाथ आणि विश्वनाथ हे परस्परांशी थेट न बोलता दोघेही एकामेकांबद्दल द्वारकाबाईशी बोलताना दिसतात. एरवी कायम या दोहोंच्या तोंडात कायम शिव्या असलेल्या दिसतात परंतु आईशी बोलताना मात्र शिव्यांचा वापर होताना दिसत नाही परंतु दोघांच्याही संवादात एकमेकांविरूद्धच्या तक्रारीचा सूर मात्र कायम व्यक्त होताना दिसतो. या अवकाशासंदर्भात लक्षात घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे आई असून देखील आपल्या मुलांना ती त्यांच्या अनैतिक संबंधांबद्दल थेट विचारताना दिसत नाही फक्त आडवळणांने काहीतरी सुचवताना दिसते. ग्रमीण परिसरातील पुरूषसत्ताक वर्चस्व यातून नेमकेपणाने दिसून येते. आपल्या मुलांच्या अनैतिक संबंधानाही ती खपवून घेते यामागे देखील पुरूषांनी कसेही वागले तरी चालते ही ग्रामीण मानसिकताच असल्याचे दिसते. घर वाचावं म्हणून मुलांचे अपराध

देखील ती पोटात घालताना दिसते. या सर्वातून काही झाले तरी घर टिकले पाहिजे कारण एकत्र कुटुंब हा गावातील प्रतिष्ठेचा आणि सन्मानाचा विषय असतो. ‘ऐसे कुणबी भूपाळ’ मधील या कौटुंबिक अवकाशातून ग्रामीण मानसिकता देखील व्यक्त होताना दिसते. द्वारकाबाई व तिच्या दोन सुना वा सुनंदाच्या घरच्या स्त्रिया यांच्या संवादातूनही घरचा अवकाश व्यक्त होताना दिसतो परंतु त्याचे स्वरूप वेगळे असलेले दिसते. एकीकडे घरातील खेळीमेळीच्या वातावरणाचे दर्शन होते तर दुसरीकडे वितंडवादाचे दर्शन होते. अवकाश एकच असला तरी व्यक्ती व परिस्थिती या नुसार त्याचे स्वरूप कसे बदलते याचे हे उत्तम उदाहरण आहे. द्वारकाबाईच्या घरात खेळीमेळीच्या वातावरणातून वितंडवादापर्यंतच्या घरच्या बदललेल्या अवकाशाचे जे रूप महायला मिळते त्यातून काळ आणि अवकाश याचे नाते देखील स्पष्ट होते. ‘कापूसकाळ’ मधील आनंदी कुटुंबाचा अवकाश देखील पाहण्यासारखा आहे. आपली सासू सर्वत्र फिरत न राहता घरीच राहावी असे सुनेला वाटते आणि त्या दृष्टीने त्या दोहोंचे चाललेले बोलणे पाहण्यासारखे आहे.

“आत्याबाई आता नका जाऊ बया तुम्ही देवदेव करायला. इथंच राहा. तुम्ही आसल्या म्हंजी घर कसं भरलं पुरलं दिसतं नही का?' सुशाबाई झोपता येळाला म्हणलीच.

'आगं तुमचं मस खरं हे, पण आता देवदेव करायचं वय नहीत काय मंग उगच मरमर करायचं वय हे व्हय? ऑ? आग नीट नही धोराण धरलंत मंग म्हातारपण आण कुतारपण सारखंच आस्तय.' म्हातारी.

'पण नका जाऊ बया. राव्हात इथंच. कव्हा मव्हा कुठं जात येत जावात. तेवढाच जीवालाबी इरंगुळा नही का?' सुशाबाई. 'आता सगळे मला हेच सांगतेत. मला जसंकाय काही कळतच नाही. मी

काय बोळ्यानी दूध पेते व्हय? तुमच्यापेक्षा म्या चारसहा उन्हाळे-हिवाळे जास्तीचे पाहयले आसतेन का नसतेन?' म्हातारी

'तसे नव्हं सासूबाई, आमचाबी जीव लागतू तुम्ही नसल्या म्हंजी. म्हणून [40] हा ग्रामीण भागातील कुटुंबातील अवकाश पाहण्यासारखा आहे या ठिकाणी नात्यातील प्रेम जिव्हाळा आपलेपणा आपणाला दिसून येतो. परंतु हाच कौटुंबिक अवकश जमीन व घराच्या वाटण्या होत असताना पूर्णपणे बदललेला दिसतो. त्यामुळे वेळ, काळ व परिस्थिती या सर्वांचा अवकाशावर होणारा परिणाम पाहण्यासारखा आहे.

**4.3.2.2 शेतीचा (रानाचा) अवकाश:**

शेतीचा किंवा रानाचा अवकाश हा पूर्णपणे वेगळा असल्याचे दिसते. उदाहरण म्हणून घ्यायचे झाल्यास ‘साखरफेरा’ उसाची लागवड करतानाचा अवकाश पाहण्यासारखा आहे.

उसाची लागवड करताना प्रथम नारळ फोडून सर्व जण लागवड करायला सुरूवात करतात या अवकाशातून ग्रामसंस्कृतीतल निसर्गसन्मुखता दिसून येते. वा ग्राम संस्कृतीतील ईश्वर वा अतेंद्रीय शक्तीला शरण जाणारे मानस देखील दिसून येते. लागवड करताना म्हटली जाणारी गीते यातून पारंपरिक कृषी संस्कृतीचे दर्शन आपणाला घडते. लागवड करताना केल्या जाणाऱ्या चावट चर्चा यातून पुरूष मानसिकतेचे ही दर्शन घडते. प्रत्यक्ष ऊस लागवडीचे जे वर्णन केले आहे त्यातून प्रत्यक्ष शेतीच्या लागवडीचे दृश्य देखील डोळ्यासमोर उभे राहते. या सर्वातून तो लागवडीचा अवकाश व्यक्त होताना दिसतो. 'कापूसकाळ' मधील हाच अवकाश कापसाची वेचणी, बैलगाडीची वाट बघणे या सर्वातून व्यक्त होताना दिसतो. 'गावठाण' मधून सामुहिक रित्या चालू असलेल्या मळण्यां आणि पाऊस आल्याने होणारी तारांबळ या सर्वांमधून तो व्यक्त होताना दिसतो. त्यामुळे ग्रामीण कादंबरीत शेतीचा(रानाचा) अवकाश असा वेगवेगळया पद्धतीने व्यक्त होताना दिसतो.

**4.3.2.3 ग्रामीण दलित वस्तीचा अवकाश:** 'तणकट' सारख्या कादंबरीतून दलित वस्तिच्या परिसराचे किंवा अवकाशाचे वर्णन झाले आहे ते पाहण्यासारखे आहे. "म्हारवाड्याच्या मध्यभागी असलेली तक्क्याची इमारत तेवढीच बंगलोरी कवलं सांभाळत उभी. बाकी सगळी खोपटं. कुठंकुठं काळयाठिक्कर पडलेल्या खापऱ्या. तर काही खोपटांवर उसाचा काळपट पडलेला पाला. अशात भिमाबा म्हार आणि गोपाळ म्हाराची पक्क्या विटांची घरं. सगळयात उठून दिसणारी. त्यांच्या चौकटीला लालभडक रंग लावलेले. त्यामुळं त्यांचं ठळकपण अधिकच जाणवणारं. एकाच गल्लीचा म्हारोडा, तीस-चाळीस घरं. गल्लीत सगळीकडं खडी उठलेली. मध्येमध्ये मोठाले खड्ढे. त्यात पाणी साचलेलं. वर घुंगुरट्यांचा तवंग,"[41] या दलित वस्तीच्या परिसराच्या वर्णनातून त्यांच्या एकूण हालाखिच्या स्थितीची सहज खल्पना येते. तसेच गावाच्या पार्श्वभूमीवर म्हारवाड्याचे भणंगपण देखील चित्रित होताना दिसते. हा अवकाश कादंबरीतील वातावरण निर्मिती करण्याचे महत्त्वाचे काम देखील करतो हे लक्षात येते.

**4.3.2.4 आंदोलनाचा अवकाश:**

'बारोमास', 'तणकट', 'पाडा', 'कापूसकाळ', 'चिखलवाटा', 'चाळेगत', 'एसईझेड', या सर्वच कादंबऱ्यांतून आंदोलनाचा अवकाश व्यक्त झाला आहे. ग्रामीणता आणि आधुतिकता याच्यातील संघर्षाचा अवकाश म्हणूनही याकडे पाहता येते. या संदर्भात 'पाडा' मधील वीज खात्यावर मोर्चा घेऊन गेल्यावर आंदोलक आणि अभियंते यांच्यातील चर्चेचे तपशील पाहण्यासारखे आहेत. सुरूवातीला आम्ही काही करू शकत नाही आमच्या हातात काही नाही असे सांगणारे साहेब लोक पोलीस आल्याचे समजल्यावर आपली भाषा बदलतात

व मी काही करू शकत नाही तुम्ही चालते व्हा(पृ.40) असे सांगू लागततात. फौजदार साहेब बेकायदा मोर्चा काढल्याबद्दल सर्वांना अटक करायची धमकी देतो तेव्हा चांगदेव त्याला म्हणतो,

"करा सायेब, खुशाल आटक करा... भरा खोटे गुन्हे! पाहू तूं खरी तुम्हच्ची सरकारी ताकद! आधी यक ध्यानात ठिवजा, यवढे पोलीस हायती का तुम्हच्याजो? कुठी ठिवसान यवढ्या शेतकऱ्यांल्हे? यवढी जल हाये का तुम्हच्ह्याजो?" [42] शेतकऱ्यांची वाढती गर्दी बघून साहेबाची आणि पोलीस फौजदाराची बोलती बंद झाली. हा अवकाश शेतकऱ्यांची एकी झाल्यास काहीच अशक्य नाही हे वाचकाच्या मनावर बिंबवण्याचे काम नेमकेपणाने करतो. असाच आंदोलनाचा एक अवकाश 'चिखलवाटा' मध्ये देखील आहे. रामू घोरपडेच्या घरावर जप्ती येते. बँकेचे अधिकारी जप्तीसाठी येतात. ही बातमी समजल्यावर अर्जुना व त्याचे सर्व साथीदार त्याच्या घरी जातात. बँकेचा अधिकारी जास्त रग असलेला असतो. शेतकरी संघटनेचे लोक घोषणांनी आवार दणकावून सोडतात. बाहेर उभी असलेली गाढवं बघून त्याची छाती धडधडू लागते. शेवटी परिस्थिती ओळखून तोंड खाली घालून अधिकारी परत जातात (पृ.३०-३२) या एकूण वर्णनातून आंदोलनाचा अवकाश त्या ठिकाणी नेमकेपणांने व्यक्त झालेला दिसतो. या ठिकाणी देखील शेतकऱ्यांच्या सामुहिक शक्तीसमोर कोणाचे काही चालणार नाही हा आशय प्रभाविपणे व्यक्त होताना दिसतो. एसईझेड मधील आंदोलनाचा अवकाश देखील असाच आहे. अधिकारी सरळ भू संपादन कयायला येतात सोबत कलेक्टर पोलीस फौजफाटा घेऊन आलेला असतो. लोक त्यांना अडवायचा प्रयत्न करतात तेव्हा पोलीसा बंदुका सावरतात तेव्हा आंदोलक चिघळतात. यावेळचे लेखकांने जे वर्णन केले आहे त्यातून हा अवकाश मूर्त होत जातो, "ते बघ, ते बघ... चंदू, तिकडं बघ कलेक्टर पण दिसतोय. , अलायनवाल्याची माणसंपण दिसतात... पेटव, पेटव पॅट्रॉल बाँब, गुरूजी दबून बोलत होते. लोकांच्या हातून दगडांचा पाऊस पडत होता. पोलिसांनी दुसरे अश्रुधुराचे नळकांडे फोडले. पोलीस त्या बाजूला आहेत बघून चंदूने धावत जाऊन दगडी आडून हातातला पेटता बाँब फेकला. कलेक्टरच्या छाताडावर बसला. धॉक्कन पेटला. "साल्यांनो, आम्हाला उद्ध्वस्त करता काय ...? चंदूने दुसरा बाँब पेटवला. फेकला. तिकडून पोलिसांनी गोळ्या सोडल्या. पळापळ झाली. पोलिसांच्या मागून चारपाच गाव दगड-धोड्यांचा पाऊस पाडीत आले. "माराऽऽ फेकाऽऽ" टेकडीकडनं चार-पाच गाव मोठमोठ्या दगडी लोटता आले. पोलिसांची पळापळ झाली. लोकांनी बुलडोझर पेटवला. नुस्ते आगीचे लोळ निघाले. मागून हातात पेटत्या मशाली घेऊन आलेले तीनचार गाव पुढाऱ्याच्या घराकडे धावले. - "साल्यांनो, एसईझेड आणता काय - तुम्ही सुखात बंगल्यात राहयचे आणि आम्ही दरिद्री होऊन भिका मागत हिंडायचे काय?... चला, पेटवा त्यांना.... जमाव चवताळलेल्या आग्या माश्यांसारखा

बेभानपणे धावत सुटला [43] या वर्णनातून आंदोलनाचा अवकाश जीवंत होताना दिसतो. या कादंबऱ्यांतून हा आंदेलनाचा जो अवकाश आला आहे तो अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. नव्वदपूर्व कादंबरीत हा अवकाश दिसत नाही परंतु नव्वदोत्तर काळात झालेले बदल, जागतिकीकरणाची झालेली सुरूवात व या सर्व बदलांमुळे शेतकऱ्यांची झालेली घुसमट व त्याचा जगण्यासाठी सुरू झालेला संगर्ष या सर्वाचे दर्शन हा नव्वदोत्तर काळातील अनेक कादंबऱ्यांतून येणारा आंदोलनाचा अवकाश घडवतो असे निश्चितपणे म्हणता येते. या काही अवकाशांच्या चर्चेमधून एकूण अवकाशाचे स्वरूप लक्षात येते. असे छोटे छोट अनेक अवकाश कादंबरीत असतात. एकूणच भाषिक अभ्यासामध्ये या परिसराचे किंवा अवकाशाचे विशेष महत्त्व असते हे यातून लक्षात येते. खरेतर असे इतरही अनेक अवकाश निवडून त्याचा ऊहापोह करता येईल पण या ठिकाणी नव्वदोत्तर ग्रामीण कादंबरीतील अवकाशाचे स्वरूप लक्षात यावे एवढ्यासाठी हो काही अवकाश निवडून हे विश्लेषण केले आहे.

### 4.3.3 कादंबऱ्यांतील संवाद

संवाद हा भाषिक अभ्यासातील महत्त्वाचा घटक आहे. संवादांमधून पात्रांचे स्वभावधर्म तर कळतातच पण त्याच बरोबर कथानकला गती देण्याचे काम देखील संवाद करतात. अभ्यासासाठी ज्या कादंबऱ्या निवडल्या आहेत त्यांचा अभ्यास केल्यानंतर यात आलेल्या संवादांचे काही एक वर्गीकारण केले असून त्या अनुषंगाने या संवादांची विभागणी करून त्यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

#### 4.3.3.1 चर्चात्मक संवाद

कथानकाला गती देण्याचे किंवा परिस्थितीचे विश्लेषण करण्याचे किंवा चर्चेतून एखादा विचार मांडण्याचे काम संवाद करतात. दोन किंवा अधिक लोकांचे संभाषण जेव्हा चर्चात्मक स्वरूपाचे असते तेव्हा त्याला चर्चात्मक संवाद असे म्हटले जाते. अनेक वेळा या चर्चेचे स्वरूप प्रश्नोत्तर स्वरूपाचे देखील असते या संदर्भात ‘फाटलेले आभाळ’ या कादंबरीतील पुढील संवाद पाहण्यासारखा आहे.

‘नारू कडबा कुणाला घातलासं काय, रचून ठेवलास?' 'का रं, तुला पायजे व्हता काय?'

‘‘नगं ऽ नगं, पर पैलं शेतकऱ्यानं कामावरं ध्यानं द्यावं. तुझं काय खर नसतयं बाबा. तसाच कडबा शेतात पडून खराब व्हायचा म्हणून इचारल

'कशाला इकतूया रं, पदरात चार ढोरं. इकून आणि काय करतुयास, मलाच कमी पडायला लागतोय.'

'मग एवस्तीत रचलास नव्हं.'

'ती काळजी म्या घेतलोय बाबा. उगीच मानं लई ताप व्हतोय. आता बी याला झालीया, लागतील पाच-दहा दिसं. [44] गुरांच्या चाऱ्यापाण्याच्या साठवणुकीबाबतची चर्चा ते परस्परांच्या संवादातून करताना दिसतात. यातून एकमेकाबद्दलची काळजी आणि जिव्हाळा देखील दिसून येतो आणि शेतकऱ्याचे मन कशात गुंतलेले असते याचे दर्शन देखील नेमकेपणाने घडते. असे चर्चात्मक संवाद आपणाला अभ्यासासाठी निवडलेल्या इतर कादंबऱ्यांतूनही दिसून येतात. 'वाहतं पाणी' या कादंबरीतही असे संवाद आले आहेत. 'कालव्याचे पाणी शेतात नेऊन सोडणे म्हणजेच जमीन सिंचनाखाली आणले या गैरसमजुतीनेच सगळा घोटाला केला आहे. या गैरसमजुतीमुळेच चव्हाणसाहेबांना निधी मंजूर होताच कालव्यातून वाहणारं पाणी दिसायला लागलं. नंतर त्यांना वडगावचे ओबीसी शेतकरी दिसायला लागले. कारण कोणतंही असो, पन वडगावच्या शिवाराकडे पाणी वळवायला तुम्ही विरोध केला म्हणून ते शिवार मरता मरता वाचलं. नाहीतर त्या शिवाराचा आणि त्याच्याबरोबर गरीब शेतकऱ्यांचा पण सत्यांनाश झाला असता.

सत्याजीने भलताच विषय काढलेला बघून बजावा चक्रावून गेले. मारोतरावाना विषयांतर पाहिजेच होतं.

त्यांनी सत्याजीने काढलेल्या विषयावरचे संभाषण सुरू ठेवले.

'पाणीवाटपाचे ठरवायच्या वेळी वडगावसाठी पाणी राखून ठेवले असते तर ते द्यायला विरोध करायला आम्हाला कारण नव्हतं. चव्हाण असं मागच्या दारान यायला लागले माणून आम्हाला रस्त्यावर उतरावं लागलं.'

असे सांगून मरोतरावांनी आपले बौद्धिक घ्यायची संधी सत्याजीला दिली.

'साहेब तुम्ही वडगावच शिवार बारकाईने बघितलं आहे असं मला वाटत नाही. कालव्याचं पाणी तिथं पोहोचलं तरी ते शेतात खेळवणं सोपं नाही. त्यासाठी जे पाट काढायला लागतील त्यासाठी निम्म शिवार खणून काढावं लागेल. ते तुमचे ओबीसी शेतकरी पडतील वाऱ्यावर." [45] या चर्चात्मक संवादातून लेखक प्रबोधनाचे काम देखील करताना दिसतो. साहित्य नकळतपणे प्रबोधन कसे करते याचे चांगले उदाहरण म्हणूनही या संवादांकडे पाहता येते. इतरही कादंबऱ्यांतून अशा चर्चात्मक स्वरुपाचे संवाद विपुल प्रमामात आले आहेत.

**4.3.3.2 संघर्षयुक्त संवाद**

संघर्ष हे कादंबरीचा प्रमुख घटक आहे अनेकवेळा कादंबरीतील संघर्ष हा संवादाच्या माध्यमातूनच अभिव्यक्त होत असतो. असा संघर्ष व्यक्त करणारे संवाद अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून आलेले दिसतात. 'गावठाण' कादंबरीतील खालील संवाद या संघर्षात्मक संवादाचे उत्तम उदाहरण आहे.

"कोंड्याऽ तुझ्या पोरीला ताकीद दे, ढोरं यवस्थित राखायचीत."

"कां गा आबा?"

"आबा, आबाच्या आईचा ढबा."

मला त्यातनंच हसू आलं. माणसं गप्पगार हुबी हुती.

"व्हय गा. जित्राप सोन्यागत हाय. पोरं काय माळावर झोपा काढाव जात्यात?" समुरचा गण्या आबागत बोलला.

"कोंड्या, सारी पोरं म्हणत्याती, तुझ्या गायीनं सारा भुईमुंग नि तूर खाल्लीया. जर परत गाय न्हाई तर एकांदं ढ्वार आलं तर खांडूळी झालीच म्हणून समज."

"गावातल्या कुणाची ढोरं यीत न्हाईत वाटते? माझीच तेवढी येत्याती?"

"लय नाक फुगवून बोलू नकं. नाकफुडी फोडून ठेवील."

"ये, जा-जा. जवाचं घव तवाच्या पोळ्या बघू." नारुआबाचा राग नागागत झाला. "कोंड्याऽऽ, लय बोललास. तुझ्या भनं, तुझी ढोरं कुठं जात्यात त्ये बघतोय. नि गावाच्याबी आईला भंगी लावला न्हाई तर इचार." [46] या संवादातून हा संघर्ष मुखर झाला आहे. या संवादातून वर्चस्वदादी प्रवृत्तींचे दर्शन होते त्याच प्रमाणे या प्रवृत्तीला विरोध करण्याचे सामर्थ्य कोंडीबाच्या रूपाने व्यक्त होताना दिसते. असेच संघर्षयुक्त संवाद ‘इदवास’ कादंबरीत जयदेव आणि आबा या दोन पात्रांमध्ये आले आहेत.

फणसाचे झाड गेले. वरुन जयदेव हिणवत म्हणाला,

"इतकी वर्षे जमिनीचा फायदा घेतलास. फणस खाल्लेत. त्याची भरणी भरून घेत नाही. भिक म्हणून सोडून देतो तुझ्यासाठी."

"तुझ्या मायला. मला भीक तू घालणार? दुसऱ्यांना लुबाडून, फसवून खाता येईल तेवढी खाणारी तुझी बुरशी औलाद मला भीक घालणार?" म्हणत मारायला धावला. "बुरशी औलाद, शब्द ऐकून जयदेवचे पित्त खवळले. कानशिलं तापली. रागावून तो ओरडला." तुझ्या घरात ती मुसड्याची औलाद जन्माला आली ते अगोदर बघ. आणि मग दुसऱ्याची औलाद तपास."

"भेन्चोद साला. काहीतरी बडबडू नकोस. तोंड फोडून टाकीन." खवळलेला " आबा एकदम ओरडला.

"कुणाकुणाचं तोंड फोडणार आहेस? सगळा गाव बोलतो. जा घरी जाऊन जरा डोळे उघडून त्या पोराकडे बघ, त्या रफिक मुसड्यासारखा दिसतो की नाही ते. [47] काही कादंबऱ्यांतून घरातील अंतर्गत संघर्षाचे देखील चित्रण संवादातून होताना दिसते. ‘चिखलवाटा’ मधून आपला मुलगा त्याच्या स्वतःच्या मुलीच्या लग्नात म्हणावे तसे लक्ष देत नाही म्हणून मुलगा आणि बाप यांच्यातील संघर्ष संवाद रुपाने कादंबरीत आला आहे.

"हामच्या धोंडूला कुनी बी पसंद करील. हायच तिनं तसल्या रुपाची! बिन पैशानं पत्कराव लागतंय... पसंद केलं मनून कुनाच्या बी गळयात बांधावं का तिला?" "आर्जुना, चांगलाय मन गा घर. उगंच न्हाई ती लांबन लावुनी; आता उरकून टाकाय
तिचंच... ह्या घराच्या पायात पांडुरंगनं लय पायपिटी केली हाय, नगं मनून त्येला बी नाराज केल्यावनी हुईल."
"काय त्या घराला घिऊन बसलाव की आबा?... मला नीट चवकशी तर करू देताव का न्हाई मनावं?"
"नकटीचा सिनगार हुईपस्तोर लंगडी बारा कोस गेली होती मन! तसे तुजं वागनं, घर चलून आल्यालं घर तू घालतूस आसं करून. कर तुज्या मनाला यिल तसे. हे नगं, ते नगं मनून ठिव पोरीला घरात लिप्पन लावून." [48]
कौटुंबिक वादातून होणाऱ्या संघर्षाचे दर्शन अनेक कादंबऱ्यांतील संवादातून घडते या संदर्भात 'बारोमास' मधील अलकाला मधूकडून मारहाण होते त्या वेळी झालेल्या संघर्षाचे दर्शन संवादातूनच घडते.
"साबन, तेल, स्नो, पावडरी सम्दं लपवून ठेवती. तूच माणूस हाये अन् आमी का जनावरं हाये का?'
'एवढी हौस आहे तर मग विकत आणावं आपल्या पैशानं. फुकटचे शानशौक काय कामाचे...'
'हे साबन कोणाच्या पैशानं आलं मंग?'
'ते माहेरावून आणलं मी... माझ्या बाबाने घेऊन दिलं यायच्या आधल्या दिवशी. सगळया माझ्या वस्तू मोहाडीतून आणते मी. त्या सामानाला हात लावायला लाज नाही वाटत?'
'लाज अन् बीज काढायचं काम नाही, सांगून ठेवतो.' असं म्हणून तो तावातावाने अलकाजवळ गेला.
'एकदा नाही हजारदा म्हणेन. काय करता तुम्ही?' असं म्हणून अलकाही आवेशात पुढे झाली.
'एक देईल थोबाडीत ठेवून...'
'मारा बरं, कसं मारता ते!'
'हं... हे घे! आशी मारतो... SS' [49] कौटुंबिक संघर्षाचे चित्रण या संवादातून सहजतेने दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे या संवादातून त्या त्या व्यक्तिचे व्यक्तिदर्शन देखील आपणाला समजतेने होते. अशी संघर्षयुक्त संवादाची इतरही अनेक उदगहरणे अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आली आहेत.

#### 4.3.3.3 तक्रारयुक्त संवाद

तक्रारयुक्त संवाद कादंबरीतून येणाऱ्या संवादाचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. अशा प्रकारचे संवाद अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून देखील आले आहेत. यासंदर्भात 'पाडा' कादंबरीतील सुनीता आणि तिचा भाऊ यांच्यामधील संवाद पाहता येतो

"वंड तायडे, तुह्या मनटलीले सांगती का काही!"

"काम्हू काय केल्हं तिन्हं?"

"आझून काय केल्हं म्हनती का? मह्या राघुचं दुधं पेल्हं तिन्हं!"

"प्यू देनं मंग! तिची काय चुक हे? तुन्हं काम्हू तिच्या वाटीत आनलं भो?"

"हां ऽ! चूक झाली मही. मल्हे काय मायथी त्ये, आठी बशेल हाये म्हनून. [50] यातून मांजरांने राघूचं दूध प्याल्याची तक्रार ती मांजरी सुनीताची असल्याने कैलास सुनीताकडे करताना दिसतो. या संवादातून त्या दोघांच्या अल्लडपणाचे देखील दर्शन होते.

**4.3.3.4 काळजीयुक्त संवाद:**

अनेक कादंबऱ्यांतून जे संवाद आले आहेत त्या संवादातून एका पात्राला दुसऱ्या पात्राबद्दल जी काळजी आहे ती व्यक्त होताना दिसते या काळजीच्या मुळाशी त्या व्यक्तीबद्दल असलेले प्रेमही व्यक्त होताना दिसते. या संदर्भात 'भगदाड' मधील मोर्च्यावर दगडफेक होते त्यावेळचे स्वरूप व मधुबाला यांच्यातील संवाद पाहण्यासारखे आहेत.

"मधू तू इथंच थांब मी हे महन करू शकत नाही. मी त्या पोलिसाना जाब विचारतो.

'स्वरुप माझी शपथ आहे तुला. तू त्या गर्दीतून जाऊ नकोस रे." [51] 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीत देखील. आई आत्महत्या करणार ये लक्षात येते तेव्हा आईच्या काळजी व जिव्हाळ्यापोटी मुली जो संवाद तिच्यासोबत करतात तो मन हेलावणारा आहे.

"तुम्ही दोघी इथंच उभ्या रहा. नाहीतर त्या लिंबाच्या झाडाखाली सावलीत जाऊन बसा. मी बाळाला पाणी पाजायला जाते खाली."

तर उषा पायात पडून रडायला लागली.

"मला माहीत हाय तू जीव दियाला निघालीस."

"जाऊ नगंस आय, नाना आमाला मारून टाकंल."

पोरींनी तिला कवटाळलं. [52] यातून पोरीना आईची व स्वतःची दोघांचीही काळजी वा चिंता असल्याची दिसते.

"चाला वं ऽ ज्यून घ्या नं..."

"सांगलं नं् तुल्हे यकदा! भूक नही मल्हे म्हनून..." "आता वं ऽ मायबाई! खुशाल भूक नही म्हनता. वखत पाहा बरं किती झाला. [53] 'पाडा' कादंबरीतील या संवादातून चांगदेवची बायको कमळाबाई हिला चांगदेवची किती

काळजी आहे हे लक्षात येते. एवढेच नाही तर त्याच्या मनात काहीतरी आहे पण तो बोलत नाही त्यामुळे त्यांने काहीतरी बोलावे म्हणून तिचे चाललेले प्रयत्न देखील या संवादातून दिसून येतात.

**4.3.3.5 प्रश्नोत्तरात्मक संवाद**

प्रश्नोतरात्मक संवाद हा संवादाचा आणखी एक प्रकार म्हणून सांगता येतो. प्रश्न व उत्तरे अशा प्रकारे या संवादांचे स्वरूप असते. 'वाहतं पाणी' या कादंबरीत सत्याजी व पटेल गुरूजी यांच्यामध्ये अशाप्रकारचे अनेक संवाद आले आहेत.

जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या पिकाच्या सुधारित जाती म्हणजे काय याची कल्पना तुम्हाला आहे काय?'

गुरुजींनी विचारलेल्या प्रश्नाचे समर्पक उत्तर सत्याजी कडे नव्हते. त्यांने वेळ न काढता आपले अज्ञान मान्य करून टाकले.

'शास्त्रज्ञांनी अशा काही जाती विकसित केल्या आहेत एवढंच मी ऐकत आलो आहे.'

सत्याजीकडून अपेक्षित उत्तर येताच गुरुजींनी आपला पाठ पुढे सुरू केला. 'जास्तीत जास्त उत्पन्न देणाऱ्या पिकाच्या जाती म्हणजे वनस्पतीमधल्या विकृती. शास्त्रज्ञांनी अशा विकृती निर्माण केल्या आहेत. त्या जातींची सर्वात मोठी विकृती म्हणजे त्या अतिशय खादाड असतात. जमिनीतून मिळणारी जीवनसत्त्वे त्यांना पुरत नाहीत. त्यांना रासायनिक खताच्या वाढीव मात्रा द्याव्या लागतात. दुसरी विकृती म्हणजे त्या अतिशय दुर्बळ असतात. कीटकनाशकाच्या फवारण्या केल्या तरच त्या तग धरू शकतात. त्या नपुंसक असतात. बियाणं राखून त्यांचे पुनरुत्पादन करता येत नाही. सुधारित जातींच्या बियाण्याबद्दल भाषणं देणाऱ्या लोकांना पण या विकृतींबद्दल फारशी माहिती नसते." [54] या प्रश्नोत्तरात्मक संवादातून लेखकाकडे असलेली वाचकांच्या प्रबोधनाची दृष्टी देखील दिसून येते. 'तणकट' कादंबरीतील पुढील संवाद प्रश्नोत्तरात्मक संवादाचे आणखी एक चांगले उदाहरण आहे.

पहिल्यादा त्याच्या मनात संतापाची लहर उसळली. मग हळूहळू त्यानं स्वतःला पुर्ण काबूत आणलं. डोकं एकदम शांत झाल्यावर तो म्हणाला,

'पढाSS नेमकं काय चाललंय म्हारोड्यात?'

'तुज्या कानावर आलं आसंलच की सगळे. तू म्हणतास तव्वाच ऐकाय पायजे व्हतं. कळालं न्हाई तवा.'

'मागचं बोलू नको. आत्ताचं सांग.' कबीरनं स्वतःला आवरलं पण आवाज करडा झालाच. नाकाच्या पाळा फुलल्या.

'पतसेस्थेत वीस जणांच्या नावावर कर्ज काढलंय आणि त्याच्या बँकेत पंधरा जनांच्या नावावर कर्ज उचललंय.'

'पतसेस्थेचं रेकॉर्ड कुणाकडं हाय?'

'ते जप्त करून न्हेलंय. शेडबाळ्यानं गाव सोडल्यावर बनसोड्यानं कुठल्या आपीसात अर्ज करू न्यायला लावलं म्हणं.'

'बनसोड्या पतसेस्थेत सभासद होता.?'

'त्येला संचालकबी केलतं. त्येनंच पोलिसात कळीवलंय म्हणं.'

'गोपाळतात्या आनी मी त्येच्याकडं गेलताव. उलट आमालाच दम दिला. अलतापनं तर तात्याच्या कानसुलात मारलं. जास्त काय बोललास तर ठार मारीन म्हणला.' 'आनी गौत्या कुठं हाय?'

'दोन दिवसापास्नं बेपत्ता हाय. घरात यायलाच न्हाई.''[55] या प्रश्नोत्तरात्मक संवादातून कबीर आवश्यक ती माहिती घेत असताना दिसतो. प्रश्नात्मक संवादातून कधी माहिती घेणे तर कधी माहिती देणे अशा दोन्ही गोष्टी साधलेल्या असतात तर कधी एखाद्या गोष्टीचा जाब विचारण्यासाठी सुद्धा अशाप्रकारच्या संवादांची रचना लेखक करतो असे दिसून येते.

### 4.3.3.6 उपरोधिक संवाद

उपरोधिक संवाद हा कादंबरीतील संवादांच्या विविध प्रकारातील एक महत्त्वाचा प्रकार म्हणून सांगता येतो. कादंबरीची वाचनियता कायम ठेवण्यासाठी असे संवाद खूप उपयुक्त ठरतात.

'साखरफेरा' कादंबरीत जेव्हा यशा पुन्हा आपण गावदरीत ऊस लावणार म्हणतो ते काहिसे कुच्छित व उपरोधिक स्वरूपात त्याची बायको त्याच्याशी संवाद करते तो पाहण्यासारखा आहे.

''गप्प बस. जादा वाडंचार नगो. गावंदरीत ऊस लावणार आता-'

'हाड्! कुत्रं ऐकंल. सारा जलम चाल्लाय बिडीच्या धुरात, आनी म्हणं ऊस करणार. त्वांड बघा ऊस लावणाऱ्याचं-'' [56] 'चाळेगत' कादंबरीतील काही संवाद उपरोधिक संवादाचे चांगले उदाहरण आहे. दामू तांडेल ट्रोलर वाल्यांशी पंगा घेतो व ते होडीवर चढून त्याला मारहाण करतात त्यातून ते कसेतरी वाचतात त्यानंतर नारग्या गिरपाचे हे इतरांना उद्देशून असलेले संवाद पाहण्यासारखे आहेत.

''व्हयतें आता आगाच्या फागां आनी उतवाक् ढेंगा खेकां म्हणान्? व्हच्चां तां व्हवून गेला! आता पासून ब्वाँव् मारून काय व्हताला? घराक् नाय धरती आणि ढेंगा झालीं वरतीं, असली झालीहां आमची गत. चला आता! ह्या आमच्या म्हाताऱ्याकच लय् खाज होती त्येंच्यावांगडां झुज घेवचीं. गांडीत नाय दम आनी म्हंता मी मुकादम!

जितो सोडल्यांनी ह्याच नशीब म्हणाकू व्हयां आता...!" [57] 'तणकट' तसेच इतर काही कादंबऱ्यातून देखील अशाप्रकारचे संवाद आले आहेत. प्रत्येक लेखकाची लेखनाची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली असते अशाप्रकारच्या संवादंची रचना हा त्याच्या लेखनाचा शैली विशेष म्हणूनही पाहता येता.

**4.3.3.7 स्वसंवाद**

स्वसंवाद हा कादंबरीतील संवादातील अत्यंत महत्त्वाचा प्रकार आहे. स्वतःच स्वतःशी केलेला संवाद म्हणजे स्वसंवाद. अभ्यासासाठी निवडलेल्या बऱ्याच कादंबऱ्यांतून अशाप्रकारचे संवाद आले आहेत. 'बारोमास' कादंबरीचा नायक एकनाथ याचा स्वतःच्याच मनाशी चाललेला पुढील संवाद लक्षात घेण्यासारखा आहे.

"आपल्या जीवनाला अर्थ काय? आजच्या युगात आपण किती मागे पडलो... आजचं युग स्पर्धेचं... आजचं युग पैशाचं. तीन-चार कॉलेजवर तज्ज्ञ मंडळींनी आपलं सिलेक्शन केलं आणि संस्थाचालकांनी रोख पैशाची मागणी केल्यावर आपण हातपाय गाळले. स्पर्धेच्या युगात आपण मागे पडलो... मागे मागेच जात राहिलो. भांडवल लावा, भरपूर नफा घ्या या व्यावहारिक तत्त्वाशी आपण का जुळवून घेऊ शकलो नाही? केवळ पैसा नव्हता म्हणून! आज आपल्याला पंधरा-सोळा हजार पगार असता. आपल्यापेक्षाही कमी टक्केवारी असणारे, कॉलेजच्या कार्यक्रमात चार वाक्यं धड बोलता न येणारे प्राध्यापक आहेत. बंगल्यात राहतात. गाड्या उडवतात. आणि आपण? [58] या स्वसंवादातून एकनाथच्या मनाची वेदना मुखर होताना दिसते. त्याच्या मनाची अस्वस्थता देखील त्यातून व्यक्त होते. असाच स्वसंवाद 'तणकट' मधील कबीर या पात्राच्या मनातही चालू असल्याचा दिसतो.

"जानबा कसाळया वाटंला लागला आणि त्याला बरं वाटलं. थोड्या वेळानं त्याच्या पुन्हा मनात आलं. आपल्याला असं का होतं? खरं म्हणजे जानबा कसाळयाबरोबर मोकळेपणानं बोलायला काहीही हरकत नव्हती. तो तर किती आपुलकीनं बोलत होता. मग आपण त्याला फक्त हसून कटवण्याचाच प्रयत्न का केला? त्यानं विचारलेलं कोणीही भेटणारा विचारतोच. मग त्याला आपण सरळ बोललो असतो तर काय बिघडलं असतं? आपल्याला बोलण्याचा कंटाळा कसा? कंटाळा म्हणावं तर हे सगळीकडंच असं होत नाही. बऱ्याच ठिकाणी आपण अगदी नको इतकं बोलत बसतो. असं का व्हावं? [59] हे असं का व्हावं हा त्यांने स्वतःळा विचारलेलला प्रश्न खरेतर खूप बोलका आहे अगदी सूचकपणे त्याचे दलित असणे आणि आता शिक्षणाचे शस्त्र हाती घेऊन त्यातून बाहेर येण्याचा त्याचा प्रयत्न व त्यामुळे सवर्णांच्या प्रत्येक कृतीकडे त्याच्याही नकळतपणे संशयाने

पाहण्याची वृत्ती हे सर्व त्याच्या या वर्तामागे असल्याचे आपल्या लक्षात येते. 'चाळेगत' मधील पुढील स्वसंवाद देखील महत्त्वाचा आहे.

"मी घाबरतोय का?

मी का घाबरावं?

क्षणभर गृहीत धरलं, की मी घाबरतोय; तरी ते का? मी कुणाला घाबरतोय?

माझे तर कुणीच शत्रू नाहीयेत. बाहेरच्या जगात कुणी मला ओळखतही नाहीये फारसं. मी कुणाचं काही कधी वाईट केलेलं नाहीये, किंवा पुढेही कधी करेन असंही नाही. आणि तरीही मी घाबरतोय ते का?

मी माझ्या जगण्याला घाबरतोय का? मी ज्या व्यवस्थेत जगतोय, त्या व्यवस्थेला घाबरतोय का? मी ज्या काळात जगतोय, त्या काळाला, त्या काळाने उभ्या केलेल्या गतीला, प्रश्नांना, आव्हानांना, संभ्रमांना, गोंधळांना, कोलाहलांना, स्पर्धांना, दडपणांना, दहशतीना... घाबरतोय का?

मला काहीच कळत नाहीये."[60] 'चाळेगत' कादंबरीमध्ये लेखकावर हल्ला झाल्यानंतर लेखकाचा स्वतःशी चाललेला हा संवाद या घटनेचा त्याच्यावर झालेला परिणाम आणि त्याची झालेली मनस्थिती दर्शविणारा आहे. अर्थात या सर्वातून आपण लिहिलेच पाहिजे हा निर्णय लेखक घेतो तेव्हा तो कणखर मनोवृत्तीचा असल्याचे दिसते.

अशी स्वसंवादाची उदाहरणे इतरही कादंबऱ्यांतून आहेत. एकूण पात्राची मानसिक स्थिती, त्याची अस्वस्था, त्याजे जीवनाबद्दलचे विचार हे सर्व समजून घेण्यासाठी हे स्वसंवाद महत्त्वाचे असतात.

**4.3.3.8 घरगुती संवाद:**

घरगुती संवाद हे अभ्यासासाठी निवडलेल्या बऱ्याच कादंबऱ्यांतून दिसून येतात. घरातील वातावरण या संवादातून आपणाला दिसून येते. नात्यातील ओलावा, ताण-तणाव हे सगळे त्यातून दिसून येतं. नातेसंबंधांची वीण कशी असते वा आहे ते देखील या संवादांमधून समजते. अनेकवेळा बदलत जाणाऱ्या नातेसंबंधांचे दर्शन देखील आपणाला या संवादातून लक्षात येते.

"काय माय-लेकीचा लाड चल्लाय माय? घरात दुसरे मान्स हावतं. त्यायच्याकडबी ध्यान देवावं." भारावून पुष्पा बोलली. तिचेही डोळे पाणावले होते. दोघी जावा ओसरीवर टेकल्या. बसतबसतच निर्मला म्हणाली

"काय मंतय सासर?".

"काई न्हाई, नादर हाय." सुनंदा हासत म्हणाली.

निर्मलाचे डोळे चमकले. चेहरा खट्याळ बनला, ओठावर हसू पसरलं. तिच्या पोटाकडं बोट दाखवीत ती म्हणाली, "त्ये त आम्हाला दिसायलयंच की." [61] या संवादातून जावा व नणंद यांच्यातील आपुलकीचे असलेले संबंध दृष्टीस पडतात.

'असं जगणं तोलाचं' मधील पुढील घरगुती संवादही पाहण्यासारखे आहेत.

"आन् नामदेव! ती धाकटं एक जेवणं खाणं वर्जून धुमसतच बसलय रे बाबा! माजा तर जीव वैतागून गेला बग त्या लेकरापुडी. "आन् का बरं!" नामूच्या जिवाला पेरण्याचा घोर.

"आता आजून का बर! लिव्हणं शिकायचाय मंतोय. दुसरं काय?"

खाली मान घालून जेवत बसलेल्या नामूनं मान थोडी वरी केली.

आन् हातातला घास तसाच ठेवून कासाला म्हंटला. "मग गाय न्हिऊन खाटकाच्या दारात बांद मनावं! आन् त्येनं काय मंतोय? तुजा लाड हाय सारा. उगू कायी तरीच सांगत बसतीस आपलं." [62] या संवादातून आईची मुलाच्या शिक्षणाबद्दलची कळकळ दिसते तर मोठ्या मुलाची शेती विषयीची चिंताही दिसते. तत्कालीन कालिक संदर्भ देखील या ठिकाणी येतो. या संवादातून त्या वेळी मुलांनी शिक्षण घ्यायला हवे हा विचार किमान ग्रामीण परिसरात तरी रुजला होता असे अजिबात दिसत नाही.

**4.3.3.9 शिवराळ भाषेतील संवाद:**

अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून शिवराळ भाषेतील संवाद दिसून येतात. ग्रामीण भाषेचे वैशिष्ट्य म्हणूनही या शिवराळ संवादांकडे पाहता येते. 'ऐसे कुणबी भूपाळ' मधील पुढील संवाद या दृष्टीने पाहता येईल.

"तिकडं ढोरं मोकार सोडून इथं शेण काय काढीत बसलास?"

"चंद्राबाई न्हाई तसे म्याच शेण काढायलो."

"आन त्ये ढोरं कोण्या मायझ्यानं संभाळायचे? एखादं ढोर गेलं गजेघाटात मंजे? तुव्हा का लौडा दुखायलाय. हायतंच मालक सोडऊन आणायला."[63] अर्थात ही मालकांने राखण्याला उद्देशून वापरलेली भाषा आहे. भाषा स्थल, काल. व्यक्ती, परिस्थिती यानुसार कशी बदलते याचे सुद्धा हे सुंदर उदाहरण आहे. 'चाळेगत' कादंबरीतील पुढील उदाहरण देखील शिवराळ भाषेतील संवादाचा एक उत्तम उदाहरण आहे.

"च्वेऽड्डयेच्याऽऽ आऽवय झवण्याच्याऽऽ ऱ्हांव, तुका आत्ता जितोच नाय सौडनंव. फोदरीच्या, दर्यातच गाडतंऽव तुजी हाडां! मस्ती जिरवतव् पळे तुझी! झेंजरांऽऽ रे! चेचाऽऽ रे!! श्याप पिडढयार करून टाकाऽऽ म्हाताच्याक्" [64] यातून हे शिवराळ संवाद बोलणाऱ्यांचा उन्माद देखील दिसून येतो.

या संवादातून गुरमी, उद्म्मपणणा, बेपर्वा वृत्ती, अरेरावीपणा आणि दुर्बलांना चिरडण्याची मनात वसत असलेली पाशवी वृत्ती या सर्वाचे दर्शन या संवादातून घडते.

**4.3.3.10 उडवाउडवीचे संवाद**

उडवाउडवीची उत्तरे देणारे संवाद अभ्यासासाठी दिलेल्या अनेक कादंबऱ्यांमधून आले आहेत. ‘बोडखी’ कादंबरीत कादंबरीचा नायक डोमा आपली हक्काची बलुत्याची ज्वारी मागायला गेला असता त्याला कशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात हे पुढील संवादातून लक्षात येते.

"शेषरावभाऊ! मायी तीन मन जवारी रायलती भाऊ."

"हवं राज्या! यंदा जवारी पिकलीच नायी."

"मले काम व्हतं. लेकरासाठी बकरी घियाची व्हती."

"पन जवारीच नायी गळ्या."

"बलुत्यातली होती भाऊ."

"ते खरं हाये तुवं! पन आता आमाले खेटर लागतई नायीत पयलेसारखे."

"काहून बाप्पा!"

"हे पाय सून हाये आकोला शेयरातली. ते बापा, बाटाची चप्पल घालते. आन् पोराईले त्याईनं दुकानातला जोळा घिऊन देला. तुया बनोयेल जोळा तिंगे पळला हाये. कोनी हुंगत नायी त्याले. निहा माती आन् लिद कुटून तुया त्याले तयकूट बनोलं.” [65] या संवादातून काही शेतकऱ्यांची आपल्या बलुतेदारांविरूद्धची मुजोर वृत्ती दिसून येते. तसेच बलुतेदारांचे शोषण कसे होते हे देखील दिसून येते. ‘एसईझेड’ कादंबरीत कादंबरीचा नायक चंदू जेव्हा बँकेत कर्ज मागण्यांसाठी जातो तेव्हा त्याला अशीच उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.

"बोला -" अधिकारी समोरचे चेक भराभर पास करीत होता.

"सहेब, आपल्या बँकेत सुशिक्षित बेकारांसाठी कर्ज योजना - मला पोल्ट्रीसाठी कर्ज हवे होते -" चंदू एकदम बोलला.

"ती स्कीम आम्ही स्टॉप केलीय. त्याचं काय आहे हे लोक कर्ज घेतात, पण नंतर Repayment परतफेड बरोबर करीत नाहीत. आमची पोल्ट्री चालत नाही, बंद पडली. हॅव न तँव सांगतात." [66] सामान्य माणसांविषयी कळकळ असण्याऐवजी बँक अधिकाऱ्यांची अरेरावी वृत्ती व सामान्य माणसाविषयी असलेली तुच्छतेची भावना यातून नेमकेपणाने व्यक्त होते.

**4.3.3.11 सूचक संवाद:**

अनेकवेळा कादंबऱ्यांतील काही संवादामधून काही सूचकपणे सांगितलेले असते. अशा संवांदाना सूचक संवाद असे म्हणता येईल. ‘तणकट’ कादंबरीतील शेडबाळ्या आणि आक्काबा राणे यांच्यांतील एक संवाद याचे उत्तम उदाहरण आहे.

“तात्या लवकर भाईर पडला?' तो बोलायचं म्हणून बोलला.

'तू काम लावला हाईस तिकडं निगालोय. तूबी त्याच कामात असणार की' आक्काबाची शीर तडकली.

'कसलं काम? काय न्हाई कळलं?' शेडबाळ्यानं वेड पांघरलं.

'कळल. लवकर कळंल. डोस्कीची केस काढाय सुरू केली की सगळे कळंल. मीबी ह्याच गावात ऱ्हाणार हाय. बघूयाच ऊन दमतंय काय रेडा दमतोय.” [67] सूचकता व्यक्त करण्यासाठी या संवादातून ज्या प्रतिमांचा वापर केला आहे त्यातून ही सूचकता नेमकेपणाने व्यक्त होताना दिसते तसेच संवादाची भाषा आणि ग्रामीण जीवनातील प्रतिमा यातून ग्रामीण अवकाश देखील नेमकेपणाने व्यक्त होतो. संवाद हे कोणत्याही कादंबरीचे मुख्य अंग असल्याने अशा वेगवेगळया स्वरूपाचे संवाद सांगता येणे शक्य आहे. कादंबरीतील मानवी भावभावना व्यक्त करण्याचे संवाद हे सर्वात महत्वाचे माध्यम असल्याने, संवादाचे विविध प्रकार आपणाला कादंबरी वाङ्मयातून दिसून येतात. त्यातील काहिंचा परिचय या ठिकाणी करून घेतला आहे. जेणेकरून अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील संवादांचे सर्वसाधारणपणे स्वरूप कसे आहे ते आपल्या लक्षात येते. एकूणच कादंबरीच्या भाषिक अभ्यासात त्यातील संवाद हा महत्त्वाचा घटक आहे हे या अभ्यासातून लक्षात येते.

**4.3.4 कादंबऱ्यांमधील भाष्य**

कादंबरीच्या भाषिक अभ्यासात भाष्य हे देखील महत्त्वाचे असते. अर्थात तिसऱ्या प्रकरणातील कादंबरीतील चिंतनशीलता. या प्रकरणात या भाष्याचा चिंतनशीलतेच्या अंगाने आढावा घेतलाच आहे. या ठिकाणी काही मोजकी उदाहरणे घेऊन भाषिक अंगाने लेखकाचे भाष्य कादंबरीतून कसे व्यक्त होते हे फक्त पहायचे आहे.

‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतून लेखकांने निवेदकाच्या भूमिकेतून किंवा कधी पात्रांच्या मुखातूनही ज्या विषयाच्या संबंधित लेखकांने ही कादंबरी लिहिली आहे त्यावर भाष्य केले आहे असे दिसते. विघटीत होणारी गावातील एकत्रित कुटुंब पद्धती व त्यातून निर्माण होणारे ताणतणाव हे कादंबरीचे मुख्य सूत्र आहे व त्याच सूत्राभोवती प्रसंगानुरूप लेखकाने भाष्य केले आहे. एका ठिकाणी भाष्य करताना लेखक म्हणतो, ‘स्वतःच्या भावालाच काशीनाथ एवढा पाण्यात बघतो की दुसऱ्यांने काही करायची गरजच नाही. कदाचित हा कुणब्याच्या

रक्तातलाच गुण असावा असेही लेखकाला वाटते. आपल्याकडील मालकी गेली याचे दुःख आणि ज्याला मिळाली आहे त्याच्याबद्दलचा द्वेष हे कुणब्यांच्या जगण्याचे सूत्र होते आणि ते स्वतःच स्वतःचा नाश करवून घेतात. (पृ.335) जगण्याबद्दलचे आणखी एक भाष्य करताना(पृ.338) लेखक म्हणतो की मन एकदा दुभंगल्यावर ते परत जुळणं अशक्य असतं. एका क्षणी सांधल्यासारखं वाटते ही, परंतु दुसऱ्या क्षणाला पुन्हा तडा दिसू लागतो. एकत्र कुटुंबावर भष्य करताना लेखक आणखी एका ठिकाणी म्हणतो, ‘एकत्र कुटुंबात एकामेकांवर विश्वास असला तरच एकत्र कुटुंब टिकतात. विश्वासाला तडा गेला तर ते कुटुंब एकत्रित राहणे कठीण असते. एवढे दिवस एकत्र कुटुंबात असणारे आता एकमेकांच्या उरावर बसायला तयार होतात. माकडीण जसे पाणी ताकातोंडात जाऊ लागले की डोक्यावरच्या पिल्लाला पायाखाली घेते तशीच सर्वांची स्थिती होते. प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थाचाच विचार करतो.’(पृ.355) ‘माणसाला माणूस होऊन जगता येत नाही का?’ (पृ.370) हा लेखकांने निर्माण केलेला खूप मोठा प्रश्न आहे. आपण आपल्या छोट्याशा स्वार्थासाठी सगळ्या घराचा बळी द्यायलाही मागेपुढे पहात नाही. प्रत्येकाला सत्ता हवी असते आणि सत्तेसाठी तो काहीही करायला तयार असतो. जेव्हा सत्तेची भावना बळावत जाते तेव्हा एकत्र कुटुंब पद्धती टिकणे अशक्य असते. जरासे बळ आले की कुणबी माजतो म्हणून गृहकलहाच्या माध्यमांतून त्याचा माज उतरवण्याची व्यवस्था देवानं केली असावी असं लेखकाला वाटते. (पृ.426) तो भिकेला लागतो तेव्हाच नीतिने वागतो. पैसा हाती आला की तो माजतो. लेखकाचे हे भाष्य फक्त कुणब्यांच्या संदर्भात नव्हे तर एकूणच कृषी व्यवस्थेच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. स्वामित्त्वासाठी मी काहीही करायला तयार आहे म्हणूनच शांततेला नेभळट मानून कुणबी तिला अंगाखाली घेण्याचा प्रयत्न करतो. लेखकाचे हे भाष्य खरोखरच विचार करण्यासारखे आहे. कुणब्यातला हा सनातन संघर्ष कधी नाहिसा होईल, याबद्दल भाष्य करताना लेखक म्हणतो,

'कितीबी झाले तरी त्यो भाऊ हायं. मव्हा जीव कसा घेईन.' हा विश्वास. या विश्वासातूनच एक भाऊ दुसऱ्याचा बळी घेतो. त्यातूनच संघर्ष तीव्र बनत जातो. संघर्षाचा स्फुल्लिंग मात्र एकच... स्वामित्व, सत्ता, श्रेष्ठत्व. ते जोपर्यंत कुणीतरी एकजण मान्य करीत नाही. नतमस्तक होत नाही. त्याचे अन्याय सहन करत नाही, तोपर्यंत हा संघर्ष चालणार. नेमकं हेच दुर्दैवानं दुसरा मान्य करीत नाही. नि कळवंड चालतंच राहते.

ती चालतंच राहणार....

अंतापर्यंत. पिढ्यान्पिढ्या.... श्रेष्ठत्व. सत्ता.... स्वामी.... मोठेपण माधा.... संघर्ष.... कळवंड.... त्याचं अस्तित्व. अहंकार.... द्वेष....

शेवटी माणूस माकडाचाच वंशज. [68]

खरेतर हा संघर्ष कधीच नाहिसा होणारा नाही कारण सत्ता, हव्यासाच्या मूलभूत प्रेरणा आपल्यातून कधीच नाहीशा होणार नाहीत, हे मोठे सत्यच या कौटुंबिक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर लेखक आपणाला सांगताना दिसतो. हे भाळ्य करण्यासाठी लेखकाने पाल्हाळीक शब्दातील निवेदनशैली वापरली आहे. जे भाष्य करायचे आहे त्यानुसार अभिव्यक्ती होते हे लक्षात येते म्हणूनच अगदी हरीभाऊ कालीन निवेदन पद्धतीचा वापर लेखकाने केल्याचे लक्षात येते म्हणजे लेखकाचे भाष्य आणि लेखकाची भाषिक अभिव्यक्ती यातील अंतरसंबंध देखील आपल्या लक्षात येतो.

'एसईझेड' या कादंबरीत लेखकांने आपल्याकडे जे पारंपरिक ज्ञान आहे त्याबद्दल संशोधन झाले पाहिजे म्हणून जे भाष्य केले आहे ते महत्त्वाचे आहे. गजा भटाला फुर्से चावल्यावर हॉस्पिटलमध्ये न नेता गावठी उपचार करून ठीक केला गेला. पिसाळलेला कुत्रा चावल्यास जानुबूवा ताकात जुनी तांब्याची नाणी टाकून ते ताक प्यायला देतो व कोणाला रॅबिज होत नाही. विंचू चावल्यास झाडपाल्याची ओषधेच घेतली जातात. ग्रामीण भागात हे जे गावठी औषधोपचार केले जातात. त्याच्यावर वैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधन झाले पाहिजे असे लेखक म्हणतो(पृ.156) हे लेखकाचे भाष्य ग्रामीणतेकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन आहे. हे भाष्य लेखकाने प्रसंगानुरूप केले आहे त्यामुळे लेखनातील सहजता देखील टिकून राहिल्याचे दिसते 'मी काहीतरी सांगतो आहे' असा आवेश त्यात कुठेही दिसून येत नाही आणि हे लेखक म्हणून शंकर सखाराम यांचे मोठे यश म्हटले पाहिजे.

'बोडखी' कादंबरीच्या विषयाच्या अनुषंगाने लेखिका प्रतिमा इंगोले यांनी मराठी माणसाच्या मानसिकतेबद्दल जे भाष्य केले आहे ते महत्त्वाचे आहे. मराठी माणसाला आपल्यापेक्षा दुसऱ्या प्रांतातील माणूस श्रेष्ठ वाटतो. मराठी माणसाच्या कामाला सोडून इतर माणसे जो व्यवसाय करतात त्याला श्रेष्ठ म्हणण्याची मराठी मानसिकता आहे ही मानसिकता आपल्याच माणसांबद्दल आपल्या मनात न्यूनगंड निर्माण करते. (पृ.123) म्हणूनच मारवाड्याच्या घरात चोरी झाली म्हणून पोलीस तत्परतेने कामाला लागतात व कोणतीच सखोल चौकशी न करता डोमाला चोर ठरवून मोकळे होतात. मराठी माणसाच्या मानसिकतेबद्दलचे हे भाष्य महत्त्वाचे आहे. जे सांगायचे आहे ते निवेदनाच्या ओघात लेखिका सहजतेने सांगते त्यामुळे भाष्य करताना चांगला लेखक अभिव्यक्तीचे भान कसे राखतो ते सहजतेने लक्षात येते. आपल्या मुलाच्या संदर्भात विचार करताना डोमाला वाटते, मुलगा शिकून खूप मोठा व्हावा म्हणून मुलाला शाळेत घातला पण मुलगा तर चोरी करायला शिकला. हे चोरी करायला लावणारे कोणते शिक्षण? (पृ.127) या एकूण भाष्यातील मथितार्थ महत्त्वाचा आहे. आज

आपण जे शिक्षण देतो ते विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यास उपयुक्त ठरत आहे का? हा तो मुद्दा आहे. एकूणच आजची आपली शिक्षणपद्धती कशी पाहिजे याबद्दल सूचकपणे लेखिका आपणाला सूचवताना दिसते. 'साखरफेरा' या कादंबरीतून लेखकांने एक स्वप्नाच्या आधारे कादंबरीच्या विषयावर भाष्य करण्याचा खूप चांगला प्रयत्न केला आहे. खरंतर हे पांढऱ्या उंदरांच स्वप्न कादंबरीत दोन-तीन कडे आले आहे परंतु कादंबरीच्या शेवटी ते येते तेव्हा ते एकूण साखर उत्पादन शेतकऱ्यांच्या परिस्थितीवरील भाष्य म्हणूनच येते. स्वप्नातील अंधारात व त्या अंधारातील खोल खोल विहिरीत किशा बुडतो.... ऊस पिकवणाऱ्या शेतकऱ्याचा पाय कर्जाच्या आणि समस्यांच्या डोहात किती खोल बुडालाय याचे हे प्रतीक. तिथे ही पांढरे उंदीर आहेत. हे पांढरे उंदीर साखर कायखान्याचे वा साखर उत्पादनाचे प्रतीक आहेत. ते त्याची घोंगडी ओढू लागतात. शेतकऱ्याचे सर्वस्व हिरावून घेणाऱ्या या व्यवस्थेवरील हे भाष्य आहे. किशानं काठी हातात घेणं हे कारखानदारांविरूद्ध संघर्षाची सुरूवात आहे. 'अडला हरी गाढवाचे पाय धरी' या म्हणीचे एक मजेदार विश्लेषण कादंबरीत आगोदर आले आहे हे राजकीय किंवा सत्ताधाऱ्यांवरील भाष्य आहे. ते गाढव इथेही स्वप्नात ही येते. त्या गाढवाच्या पाठीवर तो काठी मारतो आणि त्यामुळे पाऊस पडू लागतो. सत्ताधाऱ्यांना रट्टा मिळाला की ते काहीतरी देतात हे लेखकाने सूचकतेने यातून मांडले आहे. पावसात घोंगडे पूर्ण भिजू लागते तेव्हा उंदीर त्याला सोडून पळतात. किशा घोंगडे झाडतो तेव्हा त्या घोंगड्याला उंदरांनी जागोजागी भोकं पाडली होती. सहकार क्षेत्राला या सहकार क्षेत्रात घुसलेल्या भ्रष्ट व्यवस्थेने कसे पोखरून टाकले आहे हे लेखक यातून सूचवताना दिसतो. पाऊस जातो आणि उंदीर पुन्हा बिळातून बाहेर येतात व किशावर चाल करून येतात. सरकारचे दुर्लक्ष झाले की या भ्रष्ट व्यवस्था आपला पंजा पुन्हा कसा वर काढतात याचे हे उदाहरण. तेव्हा किशा विळा घेऊन त्यांच्या अंगावर धावून जातो. त्याच्या विळ्याची धार चकाकते तेव्हा मात्र सर्व उंदीर घाबरतात. विळ्याची धार ही शेतकऱ्यांच्या एकतेचेचे आणि संघर्षाचे प्रतीक आहे. शेतकऱ्यांचे हक्क, अधिकार व त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळायचा असेल तर त्यांना आपले उग्र रूप या व्यवस्थेला दाखवावे लागेल हा जो संदेश लेखक देत आहे तो खूप महत्त्वाचा आहे. एकूणच रुपकात्मक पद्धतीने लेखकांने हे भाष्य केले असल्यामुळे ते अधिक सौंदर्यपूर्ण झाले आहे. म्हणजे लेखकाची नेमकी अभिव्यक्ती त्याचे भाष्य अधिक सुंदर बनविते हे या उदाहरणावरून लक्षात येते. 'चाळेगत' कादंबरीतून एकूण परिस्थितीवर लेखकांने अनेकवेळा भाष्य केल्याचे दिसते ते ही लक्षात घेण्यासारखे आहे.

खूप अगोदर इथे काहीच नव्हतं… फक्त डोंगर दऱ्या होत्या मग माणसं आली…आणि मग समाज निर्माण झाला श्रमविभाणी झाली. नीति-नियम तयार झाले. जो उंच घरात राहतो म्हणजे ज्याच्याकडे सत्ता आहे त्याची मर्जी चालू लागली.

"सुरुवातीला कुणालाच आजच्यासारखे लवचीक शेपूट नव्हते, हे विशेष. आणि फारच थोड्यांना अणकुचीदार सुळे आणि नख्या होत्या" [69] या उपरोधिक वाक्यातून लेखक जे भाष्य करतो ते महत्त्वाचे आहे. आज आपणाली लवचीक शेपूट सत्तेसमोर हलताना दिसते. आपणाला आपला स्वार्थ दिसतो तशी आपण शेपूट हलवतो. परंतु अगोदरच्या काळी असा लाळघोटेपणा करणारी माणसे नव्हती. आणि फार थोड्यांना अणकुचीदार सुळे आणि नख्या होत्या हे सांगताना आजच्या वाढलेल्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर लेखकांने नेमके बोट ठेवले आहे. एकूणच आजच्या परिस्थिती संदर्भात लेखकाचे भाष्य महत्त्वाचे आहे. तसेच हे भाष्य मांडण्यासाठी लेखकांने वाक्यरचनाही वैशिष्ट्यपूर्ण केली आहे. सरळ न सांगता वाक्याची काहिशी मोडतोड केल्याची दिसते. अनेकांना त्या काळी अणकुचीदार सुळे आणि नख्या नव्हत्या हे सांगण्याऐवजी फार थोड्यांना होत्या हे सांगत आज ही प्रवृत्ती वाढत आहे हे नेमके परिणामकारक पद्धतीने सांगितले आहे.

पृ.४८ वर डायरी लिहिण्याच्या बहाण्याने आपले मनोगत व्यक्त करताना लेखक म्हणतो, लोक आपला गाव, देश सोडून कुठे कुठे जातात. आपली नोकरीची निश्चिती नाही, पगाराची नाही. कोणतेच भविष्य समोर दिसत नाही तरी आपण हा प्रदेश सोडून का जात नाही? या सर्वातून या प्रदेशाशी, या भूमिशी आणि या लोकांशी लेखक किती जोडलेला आहे हे लक्षात येते व तो लिहितो आहे ते देखील लोकांच्या कळवळ्यातून लिहीत आहे हे देखील लक्षात येते. व हे लिहिण्यासाठी तो डायरी हा फॉर्म वापरतो हेही लक्षात घेतले पाहिजे कोणताही आशय कोणत्याही प्रकारे व्यक्त करता येत नाही त्यासाठी अभिव्यक्ती देखील नेमकी असावी लागते हे या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामुळे लेखक भाष्य करतो तेव्हा त्याला जे सांगायचे आहे त्या अनुरूप अभिव्यक्तीच्या फॉर्मची निवड करीत असतो ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

याच कादंबरीत बदललेल्या कोकणच्या मानसिकतेवर भाष्य करताना लेखक म्हणतो, फणसाच्या एका झाडासाठी कोर्ट कचेऱ्या खेळणारा माणूस आज एक घाव दोन तुकडे हे तत्त्व स्वीकारीत आहे. माडाचं पडलेलं चुडत कोणाला उचलायला न देणारा आज आपली दारे सताड उघडी करून मोठमोठ्या उद्योगांचे स्वागत करण्यास सिद्ध होतो आहे. लेखकाला आज सर्वत्र हिंसाचार, स्वार्थ, धर्मवेड, दहशत याचेच वारे कोंकणात वाहताना दिसते. इथला माणूस आजपर्यंत मोठा झाला तो इथून बाहेर गेल्यावर. येथील प्रदेश संथच होता परंतु

आज तो उन्मादी झाला आहे. देवाची प्रसादपाकळी घेऊन सगळे करणारा पापभिरू कोंकणी माणूस आज देवाला कौल काय दे, हे सांगू लागला आहे. एकूणच या बदलत्या परिस्थितीबद्दलचे लेखकाचे भाष्य आपणाला अस्वस्थ करणारे आहे. आज आपल्या प्राथमिकतेच्या गोष्टी काय होत आहेत यावर लेखकांने केलेले भाष्य(पृ.275) फार महत्त्वाचे आहे. लेखकाचा चुलत भाऊ शेतीतील प्रश्नांने आत्महत्येच्या टोकाला येऊन पोहचला आहे परंतु लेखकाला तो विषय महत्त्वाचा वाटत नाही तर कोण तरी आनंद कांबळे कोणाच्या तरी व्यासपीठावर जाणार म्हणून त्याचे निषेधात्मक पत्र प्रसिद्ध करणे जास्त महत्त्वाचे वाटते. म्हणजे आपल्या जगण्याच्या केंद्रस्थानी ज्या दुय्यम गोष्टी आहेत त्या येत असून मूळ प्रश्न बाजूलाच पडत आहेत. या ठिकाणी लेखक जो प्रश्न निर्माण करतो तो खूप महत्त्वाचा आहे.

महत्त्वाचं काय असतं? लिहीणं की जगणं?

पण कोणाचे जगणं? कोणाविषयी लिहिणं?

हे प्रश्न एकूण आजच्या लेखन करणाऱ्या लेखकाच्या नैतिकतेशी संबंधित आहेत असे म्हणता येते. आपण आज हळूहळू मुर्दाड होत चाललोय हे लेखकाचे निरीक्षण सर्वांनाच अस्वस्थ करणारे आहे. आपली आज संघर्ष करण्याची शक्ती देखील क्षीण झाली आहे. एकूणच आपल्या आजच्या वर्तमानाविषयी लेखक भाष्य करीत आहे त्याचा मुळापासून विचार करण्याची गरज आहे. आपल्या आवतीभोवतीच्या भयानक वास्तवाची आपणाला जाणीव देणे आणि आपण कुठे चाललोय याची कल्पना देणे हा ही कादंबरी लिहिण्यामागील लेखकाचा उद्देश असल्याने, लेखाची या कादंबरीतील सर्व भाष्ये याच अनुषंगाने आलेली आहेत असे आपण म्हणू शकतो. लेखकाने हे सर्व भाष्य पक्त निवेदनाच्या माध्यमातून केलेले नाही कधी निवेदन, कधी संवाद, कधी डायरी सदृश्य रचना असे वेगवेगळे प्रयोग केले आहेत त्यामधून लेखक आपल्या अभिव्यक्ती संदर्भात किती जागृत आहे याची आपणाला कल्पना आहे.

'तणकट' ही कादंबरी जातीय संघर्षावर आधारित असल्याने त्यावर लेखकांने प्रसंगानुरूप भाष्य केलेले असणे साहजिकच आहे. अर्थात हे चिंतन अनेक वेळा कादंबरीतील मुख्य पात्र कबीर याच्या किंवा इतर काही पात्रांच्या माध्यमातून झाले आहे या पात्रांच्या तोंडून लेखक भाष्य करताना दिसतो. म्हारवाड्यातील तथाकथित पुढारी आणि त्यांना साथ देण्यासाठी तालुक्यातून आलेले तथाकथित दलित पुढारी हे गावाविरूद्ध जो संघर्ष करायला सांगतात तो मुळत कबीरला कळत नाही. गावावर बहिष्कार घालून, त्यांच्याकडे कामाला न जाऊन, गावाचे काही नुकसान होणार नाही पण त्याचा खूप वाईट परिणाम म्हारवाड्यावर होणार आहे याची कल्पना

कबीरला आहे. गावावर बहिष्कार घातल्यास म्हारवाड्यात अनेकांच्या घरात चुली पेटणार नाहीत परंतु याची जाण या तथाकथित पुढाऱ्यांना नाही. ते कबीरला लढ्यात सामील होण्यास सांगतात. परंतु हा लढाच चुकीचा आहे हे तो त्यांना सांगण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याला दीड शहाणा ठरवून तख्त्यातून जवळ जवळ बाहेर काढले जाते. एकूण दलितांना समंजस नेतृत्व नको आहे व खरे प्रश्न सुटण्यापेक्षा मिरवायचे जास्त आहे. हा संदेश या सर्वातून जातो ते एका अर्थाने लेखकाचे भाष्यच आहे. बाहेरचे फितवतात आणि म्हारवाड्यातले जाणते देखील फितवले जातात याचे कबीरला दुःख होते. स्वतःच्या बुद्धीने विचार करण्याची शक्ती म्हारवाड्याला अजून आलेली नाही म्हणून दुसऱ्यांच्या सांगणीने ते वागतात याचे कबीरला वाईट वाटते. त्यांना कबीरचे कोणतेच म्हणणे पटत नाही कारण बाळा शेडबाळे हे सर्व आपल्यासठी का करतोय? त्याचा यामागे काय हेतू असेल? याचा ते साधा विचारही करीत नाहीत. त्यांना विचार करायला सांगणारा कबीर आपल्यातील असूनही परका वाटतो. एकूणच दलित मानसिकतेबद्दल लेखक या ठिकाणी सूचक भाष्य करताना दिसतो. बौद्ध धर्म स्वीकारला म्हणून मानसिकता बदलते का? याबद्दल कबीरच्या मनात येणाऱ्या विचारांच्या अंगाने लेखकंने केलेले भाष्य महत्त्वाचे आहे. नुसता धर्म बदलून काही होणार नाही. वैचारिक परिवर्तनासाठी मानसिक परिवर्तन तेवढेच महत्त्वाचे आहे. हा लेखकचा विचार महत्त्वाचा आहे. बौद्धधर्म स्वीकारून अगोदर केल्या जात होत्या त्या सगळ्या गोष्टी तशाच चालू राहणार असतील तर, नुसते धर्मपरिवर्तन करून काहीच साधले जाणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मपरिवर्तनामागे एक निश्चित विचार होता. परंतु तो विचार आता संपला असून आता ते एक अवडंबर झाले आहे. हे सर्व लेखकांने ज्या सूचकपणे सांगितले आहे ते वाखाणण्याजोगे आहे. कादंबरीच्या शेवटी(पृ.238) कबीर आणि बल्लाळ यांच्यातील चर्चेत बल्लाळ जे सांगतो ते लेखकांने केलेले भाष्य आहे असे आपण निश्चितच म्हणू शकतो. म्हारवाड्याच्या अस्तित्त्वाबद्दल बोलताना तो म्हणतो,

“आणि मुद्दा उरतो तुझा म्हारवाडा वाचवण्याचा आणि वाचण्याचा. तो वाचेल. जुन्या पुराण्या परंपरेच्या भिंती मोडून सारे उखडून देऊन स्वतःच्या हिमतीवर तगेल. तगणे आणि नव्या रूपात तरारूण येणे हा तर आपल्या कृषी संस्कृतीचा अद्वितीय वारसा आहे. आणि म्हारवाडा मातीला जवळचा आहे. वास्तविक तुमच्या तमाम नेत्यांनी हेच पहिल्यांदा ध्यानात घ्यायला हवं होतं की हा देश खेड्यांचा आहे आणि म्हारवाड्याची सगळी मुळं खेड्यातल्या जमिनीत आहेत. तेच विसरले सगळे आणि बोलत राहिले. मध्यमवर्गीय ब्राम्हणी क्रांतीचे जाहीरनामे, मग घोषणा, मोर्चे, उपोषणं आणि वळवळ. चळवळ. सगळे शहरातल्या रस्त्यावर आणि वर्तमानपत्रातल्या कागदावर. त्यांचा कधी संबंधच आला नाही तुझ्या म्हारवाड्याशी. वास्तविक ते इथलेच. पण

शहरात पडले. कवितातून रडले. मग त्यांचेही मध्यमवर्गीय होणे अटळ होते. ते त्यांना लाभलेल्या गतीने होत गेले. आणि मगच झाला तुझ्या या नव्या दुःखाचा जन्म!”[70] एकूणच आजची म्हारवाड्याची ही अशी स्थिती होण्यामागील कारण काय, याच्यावरील हे लेखकाचे कादंबरीच्या शेवटी येणारे भाष्य आहे. लेखक म्हारवाड्याच्या आजच्या स्थितीची नेमकी कारणमिमांसा करतो व भविष्यात काय करावे लागेल हे देखील सांगताना दिसतो. अनेकवेळा लेखक कादंबरीतील पात्राच्या मुखातून बेलतो पण हा बोलणारा लेखक आहे हे वाचकाच्या लक्षात येते त्यामुळे ही सूचकता अभिव्यक्तीतून व्यक्त करणे याकडे लेखकाचे भाषिक कौशल्य म्हणून बघितले पाहिजे. लेखकाचे भाष्य आणि ते व्यक्त करण्यासाठी अभिव्यक्तीचा केलेला वापर यातील संबंध या सर्वातून आपल्या नेमकेपणाने लक्षात येतो.

‘बारोमास’ कादंबरीतून महत्त्वाच्या काही पात्रांच्या चिंतनातून किंवा संवादातून लेखकांने आपले जीवनविषयक भाष्य केले आहे. नानू आजाच्या अन्नत्यागातून लेखकांनी हायब्रीड उत्पादने व त्यांची उपयुक्तता यावर भाष्य केले आहे. नानू आजा हायब्रीड खाण्याऐवजी मरण पत्करतो हे अत्यंत सूचक आहे. कदाचित पुढील पिढीला हायब्रीड खाल्याने मरण पत्करावे लागण्याची शक्यता आहे. मूळात हे धान्य कसदार आहे का? हा नानू आजाचा प्रश्न खूप महत्त्वाचा आहे आणि निसत्त्व अन्न खाऊन तुमची संतानही तशीच होईल. हे त्याचे वाक्य तर सर्वांनीच विचार करावा असे आहे. आजच्या शिक्षणांने आजच्या तरूणाचा भ्रमनिरास केला आहे हे लेखक एकनाथच्या चिंतनातून आपणाला सांगताना दिसतो. कारण कितीही चांगलं शिक्षण घेतलं तरी ते शिक्षण आज नोकरी देण्यास उपयुक्त ठरत नाही. उलट आजचे शिक्षण त्याला बिनकामाचे करते. एकनाथचा भाचा राजू हेच सांगताना दिसतो. व म्हणूनच आपण शिक्षण सोडल्याचे सांगतो. कादंबरीत अनेक सुशिक्षित बेकार नोकरी नसल्याने अत्यंत हलक्या स्वरूपाची कामे करताना दिसतात. वशिला आणि भ्रष्टाचार या गोष्टींनी आजची सर्व व्यवस्थाच नासवून टाकल्याचे दिसते. शेती का परवडत नाही या बद्दलचे भाष्य लेखक तेजराव खापके या पात्राच्या तोंडून करताना दिसतो. निसर्ग, व्यापारी आणि सरकारचे निर्यात विषयक धोरण हे सगळे शेतकऱ्यांच्या विनाशास कसे कारणीभूत आहे, आज शेती करणे म्हणजे आतबट्ट्याचा व्यवहार कसा झाला आहे हे लेखकाने या कादंबरीत वेगवेगळ्या संदर्भात अनेकवेळा अधोरेखित केले आहे. एकूणच या सर्वामधून शेतकऱ्यांची असाह्य अवस्था मांडून त्याच्या एकूण जगण्यावर लेखकांने केलेले जळजळीत भाष्य म्हणजे ही कादंबरी आहे असे निश्चित म्हणता येते.

या देशातील चळवळी आणि संघटना याबद्दल ‘चिखलवाटा’ या कादंबरीतून लेखकांने केलेले भाष्य महत्त्वाचे आहे. या बद्दल भाष्य करताना लेखक म्हणतो, “या देशातील चळवळी आणि संघटनांना कुणाचातरी शाप फिप असावा बहुतेक. कारण संघटना किवा चळवळ मजबूत झाल्या, तिला लोकाश्रय मिळाला की, त्यांच्या नेत्यांना सत्ताप्राप्तीची गुलाबी स्वप्न पडू लागतात आणि सत्ता काबीज करायचं म्हणलं की, राजकारण नावाच्या चिखलवाटेवर उतरावंच लागतं. अशा संघटना जेव्हा सत्ताप्राप्तीच्या नादाला लागतात तेव्हा त्याच्या मूळ उद्देशाचाच हैदोस धुल्ला होतो.” [71] एकूण शेतकरी चळवळीवर लेखकांने केलेले हे खूप मोठे भाष्य आहे. शेतकरी चळवळ ही सर्व शेतकऱ्यांना आपला आधार वाटत होती. शेतकऱ्यांचे प्रश्न शेतकरी संघटना सोडवेल हा विश्वास शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झाला होता. पण शेतकरी संघटनेला सत्तेची स्वप्ने पडू लागली आणि संघटना रसातळाला गेली. हाच संदर्भ घेऊन लेखकांने हे आपले भाष्य केले आहे. (पृ.145) वर व्यंकट या पात्राच्या माध्यमातून लेखकांने खेडे आणि शहर या ठिकाणच्या मानसिकतेवर केलेले भाष्य महत्त्वाचे आहे. खेड्यातील मानसिकता ही सामुहिक असते त्यामुळे माणूस आपल्यापेक्षा दुसऱ्याचा विचार अगोदर करतो. शहरात मात्र माणूस दुसऱ्यापेक्षा स्वतःचा विचार अगोदर करतो त्यामुळे शहरात माणूस राहिला की त्याला वैयक्तिक सुख महत्त्वाची वाटू लागतात व गावातील लोकांचा विचारही त्याच्या मनात येत नाही. अर्थात शहरात रहायचे म्हणजे त्या परिसराप्रमाणे व इतर चार-चौघे राहतात तसे राहणे भागच असते. लेखकांने हे भाष्य करता संयमाने केले आहे.

‘अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट’ या कादंबरीत जागतिकीकरणांने माणसाच्या विचारांमध्ये कशाप्रकारचे परिवर्तन आणले आहे यावर लेखकांने केलेले भाष्य महत्त्वाचे आहे. बँकेचे लोक कर्ज किती आहे हे सांगून गेल्यावर विलासच्या मनात प्रश्न येतो, आपण उगाच भावाच्या संसाराचं जोखड खांद्यावर घेतलं आहे. आपल्या जमिनीच्या वाटण्या झाल्या आहेत. बँका त्याची जमीन विकून आपली वसुली करील. भावामुळे आपणाला गावात लाचारीने वागावे लागत आहे. विश्वासला वाटते, आपली मध्यमवर्गीय सुरक्षितणा अत्यंत तकलादू आहे. उद्या वडिलांची नोकरी गेल्यास मला रस्त्यावर येण्यास वेळ लागणार नाही. आजचे जग एवढे व्यवहारिक झाले आहे की उद्या शहरात जाऊन आपल्या व्यापात बुडल्यानंतर गावात आपल्या बहिणी कशा जगत आहेत, हा विचारही कदाचित आपल्या मनात येणार नाही. आणि जागतिकीकारण म्हणतात ते हेच! माणसाला माणसापासून तोडून त्याचे वस्तूकारण करून त्याचे विक्री मूल्य ठरविणारी व्यवस्था म्हणजे जागतिकीकारण. लेखकांने केलेले हे आजच्या व्यवस्थे संबंधीचे भाष्य अत्यंत महत्त्वाचे आहे. या ठिकाणी देखील लेखक पात्रांच्या

माध्यमातून आपले भाष्य करीत असला तरी ते लेखकाचे भाष्य आहे हे आपल्या लक्षात येते या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे पात्रांचे सगळेच विचार आपणाला लेखकाचे भाष्य वाटत नाहीत याचा अर्थच आपले भाष्य करीत असताना लेखक जो भाषिक आविष्कार करतो तो इतर लेखनापेक्षा वेगळा असतो हे लक्षात घेतले पाहिजे. लेखकाचे भाष्य आणि ते व्यक्त होतानाची  शाब्दिक अभिव्यक्ती यात एक आंतरिक संदर्भ असतो आणि म्हणूनच सेखकाने केलेल्या भाष्याचा अभ्यास अभिव्यक्तीच्या अंगानेही करावा लागतो हे आपल्या लक्षात येते.

काही कादंबऱ्यांची उदाहरणे घेऊन अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर मराठी कादंबऱ्यांमधून लेखकाचे भाष्य कशाप्रकारचे व्यक्त झाले आहे. याची आपणाला कल्पना येते. जीवनविषयक चिंतनाचा मुद्दा तिसऱ्या प्रकरणांत विस्ताराने आला आहे म्हणून हा मुद्दा फक्त काही उदाहरणांच्या माध्यमांच्या माध्यमातून लेखकांनी केलेल्या भाष्याचे स्वरूप लक्षात यावे एवढ्या संदर्भातच घेतला आहे. काहीकडे उदाहरणांची पुनरावृत्ती झाली आहे. परंतु लेखकाच्या भाष्याचे स्वरूप लक्षात यावे म्हणून पुनरुक्तीचा दोष पत्करून देखील अगोदर घेतलेलीच काही उदाहरणे पुन्हा घेतली आहेत.   एकूणच कादंबरीच्या रचनेत लेखकांने केलेले भाष्य महत्त्वाचे असते व त्यामधून लेखकाचा कादंबरी लिहिण्यामागची भूमिका देखील स्पष्ट होत असते. म्हणूनच कादंबरीतील भाष्य या घटकाचे महत्त्व सर्वच अभ्यासक विशेषत्वाने उल्लेख करताना दिसतात.

### 4.3.5 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणारे बोलीभाषांचे विविध विशेष

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा सर्वात मोठा विशेष म्हणजे त्यामधून केलेला बोली भाषेचा वापर. अभ्यासाठी निवडलेल्या कादंबऱ्या महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील देखील मराठी प्रदेशातील असल्यामुळे अनेक बोलींचा वापर या साहित्यातून झालेला दिसतो. त्यामुळे बोली भाषेतील गोडवा आणि बोलीतील वैशिष्ट्यपूर्णता या सर्वातून अनुभवता येते. या कादंबऱ्यांतून आलेली काही वाक्ये, प्रतिमा, वैविध्यपूर्ण ग्रामीण शब्द, वैविध्यपूर्ण ग्रामीण नावे, म्हणी वाक्प्रचार, वैशिष्ट्यपूर्ण अशी बोलण्याची पद्धत या सर्वातून या बोलींचे विविध विशेष आपणाला अनुभवता येतात. खाली काही मुद्द्यांच्या आधारे हे विश्लेषण केले आहे.

#### 4.3.5.1 ग्रामीण परिसर अधोरेखित करणारी काही वाक्ये

काही अशाप्रकारची वाक्ये या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आली आहेत ज्यामधून या कादंबरीतील ग्रामीण परिसर, ग्रामीण अवकाश, किंवा ग्रामीण बोली यांचा आपणाला यथार्थपणे परिचय होतो.

अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आलेली अशी काही वाक्ये खाली दिली आहेत ज्या वाक्यातून ही ग्रामीणता ठळकपणे व्यक्त होताना दिसते.

असं जगणं तोलाचं:

हरबाची अवस्था पावसात भिजल्याल्या ढेकळासारखी झालेली. एकेक धपला आपोआपच गळून पडत चाललेला.

कापूसकाळः

म्हाताऱ्या गांडीला लुगड्याचं भ्या नसतंय

साखरफेराः

मंगलोरी कौलांची जुनी-नवी घरं बोळकांडाच्या वाटेवर दारं उघडून उजाडायची वाट पहात होती.

तणकटः

मग शेळी चारायबी त्येच्याच शेतात जाईत जा की रंऽऽ

जिनगानीः

बाईची जात आन कांद्याची पात सारखीच

बारोमासः

कावून मरत्या माणसाले खोटं बोलता बुहार बटक्यायहो?

हेच कर्जाचं बाळातपण करून राह्यलो नं!

चिखलवाटाः

शेतातल्या उंबराच्या मुळया काळजाच्या मातीत रुतत चाललेल्या, खोल.

गोड बोलून गाबण केलं मन की धाकल्यानं

ढुंगण धिव मनलं की आपुन धिवावं, लोंबतंय काय मनून इचारनी!”

ए थोबाड, जाळ लाव चुलीला. किती धूर केलीस?

एसे कुणबी भूपाळः

त्याला वापस येता येईनं का? त्यायच्या पायाऊन का मरीआईचा गाडा गेलाय का?

सगळा कापूस कोकडून गेला होता

हागणारानं तरी लाजावं नाहीतरी पाहणारानं तरी लाजावं

परदिस्याला चुंगडं चोरतानी काई वाटलं न्हाई का?

फुकटचोद्याचं घर कोठं त गावच्या खालतं

एसईझेडः

आपली जमीन हाय वारवरलांची त्यात कष्ट कर.

आपल्या कुनब्याचा अंगना मंजे उघरा घरचं.

अरे बाबा म्हशी फळाला टोणगा कुठाय गावात?

बुढाईः

आपला हुन्नेर लोकईले येते काय?

बाईलेच बाईचं दुखू कळते बयना.

मी आपली मजाकबाजी करून ऱ्हायली व्हती.

आमच्या इकळे पोरीले हुंडा भेटते राजेहो!

अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्टः

मेलेल्या कुत्र्यांची पोटं फुगून हळूहळू ती जीवघेणी दुर्गंधी सर्वत्र पसरत जावी तशा काही अफवा वाऱ्यासोबत घरापर्यंत पोहोचल्या.

वरील सर्व वाक्यातून ग्रामीण परिसर, तेथील वातावरण व त्या ठिकाणची वैशिष्ट्यपूर्ण भाषा या सगळ्याची जाणीव आपणाला होते. ग्रामीण परिसर आणि ग्रामीण भाषा यांची जी काही वैशिष्ट्ये सांगितली जातात त्यांचा परिचय आपणाला या सर्व वाक्यातून होतो.

**4.3.5.2 ग्रामीण प्रतिमांचा वापर केलेली वाक्ये**

वाक्यात जेव्हा प्रतिमांचा वापर केला जातो तेव्हा त्या वाक्य अधिक अर्थपूर्ण होते, त्यात सूचकता येते असे लेखन अधिक वाचनीय देखील होते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील अशी काही वाक्ये खाली दिली आहेत जेणेकरून या कादंबऱ्यांतून अशाप्रकारच्या वाक्यांचा वापर कसा केला आहे हे लक्षात येते. यातील नोंद घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे यात ज्या प्रतिमा वापरण्यात आल्या आहेत त्यातील बहुतेक प्रतिमा या ग्रामीण परिसर व ग्रामीण जीवन याच्याशी संबंधित आहेत.

कापूसकाळ

चला आपुनबी एखाद्या घोळक्यात बसुयात. मौतीला गेल्यावर कवटी फुटूस्तोवर बसावं लागतं तसे.

साखरफेरा

पेटलेल्या उसाचा वणवा विझून गारढोण झाला

मग रेड्याच्या अंडावाणी गुळगुळीत करतो बग दाढी.

समोरच्या गर्दीत वाऱ्यानं पिंपळाची पानं फडफडावीत तशा टाळ्या पडल्या.

चिखलवाटाः

एवढ्या लांब कशाला आलात, आबा?" न राहवून व्यंकटनं विचारलं. क्षणभर त्याला म्हातारा वडासारखा वाटला. आयुष्यभर स्वतः उन्हात राहून प्रवाशांना सावली देणाऱ्या वडासारखा!"

पाडाः

चांगदेव बसून राहाला मरेल ढोरावानी.

ऐसे कुणबी भूपाळः

नवख्या कुत्र्यावर गल्लीतल्या कुत्र्यांनी भुंकावं तसे, सगळेच गडी सोपान्यावर तुटून पडले.

गंगू सापाच्या तावडीत सापडलेल्या उंदरासारखी चिरीचिरी चिरकत होती.

सोपान्या निघाला कोंडवाड्यातून सुटलेल्या ढोरासारखा.

म्हैशीला पाण्याबाहेर काढल्यासारखं तिला बळोबळी घराबाहेर काडलं.

मेल्या जनावराला कुत्र्यांनी तोडून तोडून खावं तसे या तिघांनी घर तोडून खाल्लं.

एसईझेड

बापासचे शब्द त्याच्या कानाला गांधील माशीसारखे डसत होते.

बोडखीः

भगताने हबका मारल्यावर झाडाने झाडनी द्यावी, तशी भीतीने डोम्याने झाडणी दिली.

मातीतून वादळामुळे उन्मळून पडलेल्या झाडासारखा तो मनातून उन्मळून पडला होता.

तरीही वासरानं ठुशी मारावी तशी त्याची गावची आठवण त्याला ठुशी मारायची.

गावठाणः

ऊन झेंडू फुटल्यागत लागतच हुतं.

सासऱ्याला मी गाठलं सासरा वळवाच्या ढगागत निघाला हुता.

गाजराच्या बुडक्यागत सखी हुती. नाकाचा शेंडा बी राघवागत. अंगापिंडानं भरल्याली सखी वल्या मानग्यागत दिसत हुती.

साऊबाच्या रानातला साप आठवला नि अंगावर रानकारल्यागत काटा हुबा ऱ्हायिला.

डोसकं मातीच्या घागरीगत उकलाय लागलंय.

दावणीच्या ढोरांगत सगळ्या साऱ्या एका रांगंत पडल्या.

मी तुळीला दिल्याल्या खांबागत हुबी हुतो.

### 4.3.5.3 शिव्यांचा वा अश्लील शब्दांचा लेखनातील वापर

शिव्यांचा लेखनातील वापर हे ग्रामीण साहित्याचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. साहित्याचा जो मध्यवर्ती प्रवाह असतो त्यात शिव्या किंवा अश्लील शब्दांचा वापर हा निषिद्ध समजला जातो परंतु ग्रामीण किंवा दलित साहित्यात अशाप्रकारच्या शब्दांचा वापर हा सहजपणे होताना दिसतो. याचे कारण म्हणजे नित्याच्या बोलण्यात देखील ग्रामीण भागातून शिव्यांचा वापर सहजतेने होताना दिसतो. खालील काही उदाहरणांवरून हे सहज लक्षात येईल.

असं जगणं तोलाचः

हात्त त्येचं मडं बशिवलं न्हिऊन.

खाज्ज्याळीच्या! नगं व्हतं तर हितपातोर आलासच कशाला रे?

हिच्या बायला न्हिऊन ह्या मास्तरड्याच्या.

साखरफेराः

दराच्या आईला गाढाव लावा

चाळेगतः

झव्ऽऽला मळेवाडीक् गेला फुकट्

हे काय मायझयें सांगतले पाणीच कमी म्हणान्?

तणकटः

भाड्याऽऽ म्हार त्यो म्हार आनी बोलतोय बघ तालेवार

बोल की भोसडीच्या आता का त्वांड शिवलं?

कुणाचा रं सुक्काळीच्या? गांडीची हाडं मोडीन.

काऽऽ रं भाड्याऽऽ तिनं काय केलंय म्हणून मारालास?

कच्च्या रांडंच्या दम आसला तर या गा फुडं.

ऐसे कुणबी भूपाळः

मायचा भोसडा हिच्या, हिनं तं महारमचळा लावलाय की रे.

मायझी, थूतरतोंडी मला इचारायली

‘कव्हबी झऊ दे न्हाई तर शेळया निवड’, जमत नसतय.

त्याला गांड धुवायची तरी कळती का?

आन त्ये ढोरं कोण्या मायझ्यानं संभाळायचे?

तुव्हा का लौडा दुखावलाय.

रताळया मायझ्या, कुडमीच्याला आकलीच्या मायचा त पत्ता न्हाई.

व्हय गं रांडं, तू त मनं लय लोकायला उरावर घ्यालीस

तू नं तुव्ह मथारं गाढवाच्या गांडीत जा.

एसईझेडः

हल्ली शिक्षण गेला भोसड्यात.

खपं त्याला डोफं आन झव त्याला शागोती.

गावठाणः

झवण्यास्नीजाळीतच पालथी पाडून मारून टाकायचीत.

गावाच्याबी आईला भंगी लावला नाही तर इचार.

रांड, रडून रडून घर भिजिवलंस.

**4.3.5.4 वाक्प्रचार व म्हणी यांचा लेखनातील वापर**

कादंबरीच्या भाषिक अभ्यासात लेखकाने आपल्या लेखनांत म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर किती परिणामकारक केला आहे हे खूप महत्त्वाचे असते. ग्रामीण कादंबरीचा विचार करता त्या त्या स्थानिक प्रदेशाच्या बोलीतील अनेक म्हणी व वाक्प्रचार यांचा वापर लेखक आपल्या लेखनांत करताना दिसतो. या वापरामुळे लेखनांला संमृद्धता तर प्राप्त होतेच पण त्याच बरोबर त्या प्रदेशातील भाषिक वैशिष्ट्ये देखील अभ्यासता येतात. खालील काही वाक्प्रचार म्हणी यांचा वापर लेखकांनी कसा केला आहे त्यातील काही निवडक या ठिकाणी दिले आहेत. याचा अभ्यास केल्यास आपणाला या सर्वाचा या कादंबऱ्यांतून कसा वापर करण्यात आला आहे याची आपणाला कल्पना येऊ शकेल.

**4.3.5.4.1 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील काही निवडक वाक्प्रचार**

असं जगणं तोलाचः

पोट ताज करीत हिंडनं.

कापूसकाळः

रंजीस येणे

चाळेगतः

डिसमूड होणे

बारोमासः

इच्चकडोणा होणे

ऐसे कुणबी भूपाळः

मुतात दिवे जाळनं, तोंड खऊट होनं, शेपटीचा आकडा करनं, मिशीवर हरभरा पडू न देनं.

एसईझेडः

हिवाट घालणे.

बोडखीः

फुटाणे फोलणे, आकाबाईचा फेरा येणे.

गावठाणः

हारखून जाणे

**4.3.5.4.2 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील काही निवडक म्हणी**

असं जगणं तोलाचं

खायला काळ आन् भुईला भार.

कापूसकाळः

लईच मयाची आन् दगा देऊन जायची, येळ नां वखुद आन् खदाडा मागं जोगा, सुगरण साताच्या आन् हिरव्या दाताच्या, कामाच्या कसू आण नकट्या पोऱ्हाच्या सासू, धनगराचं कुत्रं धड ना मेंढ्यांपाशी ना लेंड्यांशी, जिता नही गोडी आन् मेल्यावर बंधन तोडी, पैसा ना आडका आन् रिकाम्या धडका, काम ना धाम आन् म्हणा हरिनाम,

कर्माच्या भेणं निघावं दुपारी आन् कर्म प्रातःकाळी जाऊन बस! चैत गळं आणि कुणबी पळं, येळाला केळं आण उपासाला सिताफळ.

माता पावली आन् दुनिया दावली. चटणी नेहरीला आन् दूध डेअरीला.

साखरफेराः

पदरचं खाऊन गावचं धुवायचं, मुंगीला मुताचा पूर,

'एका लुगड्यानं बाई म्हातारी हुतीया का?'

चाळेगतः

घराक् नाय धरती आणि ढेंगा झालीं वरती, गांडीत नाय दम आनी म्हंता मी मुकादम, मोठे कुले तेका जग भुले, करून करून भागलां नि देवपुजेक लागलां, आगासले ते मागासले आनी पाटसून इले ते गुरवार ऱ्हवलें,

ऐसे कुणबी भूपाळः

आंदळयाचो हात फोद्यावर,

रांडाव लागली आहेवाच्या पायी, आन मह्यावानी कव्हा व्हसीन बाई, दायनीच्या जीवावर थोडंच कोणी गरवार राहातयं, उगीच चलनं कोठं आन बडविले भटं, कुडाचा पावला खन् आढ्याला लावला,

लाड लाखाचा करदोडा वाखाचा, सोभल तेच लेवावं आन पचल तेच खावावं, देव दमडीचा आन उद पैशाचा, नवसानं लेकरू झाले नि मुके घेऊ घेऊ मेलं

तणकटः

उठ ग कळी न बस पाठकोळी, म्हैशीनं मळलं नि हल्यानं गिळलं.

श्याना उटला आनी मापट्यात मुतला.

बारोमासः

च्यूत पाहून भूत लागते, इकडून तिकडून वारलं अन् मधीं मुसळ मारलं, दिसायले देखणी अन् कामाले पोकळ फुकणी, बारा वर्स तप केलंन् गाढवाशी पाक केलं? आयाबाया दाराशी अन् वायगोळा उराशी.

चिखलवाटाः

खिशात न्हाई कवडी आन् बांधीन मनतो म्हाडी, सोंग साऱ्याचं आन लगीन म्हाताऱ्याचं, मोडकं मुसळ उतरंडीला बी भारी, धनगराचं कुत्रं लेंढ्यांपाशी ना मेंढ्यांपाशी, जावई गोत न्हाई आन तिळाचा भात नाही, अस्वलाच्या बोच्यावर शेट्टाचा दुकाळ, गाढवाचा गोंधळ आन लाथाचा सुकाळ, म्हसीचे शिंग म्हसीला जड नसत्यात, घरात

न्हाई तीळ आन मिळीला देतो पीळ, देणं कुसळाचं, झवणं मुसळचं, सन ना वार वार, नकटीला बुधवार, हौसेनं केला पती त्याला फीटली रगतपिती आडान्यांच काम, आंगाला अला घाम.

गावठाणः

चोरून पोळी नि वरडून गुळणी, जवाचं घव तवाच्या पोळ्या

जिनगानीः

मजं मजं अन् कबाड वजं, चाल रं बैला चाल आन् कुंद्यावर माती घाल, घरचं झाले थोडं आन् इवायानं धाढलं घोडं.

एसईझेडः

गावभर गजर आणि नकटीला नाही पदर

बोडखीः

चालं चंभार सात साली खेट्टं इकता रात झाली, आवस भावाचा मावस भाऊ चाल कुत्र्या खीर खाऊ,

हिंडग्याले देली गाय अन् धावू धावू गोठनावर जाय, सासूला न्हाणते सुनेला न्हाणते; उरलं पाणी डोक्यावर घेते.

**4.3.5.5 ग्रामीण शब्द**:

भाषिक अभ्यास करीत असताना आणि त्यातही ग्रामीण साहित्यातील बोली भाषेच्या प्रभावाची चर्चा करीत असताना सर्वात जास्त चर्चा होते ती बोली भाषेतील जे शब्द या लेखनांत येतात त्या शब्दांची. यातील बहुतेक कादंबऱ्यांतून त्या त्या ठिकाणच्या बोलीतील ग्रामीण शब्द जे या कादंबरी लेखनातून आलेले आहेत. यातील अनेक शब्द हे ग्रामीण परिसर व त्या ठिकाणच्या कृषिकेंद्रीत जीवनव्यवस्थेशी जोडले असल्याचे दिसतात. काही कादंबऱ्यांतून आलेले शब्द या ठिकाणी नमुना म्हणून घेतले आहेत.

**'असं जगणं तोलाचं' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्दः**

भाईर(बाहेर), यिवून( येऊन), घियाचाय (घ्यायचा), दियाचा(द्यायचा), कुटं(कुठे), हित्तून(इथून), मंटलोंनाव(म्हटलं नाही), अंदारात(अंधारात), हुबारू(उभारू), थोट लोकांचे (खोट्या लोकांचे), कोट्याकडं(गोठ्याकडं), मातोर(मात्र), नेन्ता(अजाण), चेव येणे(जाग येणे), बघिटलं( बघितलं), संगाट(सोबत), बघिटला(बघितलं), सांगिटल्यालं( सांगितलेलं), सावतर माय(सावत्र आई), इळीनं(विळीने), बिरड्याला(दाव्याला), करणेसूर, ठेपा(माग), कार(त्रास), टाकचील (टाकशील), मोप(खूप), ढवाळजेवण (डोहाळे जेवण), पान लागणे (साप चावणे), वावदान(वादळ)

याच कादंबरीतील काही वैशिष्ट्यपूर्ण वेगळे असे ग्रामीण शब्द

बयनामा, भिरूड, गिरा, टक्कूर, आबराळून, झोले, झुंझुरक्या, ईद्रीढ्यान, आजुऱ्यावर

या कादंबरीतील ग्रामीण शब्दांची काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द रूपे

आलासल (आला असेल), काडलतो (काढलं होतं), ऱ्हाणाराय(रहाणार आहे), आलानी(आला नाही), झालनी(झाले नाही), करूनी(करूनये), बगतनी(बघत नाही), धिवलालता(धुवत होता), केलासेल(केलं असेल), बगायील(बघता येईल), मारलासतो(मारल्या असत्या), यिवलालं(येऊ लागलं),ठिवलाव(ठेवले आहेत), वाटलालतं(वाटत होतं)

'कापूसकाळ' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:

चलींतर, पाऱ्हा(प्रहर), वाढूळ, तुपल्या(तुझ्या), म्होरं(समोर), न्हेवावं(न्यावं), आजूक(अजून), मांघ(मागे), ठूई(ठेव), ठुय(ठेव), ठुला(ठेवला), त्येनल्हा(त्यांना), तव्हर(तोपर्यंत), नेह्याचे (न्यायचे), म्हयीत(माहीत), मथारी (म्हातारी), आग्रेव्ह(आग्रह), नेठम (नचूकता), ई (ये), शिकीतू(शिकवतो), गांधाडं (लातडं),

याच कादंबरीतल वैशिष्ट्यपूर्ण असे काही ग्रामीण शब्द: कम्हून (काय म्हणून), खपुल्डी (शेळी), धबाडगा(व्याप), पायताण(चप्पल),

**'साखरफेरा' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

बैदा (दैना), अबंड(आडदांड), घाटला(घातला)

**'चाळेगत' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

धुमशानां (धुडगूस), झालेहा (झाले आहे), भागातू(भागेल), झोळग्यां, गुडदावणे(मारणे), जमनीतसून (जमिनीतून), हेरशी(एरवी),

**'तणकट' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

मनगंड(श्रीमंत अशा अर्थाने), इदरनी, आलाव( आलो आहे), कावरादली (ओरडली), गुडारत, भगटायला (उजाडायला), धक्कल, पचेताप (पश्चात्ताप), वायलं (वेगळं), सायवळ, गारबांड, भिरंबाटलं, डोस्क्यात, कुटलं(कुठलं), आक्कू, वंगाळ,

**'बारोमास' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

काऊन(कशाला), सावडल्यावर(जाळल्यावर), सापल्डी (सापडले) भोयाकून(भोयाकडून), ठामेठोक, लवकांड, आवतन,

**‘चिखलवाटा’ या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

लालेत(लागलेत), होतनी (होत नाही), फायजे(पाहिजे), हिकात्या (कारणं), बेंदाड, लालाव(लागलात) ईराइत,

‘पाडा’ या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द

बशेल(बनेल), येतीत (येतील), पायझे(पाहिजे), तापड(तापट), नेभंत( नेमकं), घ्यून(घेऊन), मांघी(मागे), आशिन्त(असेल), बिनभुलाईत(बेसावध), कधंलोंग (कधीपर्यंत), गमवन्हार(गमावणार), अ-इचारानं(अविचाराने), शिकाड्याचं(शिकवायचं), किदरला(त्रासला या अर्थाने), लाताई(अरेरावी या अर्थाने), पडशीन(पडशील), नेंभन(नीटपणे), यखले(एकटे) न्यारा(वेगळा), रुखवता(रोखता), कायजी(काळजी), कुयझुन (कुसून), यखटे(एकटे), तधंलोंग (तोपर्यंत), कधंलोंग(कधीपर्यंत), येरमेराच्या(एकमेकाच्या), काहून(का म्हणून), किदरबाऱ्या, मायथी(माहिती),

**‘जिनगानी’ या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

व्हाटोळीनं(वावटळीनं),

**‘फाटलेलं आभाळ’ या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

सपय, बुड,

**‘ऐसे कुणबी भूपाळ’ या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

मोकार (मोकळी), रातंदिह्या (दिवसरात्र) एका पारगीचं (अर्धवेळ) नादर(चांगलं) हीव(ताप) शिस्टरीन (नर्स), आपनधपक्या (अचानक), खरमळायलंय(ढवळतय), हरसड, हाफकाडून (हडप करून) खुरखाड(गुराखी), घुसाटा(राग), दोनपारगी शाळा (दुबार शाळा) आताशीकतं (आत्ताच कुठे), ल्हाव ल्हाव (लवकर लवकर), गटमट(लगबग), कव्हरोक(कुठपर्यंत),

रगत(रक्त) मथारे (म्हातारे), डव्ह(डोह), हरणकाळजी (हरणाच्या काळजाची), वायलं(वेगळं), भुसकट, बंबूरा, इस्कोट, झडपणी,

याच कादंबरीतल कृषिसंदर्भातील काही शब्द:

रान, बैलं, पाळी, तिफणी, पेरणी, लागवण, इखण, औत, रुमणं,

**एसईझेड या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

म्होटा(मोठा), इहरीवर (विहिरीवर), नलांना (नळांना), पथ्याच (पत्ताच), छलणूक (छळणूक), शिरीमंती (श्रीमंती), सांबालून(सांभाळून), करनार(करणार), त्याचीकरं(त्याच्याकडे), कुरपा(कृपा), पन(पण),

राजकारनी(राजकारणी), डायवरला(ड्रायव्हरला), मारनारी(मारणारी), कसतूय(कसतोय), धारा(शेतसारा), हापिसात (ऑफिसात), कोंबऱ्या(कोंबड्या), कोलीन(कोळीण), चांदलाचा(तांदळाचा), पीरा(पीडा), कालजी(काळजी), भाऊस(भाऊ), जातय(जातो), सामन(सामान), यसदायी (यशदायी), कुळे(कुले), जित्राब, धरपर(धडपड), दुखारली(दुखावली), पर(पड), उचकाटन(उद्घाटन), आथा (आता), आलू(आलो), वशीक(पडिंग), लोलाचा(लोळायचं), काऱ्हली (काढली), अंता(आता), टाठा(टाटा), घेवाला(घ्यायला),

**'बोडखी' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

थोळंच (थोडच), वानोतेत (वाहवा करणे), पायली नायी (पाहिली नाही), भयताड, तुव(तुझं), वायला(वाहिला), नांदनारा, सापळत(सापडत), पालटतीन(पालटतील), पळले(पडले), एवळी(एवढी), दगळ(दगड), जोळून(जोडून), भयताळ,निऱ्हा (नुसती), मयने (महिने), लळू (रडू), कातळ(कातड), लुगळं(लुगडं), जोळा(जोडा), काहाडळं (काढलं), मंगयवारी (मंगळवारी), अटप(आटाप), तेवळं(तेवढं), रायलं(राहीलं), पिऊन(पिळून), आनाचं(आणायचं), कावा(काळा), ईकीन(विकीन), बायातपन(बाळंतपण), मयाचं(मायेचं), हिय्या(हृदय), मयावू(मायाळू), गोठ(गोष्ट), निऱ्हा(नुसत्या), हुल्या(उलट्या), थोळे थोळे (थोडे थोडे), सईन करा (सहन करा), शिक्सन(शिक्षण), वायना (वहणा), सावतर(सावत्र), दवून(दळून), पकळून(पकडून), झपली(झोपली), पवून(पळून), भेतो (भितो), धाळून(धाडून), पकळून (पकडून), झोळून(झोडून), गिटत(गिळत),

**'गावठाण' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

बयाजवार (व्यवस्थित), गुदस्ता(गेल्यावर्षी), हुता(होता), वकूत (वेळ), सांगिटलं(सांगितलं), बघिटलं (बघितलं), घेटला(घेतला), घाटली(घातली), हुबं(उभं), लाम(लांब), इळं(विळा), घेटलं(घेतलं), होती(हुती), उनाचं किरव (उन्हाची किरणं), हुंब्र्यावर(उंबऱ्यावर), भेस्तरवार(गुरूवार), वाढूळ(वेळ), सबागती, भगटायच्या (उजाडायच्या),

**'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' या कादंबरीतील काही ग्रामीण शब्द:**

इपरीत(विपरीत), धडूतं (कपडे),

यातील अनेक ग्रामीण शब्द हे प्रमाण भाषा बोलणाऱ्यांना अपरिचित असणारे असे आहेत तर काही शब्दांची रूपे त्या त्या प्रदेशातील बोली नुसार बदलताना दिसतात. प्रमाण भाषेसोबत या बोलीची तुलना केली असता. प्रमाण रूपापेक्षा ही शब्दरूपे वेगळी असल्याची दिसतात. व ही रूपे बोली-बोली नुसार बदलतात असेही दिसून येते. या ग्रामीण शब्दांच्या वापरामुळे या कादंबरीतील ग्रामीणता अधिक ठळक होत जाताना दिसते. किंबहूना

ग्रामीण बोलीचा व त्या बोलीतील विविध शब्दांचा लेखनात केलेला वापर किंवा कादंबरीच्या लेखनासाठी पुर्मतः बोलीचा केलेला वापर हे ग्रामीण कादंबरीचे वैशिष्य म्हणूनच सांगीतले जाते. गोमंतकीय लेखकांनी आपल्या लेखनात स्थानिक बोलीचा वापर केला नाही तो केला असता तर या कादंबऱ्यांच्या लेखनाला अजून जीवंतपणा आला असता.

**4.3.5.6 अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील काही ग्रामीण ढंगाची नावे**

ग्रामीण साहित्याचा अभ्यास करीत असताना त्या ठिकाणची माणसांची नावे देखील वैशिष्ट्यपूर्ण असल्याची दिसतात. काही नावेच नगर परंपरेपेक्षा पूर्णपणे वेगळी असल्याची दिसतात तर काही नावे ग्रामीण परंपरेत त्या नावांचा अपभ्रंश करून उच्चारली जात असल्याची दिसतात. अशाच अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून आलेल्या ग्रामीण ढंगांच्या नावांची या ठिकाणी देत आहे.

तणकट:

जानबा, सदबा, सुबऱ्या, गंगव्वा, गौत्या, तान्या, इटला, रात्र्या, तुळज्या, बाबू, भैरू, किसना, भरमू, तानूआजी, यल्लाप्पा, सत्याप्पा, भीम्या, सुली, वच्ची, नंदाप्पा, शिरप्या, पुतळा, गोंदा, तायव्वा, आक्कव्वा, यल्लू, आण्या.

बारोमास:

मनुबा, रोड्या,

पाडा:

दगडा

फाटलेलं आभाळ:

लखू, मांजीराम, कुसप्पा, इस्वास

ऐसे कुणबी भूपाळ**:**

विठ्या, नाऱ्या, शिव्या, सोपान्या, महादू, गंगू, इमी, बाल्या, चंद्री, सरुबाई, भागा, परस्या, समिंद्राई, जनी, बबन्या, बाबूशा, इलास्या,

एसईझेड

राधी, मनी, नथू अण्णा, नारू, बळी, किऱ्या, सजण्या, सभ्या.

बोडखी:

धुरपदी, गुंफा

**4.3.5.7 ग्रामीण ढंगाने बोलण्याची पद्धत**:

काहीकडे ग्रामीण भागातून भाषा बोलण्याची वेगवेगळी ढब दिसून येते. अभ्यासासाठी निवडलेल्या काही कादंबऱ्यांतून अशी वैशिष्ट्यपूर्ण ढब व्यक्त झाली आहे. अशाप्रकारची पुढील काही वाक्ये पाहण्यासारखी आहेत.

कापूसकाळ:

नाही बॉ .... शनिवारी दुपारून आण रविवारी इळभर येऊन बॉ.

नह्यंत नकूबॉ. परत तुमच्या माघं लागायला.

घरी येयाला सूर्या पुरला पाह्यजी.

मलात काय नकू बॉ.

शाळात गुरूजी मारतेत घरी राह्यलव.

आपली बी आय आशीच आता कुठं आसन कायनू.

तुमचच इथं काय उधारलं होत कुणास ठाऊक?

आम्ही ईकला बया कापूस. मालेगावला नेल्हता कापूस.

आडल्या वखताना कोण्हाची गाडी नही बया औषधाला बी.

आमचंबी नही झाले बया अझूक.

हरिनाम घेयाची घाई कण्हून करीत नहीत कायनू असे?

चिखलवाटा:

एकच लेक हाय तर आसं! दोन चार आसत्या तर कसं केलो आसतो की?

मोट्ठी नवकरी लागली असती तर भाईरच्या देशातून नवरी आनत होते काय की!

फिण फिण करत म्हातारा ढेळजंला जाऊन बसला फुगून.

भोंगळ्या बायाचा पिच्चर बघू लालता भाडखाऊ विडयोत.

पेरनी तरी करू देतंय का न्हाई की? का आसाच उरावर बसतोय मनावं?

कुठं निघालीस ए व्हैमाली, वर थुत्तर घिऊन?

**4.3.5.8 स्त्रियांचे पुरूषवाचक बोलणे**

काही ग्रामीण बोलींमधून स्त्रियांचे बोलणे देखील पुरूषवाचक असते हा त्या बोलीचा विशेष म्हणून सांगता येतो. अभ्यासासाठी निवडलेल्या दोन कादंबऱ्यांतून 'बुढाई' व 'गावठाण' अशप्रकारची वाक्ये आली आहेत.

बुढाई:

मी तर देतो तो घेतच नायी

मी आनतो त्याले वापस

मी तुले न्हानतो

गावठाण:

मी वाकळत पडलो हुतो.

मी काळ्या खडकावर ढोरं घेऊन गेलो

मी आडवी झालो

ग्रामीण साहित्यावर स्थानिक बोलीचा गडद प्रभाव असल्याचे दिसते. गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचा अपवाद वगळता बाकी सर्व लेखकांनी निवेदनासाठी प्रमाण व संवादांसाठी स्थानिक बोलीचा वापर केल्याचे दिसते. 'गावठाण' सारखी कादंबरी पूर्णपणे बोली भाषेतच लिहिली आहे. स्थानिक बोली ही तेथील परिसर, माणसे व तेथील कृषिकेंद्रीत व्यवस्था या सर्वांशी जोडली असल्याने ही ग्रामीण भाषा त्या कादंबरीला अधिक जीवंत व आशयसंपन्न बनवते यात कोणताच वाद नाही. नव्वदोत्तर कादंबरीत महारास्ट्राच्या विविध भागातील विविध बोलींची संमृद्ध रूपे आपणाला पहायला मिळतात व यामधूनच मराठी भाषेची संमृद्धता देखील आपल्या लक्षात येते.

### 4.3.6 समारोप

कादंबरीतील आशयाचे अंग महत्त्वाचे असले तरी अभिव्यक्ती देखील तेवढीच महत्त्वाची असते. आपणाला आशयापर्यंत घेऊन जाण्याचे काम अभिव्यक्ती करते हे विसरून चालणार नाही. जेव्हा आपण यशस्वी साहित्यकृतींचा विचार करतो तेव्हा त्यात आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंचाही उत्तम समन्वय साधलेला असतो असे दिसून येते. त्यामुळे कोणत्याही साहित्यकृतीचा विचार करीत असताना आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही अंगांनी करणे आवश्यक असते. साहित्याच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना साहित्यात निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य ही चार महत्त्वाची अंगे असतात. या चार अंगांच्या आधारे लेखन मनातील आशयाला अभिव्यक्त करीत असतो किंवा आशयाची मांडणी करीत असतो असे म्हणता येते. अभ्यासासाठी

निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता या कादंबऱ्यांतून पारंपरिक निवेदनपद्धतीचाच वापर केल्याचे दिसते. बहुतांश कादंबऱ्यांमधून तृतीयपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. 'गावठाण' सारख्या कादंबरीतून प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीचा वापर करण्यात आला आहे. 'चाळेगत' सारख्या कादंबरीतून निवेदनाच्या बाबतीत अनेक प्रयोग देखील केल्याचे दिसतात. हे निवेदनातील प्रयोग ग्रामीण कादंबरीतूनच नव्हे तर एकूणच मराठी कादंबरीत प्रथमच करण्यात आले आहेत. 'बारोमास' सारख्या कादंबरीत तृतीयपुरूषी वा काहीकडे प्रथमपुरूषी निवेदन देखील आले आहे तसेच 'चाळेगत' व 'बारोमास' या दोन्ही कादंबऱ्यांत काहीकडे रोजनिशी पद्धतीचा वापर देखील करण्यात आला आहे. कादंबरीची वाचनियता कायम राखण्यात नेमक्या निवेदनशैली खूप महत्त्वाची असते. एकदोन कादंबऱ्यांचा अपवाद वगळता कादंबरीच्या निवेदनपद्धतीत ग्रामीण कादंबरीकारांनी काही विशेष प्रयोग केलेले नाहीत पण ग्रामीण कादंबऱ्यांतून जी वास्तवता त्यांना मांडायची आहे त्याची परिणिमकारकता कायम राहील अशी निवेदनपद्धती त्यांनी निवडल्याचे दिसते.

कादंबरीचा भाषिक अभ्यास करीत असताना वर्णनात्मकता हा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून सांगता येतो. यामध्ये व्यक्तिरेखा, परिसर वा अवकाश यासंबंधीचे विश्लेषण येते. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचा विचार करता, या सर्वच कादंबऱ्या ग्रामीण अवकाशात घडताना दिसतात. ग्रामीण परिसराचे वा अवकाशाचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी वर्णनात्मक पद्धतीने केले आहे ज्यातून तो परिसर त्याच्या बारीकसारीक तपशीलासह वर्णन केल्याचे दिसते. काहीकडे संवाद वा निवेदनाच्या माध्यमातून देखील अवकाशाचे चित्रण कादंबरीतून होताना दिसते. या परिसर वर्णनातून वा अवकाशातून ग्रामीण परिसरातील कृषिजीवन जीवंतपणे उभे राहिले आहे. 'चाळेगत' सारख्या कादंबरीतून अवकाशाचा वापर अत्यंत सूचकतेने करण्यात आला आहे. नव्वदोत्तर कादंबरीतील अवकाश हा त्याच्या अगोदरच्या कादंबऱ्यांशी तुलना करता बराच बदलला आहे हे लक्षात येते. परिसर ग्रामीणच असला तरी त्या परिसराच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, जडणघडणीत नव्दोत्तर काळात मोठा फरक पडला असून त्याचा परिणाम लोकांच्या मानसिकतेवर व विचाक करण्याच्या पद्धतीवर झाला आहे. यामुळेच परिसर ग्रामीण असला तरी या कादंबऱ्यांचा अवकाश मात्र बदलला असे दिसून येते. पात्रांचा विचार करता अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील सर्वच पात्रे ग्रामीण पार्श्वभूमीवर आकाराला येताना दिसतात त्यामुळे ग्रामीण जीवनांतील सर्व वैशिष्ट्ये घेऊन ही पात्रे अवतरतात. या पात्रांचे वर्गीकारण करण्याचा प्रयत्न केल्यास केंद्रवर्ती असलेली पुरूष पात्रे, दुय्यम पात्रे, स्त्री व्यक्तिरेखा, खलस्वरूपाची पात्रे, अशाप्रकारचे वर्गीकारण करता येते. अनेकवेळा अनेक अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून निसर्ग हाच

सर्वात मोठे खलपात्र म्हणून समोर येताना दिसतो. बहुतेक कादंबऱ्यांतून येणाऱ्या केंद्रवर्ती व्यक्तिरेखा या पुरूष असून त्या व्यक्तिरेखा कृषीव्यवस्थेत पिचून गेल्याचे दिसतात. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', 'साखरफेरा', 'कापूसकाळ', 'पाडा', 'फाटलेलं आभाळ', अशा ज्या समस्याप्रधान कादंबऱ्या आहेत त्यातील पात्रे तर या कृषीतील समस्यांसमोर पूर्णपणे पराभूत झाल्याची दिसतात. गोमंकतीय पार्श्वभूमीवरील 'भगदाड' या कादंबरीत मात्र संघर्ष करून शेतकऱ्यांचा विजय झाल्याचे दिसते. 'ऐसे कुणबी भूपाळ' सारख्या कादंबऱ्यांतून पारंपरिक कृषी संस्कृतीचे दर्शन होते व परस्परांवर असणारा अविश्वास, एकमेकांचे पाय ओढणारे आणि सत्ता मिळाल्यावर तिचा गैरफायदा घेणारे, फसवाफसवी करणारे आणि यातून एकूण एकत्र कुटुंबाच्या उद्ध्वस्ततेला कारणीभूत ठरणारी काशीनाथ आणि विश्वनाथ ही पात्रे या कादंबरीतून चित्रित झाली आहेत. दुय्यम स्वरूपाची अनेक पात्रे या कादंबऱ्यांतून येतात. ती दुय्यम स्वरूपाची असली तरी कादंबरीच्या कथानकाची अंगभूत घटक म्हणून ती कादंबरीत येताना दिसतात. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतून येणारी स्त्रीपात्रे देखील वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'गावठाण', 'जिनगानी', या कादंबऱ्या स्त्री प्रधान आहेत. 'गावठाण' मधून एका स्त्रीच्या फरफटीचे चित्रण आत्यंतिक संवेदनशीलतेने करण्यात आले आहे. लेखकांने आंदीचे पात्र एवढ्या नैसर्गिक पद्धतीने रंगविले आहे व त्या पात्राचा कादंबरीतील जो विकास दाखवला आहे तो निश्चितच या कादंबरीला वरच्या स्थरावर घेऊन जाणारा आहे. फक्त कादंबरीचा शेवट लेखक परिणामकारक करू शकलेला नाही. 'जिनगानी' ही कादंबरी राधाबाई या पात्राभोवती फिरते परंतु हे पात्र तेवढे परिणामकारक झाल्याचे दिसत नाही. इतरही अनेक कादंबऱ्यांतून आलेली स्त्रीपात्रे चित्तवेधक झाली आहेत. 'बारोमास' मधील अलका व शेवंतामाय, 'ऐसि कुणबी भूपाळ' मधील उर्मिला, सुनंदा, गंगू, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील उषा, अशी अनेक पात्रे सांगता येतील जी या कादंबऱ्यांमधून अत्यंत महत्वाची पात्रे म्हणून समोर येताना दिसतात.
खलस्वरूपाची पात्रे तशी फारच क्वचित आली आहेत. 'बोडखी' मधील गावपाटील, 'भगदाड' मधील ठेकेदार, अशी काही मोजकीच ज्याला खलपात्रे म्हणता येतील अशी आहेत. अन्यथा निसर्ग हाच कृषीव्यवस्थेत खलपात्र बनून येताना दिसतो. कधी व्यापारी तर कधी सरकार देखील या कादंबऱ्यांतून खलपात्रे झालेली दिसतात.

कथानकाला गती देण्याचे व पात्रांचे स्वभावधर्म व्यक्त करण्याचे काम कादंबरीतील संवाद करतात. संवादातून काळाचे दर्शन देखील होते. अभ्यासासाठी निवडलेल्या सर्वच कादंबऱ्या या संवादप्रधान आहेत. 'वाहतं पाणी' सारख्या कादंबरीचे सर्वच कथानक बहुतांशी संवादातून पुढे जाताना दिसते. अनेक कादंबरीतील पात्रांची मनोवस्था त्यांचे जे स्वतःशीच संवाद होतात त्यातून दिसून येते. या संदर्भात 'बारोमास' मधील एकनाथ व

'तणकट' मधील कबीर हे दोन पात्रे पाहण्यासारखी आहेत. पात्रांच्या परस्पर संवादातून देखील पात्रांची मानसिकता दिसून येते. या संदर्भात 'चाळेगत' मधील लेखक व त्याचा मित्रपरिवार यामधील संवाद पाहण्यासारखे आहेत. यामधून त्यांची मानसिकता तर लक्षात येतेच पण त्याच बरोबर, व्यतीत होणारा काळ त्यांच्या मानसिकतेत कसा बदल घडवून आणतो हे देखील लक्षात येते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' मधील यशानाना आणि त्याची पत्नी यामधील त्यांनी आत्महत्या करण्या अगोदर त्यांचे जे बोलणे होते ते संवाद अंगावर काटा आणणारे आहेत. एकूणच ग्रामीण कादंबऱ्या या संवादप्रधान असतात असा निष्कर्ष अभ्यासासाठी निवडलेल्या नव्वदोत्तर कादंबऱ्यांचा अभ्यास करता काढता येतो.

कोणत्याही कादंबरीतील भाष्य हे लेखकाचे चिंतन असते. यामधून त्याची लिहिण्यामागील भूमिका तर स्पष्ट होतेच त्याच बरोबर जगण्याबद्दलची त्याची कल्पना आणि त्याची नैतिक भूमिका देखील स्पष्ट होत असते. 'बारोमास', 'तणकट', 'चाळेगत', 'ऐसे कुणबी भूपाळ' या कदंबऱ्यातून लेखकाचे जीवनविषयक भाष्य अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झालेले दिसते. 'तणकट' मधून जो जातीय संघर्ष चित्रित झाला आहे. त्याची कारणमीमांसा लेखक अनेकवेळा पात्रांच्या चिंतनातून करताना दिसतो. निवेदनाच्या माध्यमातून लेखक जास्त भाष्य करीत नसला तरी कबीर, आक्काबा राणे, बल्लाळ, अशा पात्रांच्या चिंतनाच्या माध्यमांतून किंवा अनेकवेळा दलित मित्र, कबीर व त्याचे सवर्ण मित्र, अशा चर्चांमधून देखील लेखक आपले भाष्य करताना दिसतो. 'बारोमास' मधून देखील बदललेली परिस्थिती, बेरोजगारी, शेतीविषयक सरकारी धोरणे, हायब्रीड बियाणी, शेतीचे आधुनिकीकारण, बाजारभावाचा प्रश्न, आजच्या तरूणाची झालेली विमनस्क अवस्था अशा अनेक गोष्टींबद्दलचे लेखकांने या कादंबरीत केलेले भाष्य लेखकाच्या सखोल चिंतनशीलतेचा दाखला देणारे आहे. जीवनविषयक भाष्य करण्यासाठी काहीकडे लेखकांने केलेला रोजनिशीचा वापर किंवा महानुभाव शैलीतून केलेले लेखन याची विशेष नोंद घेतली पाहिजे. 'चाळेगत' ही देखील आजच्या एकूण बदलत्या परिस्थितीवर भाष्य करणारी अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. जागतिकीकरणाचे जे पडसाद ग्रामीण भागातील पारंपरिक जीवनावर व व्यवसायावर उमटले आहेत त्याचे अनेकविध कंगोऱ्यांसह विश्लेषण करताना एकूण बदलत्या परिस्थितीविषयक लेखकांने केलेले भाष्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे बदले राजकीय मानस, समाजवादी चळवळीला लागलेली उतरती कळा आणि अस्मितांचे राजकारण करणाऱ्या पक्षांचे वाढलेले प्राबल्य, राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकारण, अभिव्यक्तीची होणारी गळचेपी या सर्वा संदर्भात कधी पात्रांच्या माध्यमातून तर कधी निवेदनाच्या माध्यमातून लेखकांने केलेले भाष्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ही कादंबरी एक नैतिक भूमिका घेऊन

लेखकांने लिहिलेली आहे परंतु लेखकांने जे भाष्य केले आहे त्यामधून लेखकाची भूमिका एकांगी नाही हे देखील लक्षात येते. ‘बारोमास’ मधून आजच्या एकूण कृषी व्यवस्थेसंबंधी लेखकांने जे भाष्य केले आहे ते सर्वांनाच अंतर्मुख करणारे आहे. हे भाष्य कधी मुख्यपात्राच्या चिंतनातून तर अनेकवेळा काही पात्रांच्या संवादातून व्यक्त झाले आहे. एकूण आज शेती हा आज आतबट्ट्याचा व्यवहार झाला असून. शेती परवडणारी नाही आणि शेतीवर विसंबून कोणीही आपली उपजीविका करू शकत नाही हे या एकूण या कादंबरीतून व्यक्त झालेल्या लेखकच्या चिंतनाचे सार आहे असे म्हणता येते. याच म्हणून नव्हे, तर सर्वच कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले भाष्य आपणाला याच निष्कर्षाप्रत घेऊन जाणारे आहे आणि हीच खरी आजच्या शेतीची शोकांतिका आहे असे निश्चितपणे म्हणता येते. लेखकांनी  आपले भाष्य करीत असनाना त्या भाष्याला अनुरूप अशा आभिव्यक्तीच्या पद्धती वापरल्या आहेत. त्यामुळे लेखकाचे भाष्य आणि ती व्यक्त करण्यासाठी वापरलेली अभिव्यक्तीची पद्धत यात एक अंतर्गत संगती असल्याचे दिसते त्यामुळे कादंबरीच्या भाषिक अंगाचा विचार करीत असताना देखील ‘भाष्य’ या आंगाचा विचार महत्त्वाचा ठरतो हे लक्षात येते. भाषिक अभ्यासाचा विचार करीत असताना विविध ग्रामीण बोलींचा केलेला वैविध्यपूर्ण वापर हे या अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते. मराठवाडा, विदर्भ, कोल्हापूरचा प्रदेश, कोकण, खानदेश अशा विविध भागातील स्थानिक बोलींचा त्या त्या परिसरातील लेखकांनी आपल्या कादंबरी लेखनात अत्यंत चपखलतेने वापर करून घेतला आहे. प्रमाण मराठी पेक्षा वेगळ्या स्वरूपाची असलेली वाक्य रचना. प्रमाण भाषेत वापरात असलेल्या शब्दाऐवजी बोली भाषेत होणाऱ्या दुसऱ्याच शब्दाचा वापर. त्या त्या ठिकाणच्या स्थानिक बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द, वाक्प्रचार, म्हणी यांनी तर हे सर्वच लेखन अत्यंत संमृद्ध झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे बोलींचा वापर लेखनासाठी केलेला असला तरी या कादंबऱ्यांची वाचनीयता कुठेही खंडीत झाल्याचे दिसत नाही. बोलीच्या वापरामुळे अनेक आजपर्यंत अपरिचित अललेल्या शब्दांची ओळख मुख्य प्रवाहातील वाचकाला होते व मराठीची भाषिक संमृद्धता पाहून तो थक्क होतो.  नव्वदोत्तर कादंबऱ्या भाषिक अंगाने देखील संमृद्ध असून अभिव्यक्तीच्या विविध शक्यतांचा विचार नव्वदोत्तर काळातील लेखकांनी करण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरीला संमृद्धता प्राप्त झाली आहे असे निश्चितपणे म्हणता येते.

**निष्कर्ष**:

1) कादंबरीच्या आशयापर्यंत घेऊन जाण्याचे काम अभिव्यक्ती करते

2) साहित्याच्या जीवनदर्शनांत भाषेचा विचार महत्त्वाचा

3) साठोत्तर काळात कादंबरीतील भाषिक अभिव्यक्ती फक्त सौंदर्यनिर्मितीचे साधन न राहता आशयाचे अभिन्न अंग म्हणून भाषेचा विचार होऊ लागला आहे.

4) साठोत्तर काळात निवेदनापेक्षा कादंबरीतील पात्रांच्या कृती-उक्तीनां जास्त महत्त्व आले आहे.

5) साहित्याच्या अभिव्यक्तीचा विचार करीत असताना निवेदन, वर्णन, संवाद व भाष्य ही चार महत्त्वाची अंगे असतात.

6) कादंबरीतील प्रवाहीपणा टिकवून ठेवण्याचे काम निवेदन करते.

7) मनोविश्लेषणांच्या दृष्टीने प्रथमपुरूषी निवेदन पद्धती उपयुक्त ठरते.

8) तृतीयपुरूषी निवेदनातून लेखनाच्या सर्व अंगाचा परिपोष होणे शक्य होते.

9) 'चाळेगत' मध्ये निवेदनाच्या संदर्भात अनेक प्रयोग करण्यात आले आहेत.

10) भाषिक प्रयोग आशयनिष्ठ असतील तर ते वाचकाला आशयाच्या जवळ घेऊन जातात.

11) 'बारोमास' मध्ये निवेदनाच्या संदर्भात प्रयोग केले असले तरी या कादंबरीतील निवेदन अत्यंत प्रवाही झाले आहे.

12) सरळ रेषेत कथानक सांगत जाण्याची निवेदन पद्धती म्हणजे पारंपरिक निवेदन पद्धती.

13) अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांमधून ज्या ठिकाणी पारंपरिक निवेदनपद्धती वापरली आहे त्या निवेदन पद्धतीतून लेखकांनी अनेक बारीकसारीक गोष्टींचा तपशील पुरवला आहे तसेच कादंबरीतील अवकाश, काळाचे भान व पात्रांची भावात्मक अवस्था नेमकेपणाने मांडली आहे.

14) घटनाप्रसंगांचे वर्णन चित्रमय शैलीत येते तेव्हा त्याला दृश्यात्मक निवेदन म्हणतात. दृश्यात्मक निवेदनामुळे निवेदनाची परिणामकारकता वाढते व त्याला गतिमानता प्राप्त होते.

15) अभ्यासासाठी निवडलेल्या 'साखरफेरा', 'कापूसकाळ', 'ऐसे कुणबी भूपाळ', अशा अनेक कादंबऱ्यांतून दृश्यात्मक निवेदन आले आहे व ते परिणामकारक ठरले आहे.

16) चळवळीतील कार्यकर्त्यांचे व्यक्तिदर्शन करण्यासाठी वक्तृत्वपूर्ण निवेदन शैलीचा वापर केला जातो. या

पात्रांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यातून व्यक्त होतो.

17) निवेदनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी किंवा वास्तववादी लेखनात कलात्मकता आणण्यासाठी काव्यात्म निवेदनाचा वापर केला जातो.

18) काव्यात्म निवेदनामुळे अनेकदा कृत्रिमता येण्याची शक्यता असली तरी पात्रांची मानसिकता, हतबलता, परात्मता व्यक्त करण्यासाठी काव्यमय निवेदनतंत्राचा वापर करता येणे शक्य असते. काव्यात्म निवेदनांत चिन्हात्मकतेचा केलेला वापर हे 'चाळेगत' सारख्या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते.

19) संवाद हे अनेकदा निवेदनाचा महत्त्वाचा भाग म्हणून येतात. संवादात्मक निवेदन पद्धतीतून मांडणी अधिक परिणामकाक करता येते. आत्मसंवादान्मक निवेदनांतून कादंबरीतील पात्रे आणि लेखक यांच्यामध्ये भावनिक नाळ जोडण्याचे काम चांगल्या प्रकारे साधले जाते.

20) निवेदनामध्ये बोलीचा वापर हे वास्तववादी कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून सांगितले जाते. कादंबरीत जो अवकाश निवडलेला असतो त्याची मांडणी बोलीमधून अधिक परिणामकारकरित्या होते.

21) लेखक एकाच कादंबरीत अनेक प्रकारच्या निवेदनपद्धतींचा आशयाच्या परिणामकारकतेनुसार वापर करताना दिसतो.

22) कथानकाला आकार येतो तो कादंबरीतील व्यक्तिचित्रणामुळे. कादंबरीतील व्यक्तिदर्शनांत पात्रांच्या मनाचा शोध देखील अंतर्भूत असतो.

23) लेखकाच्या मर्जीनुसार पात्रांचे वर्तन होऊ लागते तेव्हा त्यातील जीवंतपणा नाहिसा होतो.

24) ग्रामीण कादंबरीतील पात्रांचा विचार करताना ती बहुतांशी प्रातिनिधिक म्हणून येतात हे लक्षात घ्यावे लागते.

25) पात्रांचे पारंपरिक वर्गीकारण ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात गैरलागू ठरते.

26) अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रामीण कादंबऱ्यांतून एकापेक्षा अधिक पात्रे कादंबरीच्या केंद्रस्थानी असल्याची दिसतात.

27) अभ्यासासाठी निवडलेल्या बहुतेक कादंबऱ्या पात्रचित्रणाच्या दृष्टीने पुरूषप्रधान आहेत.

28) अनेक कादंबऱ्यांतील केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तिरेखा या नैराश्यांने ग्रासलेल्या आणि पराभूत मनोवृत्तीच्या अशाच आहेत. एकूण नव्वदोत्तर काळातील शेतीची आणि शेतकऱ्यांची झालेली दुर्दशा त्यातून व्यक्त होते.

29) अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतून संघर्षाला धार येण्यासाठी म्हणून काही पात्रांची निर्मिती केल्याचे दिसते.

30) शेतीतील व्यथा-वेदना अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील पात्रांच्या माध्यमातून जिवंतपणे चित्रित झाली आहे.

31) जे आहे त्यातच समाधान मानण्याची वृत्ती बऱ्याच प्रमुख पात्रांमध्ये दिसून येते.

32) अनेक कादंबऱ्यांतून मध्यवर्ती पात्र आपल्या कुवतीप्रमाणे परिस्थिती विरूद्ध संघर्ष करताना दिसतात.

33) ग्राम व्यवस्थेत कारागीर लोकांचे शोषण कसे होते याचे दर्शन 'डोमा' सारख्या पात्राच्या माध्यमातून होते.

34) स्त्री कडे असलेली आत्यंतिक सोशिक वृत्ती अभ्यासासाठी निवडलेल्या बहुतांश कादंबऱ्यांतील स्त्री पात्रातून आपणाला दिसून येते.

35) शेतकरी कुटुंबात स्त्रियांची होणारी घुसमट अभ्यासासाठी निवडलेल्या अनेक कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तीरेखांच्या अभ्यासातून मुखर होते.

36) ग्रामीण कादंबऱ्यांमधून पारंपरिक स्वरूपाची खलपात्रे क्वचितच दिसतात परंतु नैसर्गिक गोष्टी व शेतकऱ्यांसाठी म्हणून उभारलेल्या व्यवस्था याच शेतकऱ्यांच्या आयुष्यात खलनायकाचे काम मोठ्याप्रमाणांत करताना दिसतात.

37) अभ्यासासाठी कादंबऱ्यांना आशयदृष्ट्या आणि निर्मितीच्या अंगाने संमृद्ध करण्यात दुय्यम पात्रांचा मोठा हातभार असल्याचे दिसते.

38) अभ्यासासाठी निडलेल्या कादंबऱ्यातील पात्रांची जडणघडण पारंपरिक स्वरूपाचीच असून त्यांच्या जडणघडणीत विशेष स्वरूपाची कोणतीही प्रयोगात्मकता लेखकांनी केल्याचे दिसत नाही.

39) कथानकाच्या उभारणीसाठी जशी पात्रांची आवश्यकता असते तसेच कथानक विशिष्ट अशा परिसराची किंवा अवकाशाची देखील आवश्यकता असते.

40) लेखक आपल्या जीवनजाणिवांच्या प्रगटीकरणासाठी विविध अवकाशांची निवड करीत असतो.

41) वेळ, काळ व परिस्थिती या सर्वांचा कादंबरीतील अवकाशावर परिणाम होतो असे दिसून येते.

42) संवादामधून पात्रांचे स्वभावधर्म कळतात व कथानकाला गती देण्याचे काम संवाद करतात.

43) विचार प्रतिपादनाचे महत्त्वाचे काम कादंबरीत संवादाच्या माध्यमातून साधले जाते.

44) पात्राची मानसिक स्थिती, त्याची अस्वस्था, त्याजे जीवनाबद्दलचे विचार हे सर्व समजून घेण्यासाठी हे स्वसंवाद महत्त्वाचे असतात.

45) कृषी व्यवस्था, ग्रामीण भागातील एकत्र कुटुंबपद्धती, ग्रामव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान, गावातील जातीय तेढ, बेकारी, ग्राम आणि शहर यामधील संघर्ष, जागतिकीकरणानंतरची परिस्थिती या सर्वांबद्दल अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांतील लेखकांनी भाष्य केल्याचे दिसते. हे भाष्य करीत असताना काहीकडे सूचकता, किंवा लेखनाची विशिष्ट पद्धत वापरली आहे त्यामुळे आशय आणि अभिव्यक्ती यातील एकरूपताही लक्षात येते.

46) ग्रामीण बोलीचा लेखनांत केलेला वापर ग्रामीण ग्रामीण कादंबरीला अधिक संमृद्ध करतो. लेखनात त्या परिसरातील ग्रामीण बोलीचा झालेला वापर हे ग्रामीण कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येते.

47) गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचा अपवाद वगळता अभ्यासासाठी निवडलेल्या बाकी सर्व कादंबऱ्यांमधून बोलीचा वापर परिणामकारकरित्या करून घेण्यात आला आहे.

48) गोमंतकीय लेखकांनी आपल्या लेखनात स्थानिक भाषेचा वापर केला असता तर त्यांचे लेखन भषिक अंगाने अधिक संमृद्ध झाले असते.

49) गोमंतकीय पार्श्वभूमी असलेसलेली एक कादंबरी ही काल्पनिक वास्तवाची निर्मिती करून लिहिण्यात आली आहे. ग्रामीण कादंबरी लेखनात झालेला वेगळा प्रयोग म्हणून त्याकडे पाहता येते.

**संदर्भ सूची**


1) काजरेकर, गोविंद, 'राजन गवस याचे कथात्म साहित्यः एक अभ्यास' गोवा विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध 2008, पृ. 237

2) यादव, आनंद, 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1989, पृ.111

3) काजरेकर, गोविंद, 'राजन गवस याचे कथात्म साहित्यः एक अभ्यास' गोवा विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध 2008, पृ. 239

4) पाटणकर, रा. भा., 'सौंदर्यमीमांसा', मौज प्रकाशनगृह, मुंबई, 2001 पृ. 393

5) बांदेकर, दशरथ, 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर 2009 पृ.38

6) थोरात, हरिश्चंद्र, 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन, मुंबई, 2011, पृ. 119,120.

7) सोलापुरे, रसुल, 'फाटलेलं आभाळ', अभिनंदन प्रकाशन, गडहिंग्लज, 2019, पृ. 5

8) विंगकर, आनंद, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ. 1

9) गावस, चंद्रकांत 'इदवास', गौराई प्रकाशन, होंडा-गोवा,2018, पृ.11

10) पाटील, मोहन 'साखरफेरा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ.144

11) दौंड, कैलास, 'कापूसकाळ', मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे, 2009, पृ.८३,८४

12) काळे, भारत 'ऐसे कुणबी भूपाळ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 3018, पृ.19, 20

13) गवस, राजन, 'तणकट' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ. 56

14) देशमुख सदानंद 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ. 221,222

15) पाटील, मोहन 'साखरफेरा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ.331

16) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ. 47

17) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ. 220

18) देशमुख, सदानंद, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ. 343

19) सावंत, मथु, 'जिनगानी', सुमेय प्रकाशन, नांदेड, 2000 पृ. 11

20) गवस, राजन, 'तणकट' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1998, पृ.105

21) गवस, राजन, 'तणकट' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ.77

22) बांदेकर, प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ.100

23) इंगोले, प्रतिमा, 'बोडखी', सोनल प्रकाशन, अमरावती, 2009, पृ.23

24) पाटील, मोहन 'साखरफेरा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ.12

25) खोत, कृष्णात, 'गावठाण', मौज प्रकाशन गृह मुंबई, 2014, पृ. 33

26) मोरे, शेषराव 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009 पृ.116

27) कुलकर्णी, मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र व स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1984, पृ.166

28) कुलकर्णी, मदन, 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र व स्वरूप, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 1984, पृ.168

29) देशमुख सदानंद 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ. 322

30) देशमुख सदानंद 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2018, पृ. 285

31) काळे, भारत, 'ऐसे कुणबी भूपाळ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018 पृ. 66

32) इंगोले, प्रतिमा, 'बोडखी', सोनल प्रकाशन पुणे, 2009, पृ.83

33) खोत, कृष्णात 'गावठाण', मौज प्रकाशन गृह, मुंबई, 2014, पृ.106

34) विंगकर, आनंद, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ. 64

35) विंगकर, आनंद, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ. 102

36) विंगकर, आनंद, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ. 129

37) पाटील, मोहन, 'साखरफेरा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, 2006, पृ.99

38) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, 2009, पृ.183

39) परुळेकर, अनिल, 'वनराईचा लढा', गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी, बार्देश-गोवा, 2006, पृ.174

40) दौंड, कैलास, 'कापूसकाळ', मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, 2015, पृ. 180

41) गवस, राजन, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,2017, पृ.7

42) कोळी, अशोक, 'पाडा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ. 40

43) शंकर सखाराम 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन्स, मुंबई 2008, पृ.321

44) सोलापुरे, रसुल, फाटलेलं आभाळ, अभिनंदन प्रकाशन, कोल्हापूर, 2019 पृ.10

45) परुळेकर, अनिल, 'वाहतं पाणी', गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी, बार्देश-गोवा, 2009 पृ.316

46) खोत, कृष्णात, 'गावठाण', मौज प्रकाशन गृह, मुंबई, 2012, पृ.10

47) गावस, चंद्रकांत, 'इदवास', गौराई प्रकाशन, होंडा-गोवा, 2018, पृ.181

48) पाटील, सुरेंद्र, 'चिखलवाटा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007, पृ.76

49) देशमुख सदानंद 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.180

50) कोळी, अशोक, 'पाडा' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ.6

51) एन्, शिवदास, 'भगदाड', उर्बा प्रकाशन, फोंडा-गोवा, 2006, पृ.117

52) विंगकर, आनंद, 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट', लोकवाङ्मय गृह, मुंबई, 2016, पृ.5

53) कोळी, अशोक, 'पाडा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2015, पृ.20

54) परुळेकर, अनिल, गोमंतक मराठी अकादमी, पर्वरी बार्देश-गोवा, 2009, पृ.328,329

55)गवस, राजन, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017 प.227

56) पाटील मोहन 'साखरफेरा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 2006, पृ.53

57) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, 2009, पृ.77

58) देशमुख सदानंद 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2018, पृ.342

59) गवस, राजन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ.9

60) बांदेकर, प्रवीण,'चाळेगत', शब्दालय, प्रकाशन, श्रीरामपूर,2009, पृ. 259

61) काळे, भारत 'ऐसे कुणबी भूपाळ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे,2018, पृ.100,101

62) मोरे, शेषराव, 'असं जगणं तोलाचं', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2009, पृ.116,117

63) काळे, भारत,'ऐसे कुणबी भूपाळ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ. 34

64) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर,2009, पृ.76.

65) इंगोले प्रतिमा 'बोडखी', सोनल प्रकाशन, अमरावती, 2009, पृ.71

66) शंकर, सखाराम, 'एसईझेड', सामंत पब्लिकेशन्स, मुंबई,2008, पृ.41

67) गवस, राजन, 'तणकट' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ. 105

68) काळे, भारत 'ऐसे कुणबी भूपाळ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, पुणे, 2018, पृ.484

69) बांदेकर प्रवीण 'चाळेगत', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2009, पृ.13

70) गवस, राजन, 'तणकट', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ.238

71) पाटील, सुरेंद्र, 'चिखलवाटा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2007, पृ.114